# आपत्ती व्यवस्थापन आराखडा

## (Disaster Management Plan )

# सांगली जिल्हा

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण

## जिल्हाधिकारी कार्यालय, सांगली

## 2023-24

**विजयसिंह पाटील**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,**
**तथा निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली**

**डॉ. राजा दयानिधी**
**अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण तथा**
**जिल्हाधिकारी, सांगली**

# प्रस्तावना

आपत्ती मग ती नैसर्गिक असो की, मानवनिर्मित असो त्यामुळे मानवी जीवन अस्थिर आणि असुरक्षित होऊ शकते. आपत्ती ही कधीच सांगून येत नाही. कोणत्याही आपत्ती विषयी पूर्व अंदाज वर्तविणे शक्य नसले तरी संभाव्य आपत्तीचा विचार करून तिला तोंड देण्यासाठी पुर्णपणे सज्ज राहिल्यास आपत्तीची तीव्रता कमी करणे व जिवित व वित्त हानी नियंत्रित करणे शक्य होते. यासाठी योग्य पुर्वनियोजन, योग्य वेळी नियोजनाची योग्य प्रकारे अंमलबजावणी करणे अत्यंत आवश्यक आहे.

सांगली जिल्हा हा महाराष्ट्रातील एक आपत्ती प्रवण जिल्हा म्हणून ओळखला जातो. गेल्या काही वर्षातील अनुभव लक्षात घेता सन २००५ -०६, २०१९,२०२१ या वर्षात नदीकाठावरती असणारी गावे बाधित झालेली आहेत. प्रामुख्याने जिल्हयातील कृष्णा व वारणा नदीकाठावरील गावे पूरामूळे बाधित झालेली आहेत.

आकस्मिकपणे येणा-या नैसर्गिक आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी पूर्वतयारी करिता महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम (Maharashtra Disaster Risk Management Programme)सांगली जिल्हयात कार्यान्वित आहे. संभाव्य नैसर्गिक आपत्तीवेळी आपण सज्ज राहण्यासाठी एक ठोस कृती आराखडा, त्या आराखडयाची अंमलबजावणी करण्याचे निश्चित धोरण आपल्याकडे तयार असणे अत्यंत गरजेचे असल्याने सर्व प्रकारच्या आपत्तींना तोंड देण्यासाठी हा आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. आपत्ती व्यवस्थापन आराखडयातील प्रमाणित कार्यपध्दती (SOP) व संपर्क यादी यांचा उपयोग करून व सर्व विभागामध्ये (उदा. महसूल/पोलीस/पाटबंधारे/सार्वजनिक बांधकाम/ सार्व. आरोग्य इ.) व स्वंयसेवी संस्था यांच्यामध्ये समन्वय राखून सर्व संबंधीत यंत्रणा आपापल्या जबाबदा-या यशस्वीपणे पार पाडतील व संभाव्य आपत्तीला सक्षमपणे तोंड देण्याचे काम करतील अशी मला निश्चितच खात्री वाटते.

**(डॉ.राजा दयानिधी)** भाप्रसे
**अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण**
**तथा जिल्हाधिकारी, सांगली**

# अनुक्रमणिका


| अ.क्र | प्रकरण | पान. क्र. |
|---|---|---|
| 1 | आपत्ती व्यवस्थापन ओळख व उददेश | |
| 2 | सांगली जिल्हा सर्वसाधारण माहिती | |
| 3 | आपत्ती व्यवस्थापन कायदा - 2005 | |
| 4 | आपत्तीच्या काळात विविध खात्याकडून पार पाडावयाच्या जबाबदा-या | |
| 5 | विविध आपत्ती व करावयाच्या उपाययोजना | |
| 6 | आपत्ती व्यवस्थापनाबाबत तयार करण्यात आलेल्या गटांकरिता तपासणी सूची | |
| 7 | धोके,धोके प्रवणता, क्षमता व धोके मुल्यांकन | |
| 8 | आपत्ती व्यवस्थापन संस्थात्मक बांधणी | |
| 9 | आपत्ती प्रतिबंध आणि सौम्यीकरण | |
| 10 | आपत्ती पूर्व सज्जता | |
| 11 | प्रतिसाद व मदत प्रणाली | |
| 12 | पुनर्बाधंणी पुनर्वसन योजना | |
| 13 | आपत्ती व्यवस्थापन आराखडा अंमलबजावणी आर्थिक तरतूदी | |
| 14 | आपत्ती व्यवस्थापन आराखडा कार्यपध्दती पर्यवेक्षण मूल्यमापन अद्यावतीकरण देखभाल व अमंलबजावणी | |
| 15 | अमंलबजावणी समन्वय यंत्रणा | |
| | परिशिष्टे | |
| | 1. प्रमाणित कार्यपध्दती व पडताळणी सूची | |
| | 2. सांगली जिल्हा संक्षिप्त माहिती | |
| | 3. सांगली जिल्हयातील कृष्णा व वारणा नदीकाठची गावे | |
| | 4. कृष्णा व वारणा धरण पातळी | |
| | 5. रस्ते अपघात ठिकाणे | |
| | 6. जे.सी.बी.माहीती | |
| | 7. प्रशिक्षण तपशील 2020 | |
| | 8. पाईप लाईनमधून पेट्रोलियम पदार्थांची वाहतूक होणाऱ्या गावांची यादी | |
| | 9. स्वंयसेवी संस्था माहिती | |
| | 10. प्राथमिक आरोग्य केंद्र माहिती | |
| | 11. एस.टी वाहतूकीकरिता अतिवृष्टीमूळे बंद होणारे रस्ते माहिती | |

| | | |
|---|---|---|
| | 12. पूर प्रवण टेलिफोन केंद्राची माहिती | |
| | 13. पूर परिस्थितीमूळे बाधित पाणी पुरवठा योजना माहिती | |
| | 14. महापूर २०१९ मुळे झालेले नुकसान तपशील | |
| | 15. महत्वाचे संपर्क क्रमांक माहिती | |

## प्रकरण - 1

## आपत्ती व्यवस्थापन एक ओळख

अचानकपणे उदभवणा-या अनेकविध नैसर्गिक आपत्तींनी मानवी जीवन अस्थिर आणि असुरक्षित केलेलेआहे. भुकंप, पूर, दुष्काळ, चक्रिवादळ, सुनामी यासारख्या नैसर्गिक आपत्तींना तोंड देताना गेल्या काही वर्षात देशातील जनतेने वेगळया अनुभवांना तोंड दिले आहे. या आपत्तीविषयी अचुक अंदाज वर्तविणे पुर्णपणे शक्य नसले तरीही संभाव्य आपत्तींचा विचार करुन तिला तोंड देण्यासाठी पुर्णपणे सज्ज राहिल्यास या आपत्तीची उपद्रवक्षमता, हानीक्षमता आपल्या विचारांच्या कक्षेपलीकडे असली तरी परिपूर्ण सज्ज यंत्रणा लोकांची कणखर मानसिकता, दातृत्त्वाचा आदर्श असणा-या स्वयंसेवी संस्था, व्यक्ती आणि आपदग्रस्तांच्या हाकेला ओ देवुन धावून जाण्याची माणुसकीची भावना या संचिताच्या आधारावर आपले भवितव्य सुरक्षित राखण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे.

याच उद्देशाने नैसर्गिक आपत्तींना तोंड देण्यासाठी परिपुर्ण कार्यान्वयन प्रणालीची संकल्पना पुढे आली. प्रशासन, प्रसारमाध्यमे, स्वयंसेवीसंस्था व आपत्तींचा मुकाबला करण्याची मानसिकता निर्माण झालेली प्रशिक्षीत जनता यांच्या एकत्रित प्रयत्नातून आणि सुसंवादातुन नैसर्गिक आपत्तींना समर्थपणे सामोरे जाणे शक्य आहे. उपरोक्त बाबी लक्षात घेता आपत्ती व्यवस्थापनासंदर्भात प्राप्त झालेल्या शासनाच्या सुचनेनुसार सोलापूर जिल्हयाकरिता नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन कार्यान्वयीन प्रणाली तयार करण्यात येत आहे.

### आपत्ती व्यवस्थापन आराखडयाचा उद्देश

1. संभाव्य पुरपरिस्थितीच्या काळात जीवित व मालमत्तेच्या हानी होवू नये याकरीता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेसाठी यंत्रणा सुसज्ज ठेवणे.
2. आपत्ती उदभवल्यास निर्माण झालेल्या परिस्थितीला तोंड देवून जिवीत व मालमत्तेची हानी मर्यादित करणे.
3. मदत व पुनर्वसन कार्याशी संबंधित सर्व विभागांमध्ये समन्वय साधणे.
4. प्रशासन, स्वयंसेवी संस्था, प्रसार माध्यमे व जनसहभाग यांच्या एकत्रित प्रयत्नातुन संभाव्य आपत्तीला यशस्वीपणे तोंड देणे.

केंद्राच्या व राज्याच्या प्रशासनाची सर्वकष तयारीचा एक भाग म्हणून तसेच जिल्हा प्रशासनाची कार्यक्षमता वाढावी म्हणून महाराष्ट्र शासनाने राज्य आपत्कालीन कृती योजना तयार केली आहे. या सदंर्भात प्रत्येक जिल्हा प्रशासनाने आपत्कालीन व्यवस्थापन कृती आराखडा तयार केली आहे ही बहुउद्देशीय प्रतिसाद योजना जिल्हा प्रशासनासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल.

जिल्ह्यामधील संभाव्य धोक्याची माहीती घेऊन व मूल्यमापन करून जिल्हा स्तरावरील पूर्वतयारीत सूधारणा करणे व याद्वारे आपत्ती कालावधीत जिवित व वित्त हानी टाळणे.आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमात सहभागी संस्थाकडून उपलब्ध सोई सुविधा याची माहीती घेणे व त्याचा आपत्ती व्यवस्थापनात जिल्हा प्रशासनाची कार्यक्षमता वाढविण्यास उपयोग करून घेणे, ही माहीती जिल्हा प्रशासनास आपत्तीला कार्यक्षमतेने तोंड देण्यास तसेच समाजाच्या विविध समाजाच्या स्तरामध्ये विश्वास निर्माण करणेसाठी सहाय्यभूत ठरेल आपत्कालीन आराखड्याद्वारे तयार केलेल्या विविध माहीतीचा उपयोग जिल्ह्यामधील विकासात्मक योजनासाठी करून घेणे.भौगोलिक पध्दती, संवेदूर पध्दती इ.तंत्रज्ञानाचा उपयोग आपत्ती व्यवस्थापनामध्ये करणे,जिल्ह्यामधील आपत्ती निवारणाची माहीती व्यवस्थित साठवून ठेवणे, माहीतीचे अद्यावतीकरण करणे, प्रतिसादाचे व्यवस्थित मूल्यमापन करणे याबाबत आवश्यक कृती योजनेचा उपयोग महाराष्ट्र शासनाच्या विविध धोरणासाठी करून घेणे बाबतचा तपशील खालीलप्रमाणे

1. प्रतिसादाच्या कृतीची योग्य मालिका तयार करण्यासाठी पुर्ननियोजन
2. सहभागी संस्थाना त्यांची जबाबदारी वाटून घेणे
3. सहभागी झालेल्या विविध संस्थांना व विभागासाठी आदर्श कृती ठरविणे
4. उपलब्ध सोयी सुविधाची माहीती
5. उपलब्ध सुविधांच्या कार्यक्षम व्यवस्थापनासाठी कार्यपध्दती
6. सुसंवादित व कार्यक्षम प्रतिसादासाठी मदत कार्य करणाऱ्या विविध संस्था व अशासकीय संस्था यामध्ये सुसंवाद साधणे.
7. भविष्यकालीन नैसर्गिक आपत्तीमूळे होणारे परिणाम कमी करण्यासाठी प्रयत्न करणे
8. आपत्तीला सामोरे जाणेकामी शोध व सुटका, प्रतिसाद इ करणेकामी जिल्हास्तरीय नियत्रंण कक्षाची स्थापना करणे.
9. आपत्तीशी संबधित पूर्वसूचना मिळणेकामी यंत्रणा तयार करणे.

राज्य आपत्ती व्यवस्थापन योजनातील मार्गदर्शक सूचनानुसार प्रतिसाद योजना तयार करणे.त्यामध्ये मदत,पुनर्वसन, शोध मोहिम इ आपत्तीप्रवण भागासाठी उपयुक्त असणाऱ्या घटकाची माहीती घेणे.

माहीती,शिक्षण व संवाद याचा वापर करून आपत्ती व्यवस्थापनाबाबत जनजागृती करणे.

## प्रकरण – 2

## सांगली जिल्हा सर्वसाधारण माहीती

1. एकूण महसूली गांवाची संख्या- ७७३
2. एकूण ग्रामपंचायत असणाऱ्या गावांची संख्या- ६९९
3. सांगली जिल्हा ठिकाण १६.८५ अंश ते १७.२२ अंश उत्तर अक्षांश
   ७३.४२ अंश ते ७५.४० अंश पूर्व रेखांश

### २.१ सांगली जिल्हा लोकसंख्या

| अ.क्र | तपशील | सन २०११ | सन २००१ |
|---|---|---|---|
| 1 | लोकसंख्या | २८२२१४३ | २५८३५२४ |
| 2 | पुरूष | १४३५७२८ | १३२००८८ |
| 3 | लोकसंख्या वाढ | १३८६४१५ | १२६३४३६ |
| 4 | क्षेत्रफळ (चौ.कि.मी) | ८५७२ | ८५७२ |
| 5 | लिंग गुणोत्तर | ९६६ | ९५७ |
| 6 | साक्षरता | ८१.४८ | ७६.६२ |
| 7 | पुरूष साक्षरता | ८८.२२ | ८६.२६ |
| 8 | महिला साक्षारता | ७४.५९ | ६६.७३ |
| 9 | बालक संख्या (०-६ वर्ष) | ३०६४७७ | ३४१६४३ |
| 10 | मुले (०-६ वर्ष) | १६४३५५ | १८४५६४ |
| 11 | मुली (०-६ वर्ष) | १४२४२२ | १५७०७९ |

## २.२सांगली जिल्हा प्रशासकीय रचना




| अ.क्र. | तालुका ठिकाण | अक्षांश | रेखांक्ष | एकूण मंडळ | तलाठी साझे | एकूण गावे |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मिरज | १६.८१ | ७४.६२ | १२ | ५७ | ७२ |
| 2 | तासगाव | १७.०२ | ७४.६० | ७ | ३८ | ६९ |
| 3 | क.महंकाळ | १७.०० | ७४.८६ | ५ | ३० | ६० |
| 4 | वाळवा | १७.६५ | ७४.२६ | १२ | ७२ | ९८ |
| 5 | शिराळा | १६.९८ | ७४.१२ | ६ | ३९ | ९५ |
| 6 | विटा | १७.२७ | ७४.५३ | ६ | ३६ | ६७ |
| 7 | आटपाडी | १७.४२ | ७४.९३ | ३ | २१ | ६० |
| 8 | कडेगाव | १७.२९ | ७४.३३ | ५ | ३२ | ५६ |
| 9 | पलूस | १७.०९ | ७४.४४ | ४ | २४ | ३५ |
| 10 | जत | १७.०४ | ७५.२१ | ९ | ५७ | १२३ |

## २.३ सांगली जिल्हयामध्ये पडणारा सरासरी पाऊस

| **अ.क्र** | **तालुका ठिकाण** | **मि.मी** |
|---|---|---|
| 1 | मिरज | ५१२.६२ |
| 2 | जत | ५३०.९१ |
| 3 | विटा | ५६०.६७ |
| 4 | इस्लामपूर | ६५३.८४ |
| 5 | तासगाव | ५४२.७० |
| 6 | शिराळा | ९५०.१७ |
| 7 | आटपाडी | ३७७.२० |
| 8 | क.महंकाळ | ४२५.९० |
| 9 | पलूस | ३४२.१० |
| 10 | कडेगाव | ६०५.८० |
| **1** | **सांगली जिल्हा** | **६२०.७०** |

## २.४ सर्वसाधारण माहीती सांगली जिल्हा

### १. नद्या /धरणे

| | | |
|---|---|---|
| **1** | **नद्या** | **कृष्णा वारणा, अग्रणी, येरळा, माण, बोर** |
| 2 | धरणे | चांदोली धरण (क्षमता ३४.४० टी.एम.सी) |

### २. तापमान

| | | |
|---|---|---|
| **1** | **तापमान** | **२२.७ ते ३८.२डी.से.** |
| 2 | सांगली जिल्हा सरासरी पाऊस | ६२०.७० मि.मी. |

### ३. मातीचा प्रकार

| | | |
|---|---|---|
| **1** | **मातीचा प्रकार** | **टक्केवारी** |
| 2 | लॅटराईट ,काळी कसदार | ७०% |

### ४. सांगली जिल्हयामध्ये घेण्यात येणारी प्रमुख पिके

| प्रमुख खरीप पिके | प्रमुख रब्बी पिके | इतर पिके |
|---|---|---|
| ज्वारी,सोयाबीन, भाजीपाला,भूईमूग,मका बाजरी | हरभरा, गहू, तूर, मूग, उडीद, मका, | ऊस, डाळीं द्राक्षे, इ. |

### ५. पशुधन

| अ.क्र | प्राण्यांचे प्रकार | संख्या (जनगणना २०१९ नुसार) |
|---|---|---|
| 1 | गोजातीय | ३२४००० |
| 2 | म्हैस वर्गीय | ४८४००० |
| 3 | मेंढ्या व शेळ्या | ५८५००० |
| 5 | एकूण पशुधन | १४५३००० |

### ६. रस्ते /रेल्वे/वाहतूक व्यवस्था

| रस्ते /रेल्वे | कि.मी |
|---|---|
| रेल्वे मार्गाची लांबी | १७४ |
| राष्ट्रीय महामार्ग | ८१ |
| राज्य महामार्ग | १०३५ |
| प्रमुख जिल्हामार्ग | २८३२ |
| इतर जिल्हामार्ग | १९३४ |
| ग्रामीण रस्ते | ६०१२ |

### ७. आरोग्य सुविधा

| | |
|---|---|
| जिल्हा रूग्णालय | ०१ |
| उपजिल्हा रूग्णालय | ०२ |
| ग्रामीण रूग्णालय | १३ |
| प्राथमिक आरोग्य केंद्र | ५९ |
| पशुवैद्यकीय दवाखाने (राज्य तथा स्थानिक स्तर) | १५३ |

## प्रकरण 3

## आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005

**आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 31 व 32 नुसार आपत्ती योजनेमध्ये खालील घटकांचा समावेश करणे आवश्यक आहे.**

**1.** 1. सर्व प्रकारच्या संभावित आपत्ती असणाऱ्या क्षेत्राची माहीती

2. कोणत्याही आपत्तीस सामोरे जाणेकामी प्रतिबंध व सौम्यीकरण उपाय योजनाची माहीती प्रत्येक विभाग निहाय जिल्हास्तरावर असणे अत्यावश्यक आहे.
3. आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने क्षमताबांधणी आणि पूर्वतयारी अनुषंगाने प्रत्येक विभागाचे प्रतिसाद योजना आणि आवश्यक कार्यपध्दतीचा समावेश विविध आपत्तीना सामोरे जाताना आवश्यक आहे.
4. जिलह्यामधील प्रत्येक विभागाची स्थानिक स्तरावरावरती जबाबदारी निश्चित करणे.
5. प्रत्येक आपत्तीच्या कालावधीत तत्काळ प्रतिसाद देणे.
6. आपले विभागाकडील साहित्य सामग्री तयार ठेवणे
7. संपर्क यंत्रणा स्थापित करणे तसेच सुयोग्य माहीती जनतेपर्यंत पोहचविणे
8. याबाबत अत्यावश्यक माहीती असेल तर राज्य शासनास तात्काळ कळविणे
9. प्रत्येक वर्षी आपत्ती योजना /आराखडे विभागानिहाय अद्यावत करणे
10. जिल्हास्तरीय प्रत्येक विभागास आपत्ती व्यवस्थापन आराखडा याची एक प्रत असणे अत्यावश्यक आहे.
11. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन आराखडयाची एक प्रत राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास सादर करणे अत्यावश्यक आहे.
12. जिल्हा प्राधिकरण वेळोवेळी आवश्यक माहीती तसेच अमंलबजावणीसाठी उपलब्ध करण्यासाठी जिल्हास्तरीय विभागाना सूचना देऊ शकते.

**2. कलम 32** : भारत सरकार,राज्य शासन यांचेकडील जिल्हास्तरावरील प्रत्येक विभाग व स्थानिक स्तरावरील विभाग हा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे पर्यवेक्षण असेल. आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करणे त्यामध्ये खालील बाबीचा समावेश असावा

1. आपत्तीस प्रतिबंध आणि सौम्यीकरण योजनाची माहीती विभागनिहाय असणे अत्यावश्यक आहे
2. क्षमता बांधणी आणि पूर्वतयारी अनुषंगाने बाबतची माहीती अतंर्भूत असणे अत्यावश्यक
3. आपत्तीच्या कालावधीत प्रतिसाद योजना आणि कार्यपध्दती

**<u>3. अधिकार व सदंर्भ</u>**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कृती योजना आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 नुसार

1. आपत्ती व्यवस्थापन कृती योजना अद्यावतीकरण
2. आपत्ती व्यवस्थापन कृती योजना मंजूरी
3. अधिकार व जबाबदारी

जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण समिती मध्ये जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असतील व इतर कार्यान्वीतविभागाचे प्रमुख हे आपत्ती व्यवस्थापनामध्ये प्रमुख भूमिका बजावतील. तसेच जिल्हयामधील स्वंयसेवी संस्था यांचा सहभाग निश्चित करून घेणेत येईल.

**4. जिल्हाधिकारी यांचे कर्तव्ये**

1. आपत्तीपूर्व, आपत्तीच्या काळात व आपत्ती नतंर घडणाऱ्या घटनामध्ये विविध विभागामध्ये समन्वयाची भूमिका व आवश्यक सुविधा पुरविणे
2. प्रत्येक विभागाशी समन्वय ठेवून आपत्तीशी संबधित आवश्यक तो सल्ला /मार्गदर्शकपर परिणामकारक सुचना देणे.
3. आपत्ती व्यवस्थापनाशी सबंधित प्रशिक्षण कार्यक्रम, जनजागृती कार्यक्रम अत्यावश्यक सुविधा स्थानिक प्रशासनास मदत देणे.
4. आपत्तीमूळे घडलेल्या घटनामध्ये तात्काळ कृती करून प्रतिसाद व मदतकार्य करून आपत्तीमूळे झालेले परिणामाची तीव्रता कमी करणे
5. आपत्ती जाहीर करणेबाबत राज्य शासनास शिफारस करू शकते.

**5. स्थानिक प्रशासनाची कर्तव्ये**

1. जिल्हा प्रशासनाचे आदेशानुसार तत्काळ मदत कार्य करणे आपले विभागातील अधिकारी, कर्मचारी प्रशिक्षित असल्याची खात्री करणे तसेच उपलब्ध असलेले साहित्य सामग्री सक्षम असल्याची व आपत्तीच्या काळात वापर करणे योग्य असलेची खात्री करणे
2. विविध प्रशिक्षण कार्यक्रम व जन जागृती विविध समुदायकरीता राबविणे.
3. बांधकामे करीत असताना योग्य त्या मानकानुसार करणेत येत आहेत याची खात्री करणे.
4. शासनाचे प्रत्येक विभागाने जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापन योजना तयार करणे यामध्ये विभागानुसार मदत, पुनर्वसन, बाधंकाम इ. बाबत माहीती नमूद करणे.
5. स्थानिक स्वंयसेवी संस्था व मडंळे यांची मदत घेणे.
6. विभागानुसार आवश्यक पायाभूत सुविधा व साहित्य सामग्री यांची माहीती ठेवणे.

**खाजगी विभाग :**

1. आपत्ती चे अनुषंगाने पूर्वतयारी मध्ये सहभाग नोंदविणे
2. आपत्ती प्रतिबंधाचे अनुषंगाने स्थानिक प्रशासनाशी सबंधित नियमाचे पालन करणे.
3. सी.एस.आर नुसार आपत्ती धोकेकमी करणेसाठी आवश्यक तो सहभाग नोदंवून जिल्हा प्रशासनास सहाय्य करणे.

**स्वंयसेवी विभाग**

जिल्हाधिकारी यांचे सूचनेसार स्वयसेवी संस्था व इतर समुदाय मडंळे यांनी आपत्ती प्रतिबंध, सौम्यीकरण मध्ये सहभाग नोंदविणे.

आपत्ती व्यवस्थापनामध्ये योग्य ती भूमिका निभावणेकामी प्रशिक्षण कार्यक्रममध्ये सहभाग नोंदविणे.

**नागरिकाची भूमिका**

आपत्ती व्यवस्थापनामध्ये ज्यावेळी आवश्यक असेल त्यावेळी प्रत्येक नागरिकानी जिल्हा प्रशासनास सहकार्य करणे.

**<u>आपत्ती व्यवस्थापन कृती आराखडा वापर कार्यपध्दती</u>**

1. आपत्ती काळात जिल्हाधिकारी यांना जिल्हा आपत्ती प्राधिकरणचे अध्यक्ष यानुसार राज्य आपत्ती व्यवस्थापन योजनेनुसार सपूर्ण अधिकार असतील.
2. एखादी आपत्ती व्यवस्थापन कायदा कलम 31 नुसार प्रत्येक जिल्हयाला आपत्ती व्यवस्थापन आराखडा असणे आवश्यक आहे.
3. प्रत्येक आपत्तीस सामोरे जाताना नियत्रंण कक्ष पूर्णपणे सुसज्ज असणे अत्यावश्यक आहे.
4. घडणाऱ्या आपत्तीची तत्काळ माहीती जनतेस तसेच जिल्हा माहीती अधिकारी यांचेमार्फत आपत्तीशी संबंधित सूचना देणे
5. जिल्हा सीमावरती घडणाऱ्या आपत्तीशी सामना करण्या करीता जवळच्या जिल्हयाशी समन्वयाची भूमिका ठेवणे.
6. विविध विभाग, यंत्रणा, संघटना यांचे आपत्तीच्या कालावधीतील प्राथमिक भूमिका नमूद करून आपत्ती व्यवस्थापन आराखड्याशी संबंधित योजनेशी सलग्न ठेवणे.
7. जिल्हा नियंत्रण कक्ष हा राज्य नियंत्रण कक्ष, भारत सरकार यांचे विविध विभाग उदा.हवामान खाते, सेंट्रल वॉटर कमिशन, इ यांचेशी संपर्कात राहून संभाव्य पूर परिस्थिती, वादळे, इ.आपत्तीशी माहीती तत्काळ प्राप्त करून जनतेस पूर्वसूचना देणे
8. स्थानिक ठिकाणी अत्यावश्यक साहित्यसामग्री उपलब्ध नसलेस राज्य नियंत्रण कक्षाशी अथवा योग्य त्या कृतीनुसार मागणी करणे.
9. आपत्तीमूळे शासकीय संस्थामध्ये अनेक अडथळे निर्माण होऊ शकतात याचा यासाठी स्थानिक स्वराज्य संस्था आणि त्याचे विभाग यांनी याकरीता कृती प्रक्रीया तयार करणे.

**<u>पूर्वसूचना कार्यपध्दती</u>**

<u>जिल्हास्तर, तालुकास्तर, गावस्तर करिता पूर्वसूचना आणि आवश्यक कृतीकरिता आवश्यक असणाऱ्या सूचना तात्काळ देणेत याव्यात. सबंधित विभागाकडून मिळालेल्या सूचनेनंतर राज्य नियंत्रण कक्ष तात्काळ जिल्हा नियत्रंण कक्षाशी संपर्क करेल व आवश्यक माहीती खालील प्रमाणे देईल.</u>



**<u>पूर्वसूचने शिवाय कार्यपध्दती :</u>**

<u>एखादी आपत्ती पूर्वसूचनेशिवाय घडली तर त्या ठिकाणाची माहीती तेथील शासकीय यंत्रणेमार्फत खालील प्रमाणे देण्यात यावी.</u>

1. सबंधित आपत्तीग्रस्त गाव यांनी ग्रामपंचायत, पंचायत समिती, तहसिलदार, उपविभागीय अधिकारी, पोलिस, जिल्हाधिकारी यांचेमार्फत उपायुक्त यांना माहीती देणेत यावी.
2. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण प्राप्त माहीती घेऊन त्याचे आपत्तीच्या तीव्रतेनुसार त्याची माहीती घेईल.
3. तसेच आवश्यकते नुसार जिल्हा नियंत्रण कक्ष कार्यन्वित करणेत येईल.
4. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण आवश्यकतेनुसार बैठक घेईल आणि आपत्तीचे योग्य व्यवस्थापन करेल.
5. तत्काळ प्रतिसाद देणेकामी प्रतिसाद पथक त्या ठिकाणी कार्यन्वित करणेत येईल.

<u>राष्ट्रीय</u>, राज्य आपत्ती प्राधिकरण यांचे मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हास्तरीय आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन, समन्वय इ करणेत यावे. तसेच जिल्हातरीय कृती योजना तयार करताना स्थानिक शासकीय यंत्रणेशी संपर्क करून करणेत यावा.

**आपत्ती व्यवस्थापन आराखडा मंजूरी**

आपत्ती व्यवस्थापन कलम 30 नुसार आपत्ती व्यवस्थापन करीता सहकार्य, कार्यन्वित करणे योग्य कृती /अमंलबजावणीकरीता जिल्हा आपत्ती व्यवस्थापन महत्त्वपूर्ण कार्य राष्ट्रीय तसेच राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांचे मार्गदर्शक तत्वानुसार करणेत यावे.

**योजना अद्यावतीकरण**

आपत्ती व्यवस्थापन कृती योजना तयार झालेनंतर त्यानुसार अत्यावश्यक ज्ञान, क्षमता अत्यावश्यक असून त्यासाठी प्रशिक्षण देणे योग्य ठरते. आपत्ती व्यवस्थापन कृती योजनेचा प्रभावी अमंलबजावणी कामी प्रशिक्षण, घटना, निर्णय, प्रतिसाद, वेळ इ घटकाचा वापर करून आपत्ती व्यवस्थापनाची तयारी योग्यरित्या होऊ शकते.जिल्हा आपत्ती कृती योजना दरवर्षी अद्यावत करणेत यावी. जेणेकरून आपत्ती व्यवस्थापनकरताना अत्यंत उपयुक्त ठरेल.

# आपत्तीच्या काळी विविध खात्याकडून पार पाडावयाच्या जबाबदाऱ्या प्रमाणित कार्य पध्दती

# (Standard Operating Procedure)

## 1.महसूल विभाग:-

2. जिल्हाधिकारी
3. अतिरिक्त जिल्हाधिकारी
4. निवासी उपजिल्हाधिकारी
5. उपजिल्हाधिकारी
6. उपविभागीय अधिकारी
7. तहसिलदार
8. नायब तहसिलदार
9. मंडळ अधिकारी
10. तलाठी

**(1) जिल्हास्तर**

1. विविध शासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि स्वयंसेवी संस्था यांच्या कामात समन्वय साधणे व मार्गदर्शन करणे.
2. अपर जिल्हाधिकारी आणि निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली जिल्हा नियंत्रण कक्ष पूर्ण वेळ सुरू ठेवणे व तातडीच्या संदेशांना तात्काळ प्रतिसाद करणे.
3. आपत्कालीन परिस्थितीचा मुकाबला करण्याकरिता प्रशिक्षित मनुष्यबळ, व साधनसामग्री उपलब्ध करणे. जिल्हास्तरीय शोध व बचाव पथक गठीत करणे.
4. होमगार्डसच्या सेवा अधिग्रहीन करण्याचे आदेश काढणे.
5. अशासकीय / स्वयंसेवी संस्थाच्या कामावर नियंत्रण व पर्यवेक्षण ठेवणे.
6. आपत्कालीन परिस्थितीच्या मुकाबल्यासाठी सर्वसामान्यांना माहिती पुरविणे. जिल्हा माहिती अधिकारी यांच्या मार्फत प्रसार माध्यमांना माहिती पुरविणे.
7. मंत्रालय मुंबई येथील राज्य नियंत्रण कक्षाशी तसेच आयुक्त कार्यालयातील विभागीय नियंत्रण कक्षाशी सतत संपर्कात राहून माहिती देणे व आवश्यक मदत मिळविणे.
8. व्ही- सॅट दूरध्वनी वायरलेस, व्हिडीओ कॉन्फरसिंग, ई-मेल फॅक्स इत्यादी संपर्क यंत्रणा अदयावत ठेवणे.
9. आवश्यकतेनुसार सैन्यदल, नाविकदल व हवाई दल यांची तातडीने मदत घेण्याकरिता मागणी नोंदविणे, संबंधित यंत्रणांशी पुरेशा वेळेअगोदर संपर्कात राहणे.
10. दैनिक पर्जन्यमान, प्रमुख ठिकाणाची नदयांची पाणी पातळी, प्रमुख धरणातील पाणी साठा आणि विसर्ग याबाबत दैनंदिन नोंदी ठेवणे.

11. हवामान खात्याच्या कार्यालयाशी संपर्कात राहून हवामान विषयक अंदाज प्राप्त करून घेणे व आवश्यकतेनुसार सुचना प्रसारित करणे.
12. आपत्ती काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना करणे.
13. पूरपरिस्थितीत बचाव आणि मदत कार्य कामाचे नियंत्रण व पर्यवेक्षण करणे.
14. पूरपरिस्थिती ओसरल्यानंतर पुनर्वसक विषयक कामाचे नियोजन व अंमलबजावणी.
15. जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या नियंत्रण व पर्यवेक्षणाखाली पूरबाधित व स्थलांतरीत लोकांना खादयपदार्थ, अन्नधान्य, केरोसिन इत्यादी जीवनाश्यक वस्तूचा पुरवठा करणे तसेच तात्पुरत्या शिबिरातील सर्व आवश्यक सोई सुविधांची पूर्तता करणे.
16. आपदग्रस्त भागातील विविध कामाकरिता सर्व विभागांतील अधिकारी व कर्मचा-यांच्या सेवा अधिग्रहित करणे.

**(2) उपविभाग स्तर**

1. उपविभाग अधिकारी हे त्यांच्या उपविभागातील संपूर्ण क्षेत्रातील नैसर्गिक आपत्तीविषयक कामाचे नियंत्रण व पर्यवेक्षाकरिता जबाबदार असतील. त्यांची प्रमुख कामे पुढीलप्रमाणे असतील.
2. उपविभाग आणि तहसिल स्तरावर पूर्णवेळ नियंत्रण कक्ष स्थापित करून सतत २४ तास कार्यान्वित ठेवणे.
3. कार्यालयीन आणि वाहनातील वायरलेस यंत्रणा, दूरध्वनी, ई-मेल,व्ही-सॅट, फॅक्स यंत्रणा पूर्णवेळ चालू स्थितीत ठेवणे व त्याठिकाणी जबाबदार कर्मचा-याची नियुक्ती करणे.
4. दैनिंदिन पर्जन्यमानाच्या नोंदी, दुर्घटना, जिवित अथवा वित्तहानी, शेतीपिकाचे नुकसान इत्यादि बाबतचे अहवाल दुस-या दिवशी सकाळी ११.०० वाजेपर्यंत जिल्हा नियंत्रण कक्षास कळविणे.
5. आपत्ती काळात आवश्यकतेनुसार महसूल व अन्य विभागाचे कर्मचारी आपत्तीच्या ठिकाणी प्रतिनियुक्त करणे.
6. आपत्तीची पूर्वसुचना मिळताच अथवा धोक्याची सुचना मिळताच बाधित क्षेत्रातील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलवणे व तात्पुरती शिबिरे सुरू करून जीवनाश्यक वस्तूचा पुरवठा सुरू करण्याची दक्षता घेणे.
7. पूर बाधीत कुटुंबांना शासकीय नियमानुसार देय सानुग्रह अनुदान, केरोसिन यांचे वाटप तात्काळ सुरू करून पात्र व्यक्तींना योग्य वाटप होईल यावर पर्यवेक्षण करणे.

8. पूर ओसरल्यानंतर बाधित घरे व बाधित शेती यांच्या नुकसानीचे पंचनामे महसूल, कृषी बांधकाम ग्रामविकास विभागाच्या संयुक्त पथकाकडून तातडीने करण्यात येईल व पात्र व्यक्तीनांच यथाशिघ्र अनुज्ञेय मदत दिली जाईल याकडे व्यक्तिशः लक्ष देऊन नियंत्रण व पर्यवेक्षण करणे.
9. पूरपरिस्थिती ओसरल्यानंतर बाधित गावांचे / कुटुंबाचे पुनर्वसन, वाहून गेलेल्या शेतजमिनीवरील शेतसारा कमी करणे इत्यादी कामाचे नियोजन व पर्यवेक्षण करणे व मार्गदर्शन करणे.

**(3) तालुका स्तर**

1. तालुक्यातील नैसर्गिक आपत्ती संबंधीत सर्व कामाचे नियोजन, नियंत्रण, पर्यवेक्षण व अंमलबजावणी याकरिता तहसिलदार जबाबदार राहतील. त्यांची प्रमुख कामे पुढीलप्रमाणे असतील.
2. तालुक्यातील सर्व शासकीय विभागाशी समन्वय साधणे व नेतृत्व आणि मार्गदर्शन करून नैसर्गिक आपत्तीवर सामुहिक प्रयत्नाने उपाययोजना करणे.
3. तहसिल कार्यालयात पूर्णवेळ नियंत्रण कक्ष कार्यान्वित करणे, दिवसाचे २४ तास अनुभवी व कार्यक्षम कर्मचा-यांची नियुक्ती करणे व संपर्कयंत्रणा अदयावत ठेवणे.
4. आपदग्रस्त गावांची आणि गावातील आपदग्रस्त / पूरबाधित क्षेत्रातील घरे, कुटुंब आणि व्यक्ती यांच्या यादया करून संपूर्ण रेकॉर्डची प्रत तहसिल कार्यालयात उपलब्ध ठेवणे.
5. गावनिहाय मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, पोलीस पाटील, कृषी सहाय्यक, आरोग्यसेवक, मुख्याध्यापक, सरपंच, जिल्हा परिषद / पंचायत समिती सदस्य व अन्य प्रतिष्ठित व्यक्ती यांची दक्षता समिती स्थापन करून, सभा घेवून पूरपरिस्थितीतील करावयाच्या कार्यवाहीबाबत जनतेला आगावू माहिती देणे.
6. प्रत्येक गावात २००५ व २०१९ ची महत्तम पूरपातळी दर्शविणा-या खुणा सर्व महत्वाच्या ठिकाणी कायमस्वरूपी राहतील या पध्दतीने मार्किंग करणे.
7. दैनंदिन पावसाच्या नोंदी जिल्हा कार्यालयास कळविणे तसेच पाणीसाठा नदीची पाणीपातळी, अतिवृष्टी / पुरामुळे घडलेल्या दुर्घटना, जिवित अथा वित्तहानी, शेती पिकांचे नुकसान याबाबतचे अहवाल दुस-या दिवशी सकाळपर्यंत जिल्हा नियंत्रण कक्षास पाठविणे.
8. हवामान विषयक अंदाजाच्या पूर्वसूचना, धोक्याचे इशारे याबाबतची माहिती सर्व गावात तात्काळ प्रसारित करण्यात येईल याची दक्षता घेणे. अफवा पसरविण्या-या विरूध्द कारवाई करणे.

9. आपत्तीकाळात नागरिकांना सुरक्षित स्थळी हलविण्यासाठी गावनिहाय समन्वय अधिकारी तसेच अंमलबजावणी कर्मचारी नियुक्त करणे.
10. गावनिहाय उपलब्ध बोटी यांची माहिती तसेच नावाडी, पुरामध्ये पोहू शकणा-या व्यक्तींची यादी, गावातील डॉक्टर्स, पशुवैदयक, यांच्या यादया तहसिलस्तरावर उपलब्ध ठेवणे.
11. तात्पुरत्या स्थलांतरणासाठी, शिबिरासाठी शाळा, समाजमंदिरे, सभागृह इत्यादी सार्वजनिक ठिकाणे निश्चित करून ठेवणे. अशा ठिकाणी स्वच्छ पिण्याचे पाणी कोठून उपलब्ध होईल याची माहिती घेवून व्यवस्था करणे.
12. पूरबाधित कुटुंबाना सानुग्रह अनुदान, अन्नधान्य व केरोसिन यांचे वाटप नियमानुसार करणे, संयुक्त पथकाव्दारे पंचनामे तात्काळ सुरू करणे.
13. अंशतः व पूर्णतः बाधित घरांच्या नुकसानीचे पंचनामे तलाठी, ग्रामसेवक आणि शाखा अभियंता यांच्या संयुक्त पथकाद्वारे करण्या करिता नियुक्ती आदेश निर्गमित करणे व पूर ओसरताच वस्तुनिष्ठ पंचनामे व नुकसानीचे मूल्याकंन करून पात्र व्यक्तीना देय मदत वाटप सुरू करणे. अतिक्रमित घरांच्या स्वंतत्र नोंदी ठेवणे.
14. बाधित शेती पिकांच्या नुकसानीचे पंचनामे तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्या संयुक्त पथकाद्वारे करण्याकरिता तालुका कृषी अधिकारी यांच्या कार्यालयाकडून आदेश काढणे व तात्काळ पंचनामे पूर्ण करून तालुका कृषी अधिकारी व तहसिलदार यांचा संयुक्त अहवाल पाठवणे.
15. पूर बाधित कुटुंबातील व्यक्ती स्थलांतरीत कुटुंबे व तात्पुरत्या शिबिरातील नागरिकांना पुरेसे स्वच्छ पिण्याचे पाणी, कपडे खादय पदार्थ, वैदयकीय मदत व औषधोपचार, जनावरांना चारा इत्यादीकरिता उपलब्धतेची खात्री करून घेणे. प्रत्येक शिबीराकरिता संपर्क अधिकारी व विविध विभागातील कर्मचारी यांचे पूर्णवेळ नेमणूका करणे याकरिता सामाजिक संस्था व दानशूर व्यक्तीचे सहाय घेणे.
16. आपदग्रस्त भागात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याची दक्षता घेणे.

**(4) ग्रामस्तर**

1. मंडळ अधिकारी हे मंडळातील सर्व गावातील आणि तलाठी हा सझातील सर्व गावातील नैसर्गिक आपत्ती विषयक सर्व कामाचे नियोजन व अंमलबजावणीस जबाबदार राहतील. त्यांची प्रमुख कामे पुढीलप्रमाणे असतील
2. गावनिहाय महत्तव पूर पातळी दर्शक 2005 व 2019 च्या पुराचे कायमस्वरूपी मार्किग करून पूर बाधीत क्षेत्रातील घरे, कुटुंबे व व्यक्ती तसेच कुटुंब निहाय

जनावरांची दक्षता पथके कार्यान्वित करून गावक-याना सभा घेवून पूर परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना व घ्यावयाची खबरदारी यांची माहिती देणे.

3. गावनिहाय दक्षता पथके कार्यान्वित करून गावक-याना सभा घेवून पूर परिस्थितीत करावयाच्या उपाययोजना व घ्यावयाची खबरदारी यांची माहित देणे.
4. पूर्णवेळ मुख्यालयात उपस्थित राहून अधिनस्त सर्व गावातील दैनदिंन घटनांची नोंद घेणे, दुर्घटना, जिवीत व वित्तहानी, जनावरांची हानी, पिकांचे नुकसान अतिवृष्टी, पर्जन्यमान जलाशयातील पाणी साठे, नदीची पाणी पातळी यांची दैनंदिन माहिती तहसिल कार्यालयाच्या नियंत्रण कक्षात सादर करणे.
5. हवामान अंदाजाच्या पूर्वसूचना, धोक्याचे इशारे याची माहिती सर्व गावात तातडीने प्रसारित करणे. पूरप्रवण क्षेत्रातील नागरिकांना अगोदरच सुरक्षितस्थळी हलविणे.
6. पूरात अडकलेल्या व्यक्तीच्या सुटकेसाठी बोटींच्या सहाय्याने प्रयत्न करणे.
7. तात्पुरत्या शिबिरांची ठिकाणे निश्चित करून त्याठिकाणी पाणी व अन्य व्यवस्था करणे. शिबिरातील लोंकाकरिता सामाजिक सहकार्यातून तसेच शासकीय अन्नधान्यातून जेवण तयार करून देणे.
8. पूरबाधित कुटुंबाचे /घरांचे नियमानूसार संयुक्त पथकाद्वारे पंचनामे करून तहसिलदार यांचे आदेश घेवून पात्र बाधित कुटुंबाना तातडीने नियमानूसार अन्नधान्य व केरोसिनचे वाटप करणे.
9. सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र कुटुबाची प्रकरणे पंचनाम्यासह तहसिलदार यांना सादर करून मंजूर प्रकरणातील पात्र व्यक्तींना अनुदानाचे वाटप करणे व हिशोब सादर करणे.

## 2 पोलिस विभाग:-

- पोलिस अधीक्षक
- पोलिस उपअधीक्षक
- पोलिस निरीक्षक
- पोलिस उपनिरीक्षक
- पोलिस पाटील

### 1. आपत्ती पूर्व नियोजन

1. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरिष्ठ अधिका-याची नोडल अधिकारी म्हणून नेमूणूक करतील.

2. आपत्कालीन परिस्थितील सामोरे जाण्यासाठी तो जिल्हा, तालुका पातळीवर पोलिस खात्यातील अधिकारी व कर्मचा-यांची स्वतंत्र आणि बहूव्यापक अशी यंत्रणा बनवेल, जिल्हयातील सर्व पोलिस ठाणे व दूरक्षेत्रातील संपर्क साधण्याविषयी तपशील नियंत्रण कक्षास देईल.
3. आपत्तीच्या वेळी /परिस्थितीत उपयोगी येणा-या मनुष्यबळ व इतर संसाधनाची माहिती संकलित करून दर सहा महिन्यांनी अदयावतीकरण करणे.
4. जिल्हा पोलिस नियंत्रण कक्ष व पोलिस दुरसंचार यंत्रणा निरंतर कार्यान्वीत व अदयावत राहतील यासाठी उपाययोजना करणे.
5. शोधकार्य आणि सुटकाकार्य यासाठी लागणा-या पोलिस खात्याच्या अखत्यारीतील उपकरणांची सुसज्जता व उपलब्धता अबाधित ठेवण्यासाठी पूर्वतयारी करणे.
6. असामाजिक घटकांचा तपशिल ठेवतील.
7. जिवीतहानी नंतर त्वरीत कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी आपत्कालीन स्थळांवर कार्यरत पोलिस अधिका-यांना ठोसनिर्णय घेता यावेत यासाठी योग्य दिशा निर्देश तयार करतील.
8. आपत्कालीन व्यवस्थापन योजनेविषयी संबंधित असलेले तपशिल अदयावत करणे.
9. विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना आपत्कालीन व्यवस्थापन विषयावर प्रशिक्षित करणे.
10. शोध व बचाव पथक तयार करून पथकातील सदस्यांना प्रशिक्षण देणे.

**2. धोक्याची किंवा आपत्तीची सूचना मिळताच-**

1. पोलिस विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सूचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखा मार्फत कारवाई करतील.
2. आपत्ती बाधीत क्षेत्रामध्ये वाहतुक सुरळीत राहील व यासाठी व्यवस्था करतील.
3. आपत्कालीन परिस्थितीतील आणि आपत्कालीन शिबीरातील लोकांच्या सुरक्षेची व्यवस्था करेल.
4. आपात्कालीन साहित्याचे वाहतूक करण्यासाठी सुरक्षितता प्रदान करेल व आवश्यक असल्यास मदत करेल.
5. हानीप्रवण क्षेत्रातील वाहतूक लोकांची सुरक्षिततेसाठी तसेच मालमत्तेच्या संरक्षणासाठी तालूका /जिल्हा नियंत्रण कक्षाशी संपर्क करणे.
6. जिल्हयातील काळाबाजार करणा-यावर नियंत्रण ठेवण्यासाठी संबंधित अधिका-यांना मदत करणे.

7. आपात्कालीन क्षेत्रातील लोकांचे स्थलांतर करण्यासाठी संबंधित अधिका-यांना मदत करतील. आपत्तीग्रस्त भागातील चो-या लुटपाट यावर नियंत्रण ठेवून कायदा आणि सुव्यवस्था करणे.
8. आवश्यकतेनुसार दळणवळणांच्या सर्व साधानांचा आणि वाहनांचा वापर करून संदेश देण्याची व मदत पोहचविण्याची व्यवस्था करणे.
9. वरील सूचना मिळताच आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकारी यांच्याकडे मनुष्यबळ / साधनांची मागणी करणे.

**3) आपत्ती नंतरचे कार्य -**

1 आपत्तीचा प्राथमिक अंदाज घेऊन त्याविषयी संबंधीत कर्मचा-यांशी सल्लामसलत करणे व झालेल्या नुकसानीचा प्राथमिक अहवाल बनविण्यास मदत करणे.

2 आपत्तीग्रस्त भागातील चो-या, लुटपाट यावर नियंत्रण ठेवून कायदा आणि सुव्यवस्था राखणे, शोध आणि सुटका कार्यासाठी एन सी सी / व्ही टी एफ / एन जी ओ इत्यादींची जुळवाजुळव करणे / समन्वय राखणे.

3 आपत्कालीन शिबीराची आणि आपत्कालीन मदत वस्तुंच्या साठ्याशी / ठिकाणाच्या सुरक्षिततेची व्यवस्था करणे.

4 आपत्कालीन साहीत्याच्या वाटपावेळी कायदा आणि सुव्यवस्था राखणे सुरक्षित ठिकाणी हलविणा-या कृती गटाला मदत करणे.

5 मृत व्यक्तींच्या शरीरांची (प्रेतांची) विल्हेवाट लावण्यासाठीच्या कायदेशीर बाबींची ताबडतोब पूर्तता होण्याची व्यवस्था करणे.

## 3 नगरपालिका विभाग:-

**1. आपत्ती पूर्व नियोजन**

**आपत्ती व्यवस्थापनासाठी नगरपालिकेने खालील कृती करावी.**

1 आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते वरिष्ठ अधिका-यांची ते नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.

2 आपत्कालीन व्यवस्थापनासाठी आवश्यक मनुष्यबळ साधने यांची विस्तृत माहिती संकलित करणे व दर सहा महिण्यांनी त्यांचे अद्यावतीकरण करणे.

3 जिल्ह्यातील शहरात भूकंप, पूर, वादळे, रोगराई इ. आपत्तींना प्रभावीपणे व तत्परतेने प्रतिसाद देण्यासाठी वार्डनिहाय सर्वकष योजना तयार करतील. यात प्रशिक्षीत मनुष्यबळ, पुरेशी आवश्यक साधनसामुग्री, औषधे सुरक्षित पेयजल व वितरण व्यवस्था, इत्यादीचा समावेश असावा.

4 अधिकार कक्षेतील पाण्याच्या साठ्याला जर काही गळती निर्माण झाली तर त्यासंबंधी त्वरीत करावयाच्या कृतीची माहिती तयार करणे.

5 आपात्कालीन व्यवस्थापन विषयावर विभागाच्या सर्व अधिकारी व कर्मचा-यांना प्रशिक्षीत करणे.

6 वेळोवेळी व विशेषत: पावसाळा सुरु होण्याआधी पेयजल वितरण यंत्रणेची तपासणी व दुरुस्तीसाठी प्रमाणित कार्यपध्दती तयार करणे.

7 कार्यक्षेत्रात होणाया बांधकामाविषयी Developmental Control Regulation, National Building Code, is-456-2000, Is 1893-2001 ची अमंलबजावणी व त्या अनुषंगाने Building By-Laws बनविण्याचे नियोजन करणे.

8 पर्जन्य जलपुनर्भरण व्यवस्था विकासाचा भाग म्हणून अंगीकृत होण्यासाठी योजना राबविणे

9 शहरी भागामध्ये मान्सून पूर्वतयारीच्या अनुषंगाने नदीचे / नाल्यांचे नैसर्गिक पात्र मोकळे करण्यात यावे. पुराचे पाणी वाहून नेणाया नैसर्गिक प्रवाहाचा अवरोध दूर करण्यात यावा.

10 नगरपालिका क्षेत्रातील सांडपाणी निचरा प्रणालीतून गाळ काढून त्याची साफसफाई करुन व्यवस्थित ठेवावे. सदर काम व्यवस्थितरित्या पार पाडले किंवा नाही यांची Inspection द्वारे खात्री करावी.

11 अधिकारी / कर्मचारी यांना मान्सून पूर्वतयारीचे महत्व पटवून देऊन याबाबतची कामे पूर्ण करुन घ्यावीत. जेणेकरुन जनतेला कमीत कमी त्रास होईल तसेच संभाव्य जिवीत व वित्तहानी कमी होईल याची दक्षता घ्यावी.

12 शोध व बचाव पथक तयार करुन त्यांना प्रशिक्षण द्यावे.

**2) धोक्याची किंवा आपत्तीची सूचना मिळताच.**

1. विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सूचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखामार्फत कारवाई करतील
2. शहरात व परिसरात ठिकठिकाणी होणाया मानव हानी, इमारतीचे नुकसान, सार्वजनिक सेवा सुविधांना झालेले नुकसान, मृत पशु इत्यादींची माहिती जिल्हा नियंत्रण कक्षास पुरविणे.
3. आपात्कालीत प्रतिसादासाठी मनुष्यकळ व साधनसामुग्री उपलब्ध करुन देणे, शोध आणि सुटका मोहिमेकरिता येणा-या अडचणी दूर करण्यासाठी संबंधितांना मदत करणे.

**3) आपत्ती नंतरचे कार्य -**

1. तज्ञ कुशल अधिका-यांच्या मदतीने आपदग्रस्त स्थितीसंबंधी अचुक चित्र मिळविणे व झालेला प्राथमिक अहवाल तयार करणे.
2. खंडीत पडलेल्या सार्वजनिक सेवा सुविधा सुरक्षितपणे व तत्परतेने कार्यरत करणे, आपतग्रस्त भागात रोगराई पसरणार नाही यासाठी खबरदारी घेणे.
3. शोध व सुटका, मदत कार्यासाठी संबंधीतांना मदत करणे
4. अधिकार क्षेत्रातील प्रेते व मृत जनावरांची योग्य त्या कायदेशीर कार्यवाहीनंतर तत्परतेने विल्हेवाट लावणे.
5. आपात्कालीन क्षेत्रातील जनजीवन सामान्य व पुर्ववत होण्यासाठी संबंधित अधिका-यांना मदत करतील.
6. आपातग्रस्त भागात अग्निशमन दलाची सेवा उपलब्ध करुन देणे.

## 4) आरोग्य विभाग :-

**(जिल्हा शल्य चिकित्सक/ जिल्हा आरोगय अधिकारी, जिल्हा परिषद)**

1. जिल्हा आरोग्य अधिकारी / जिल्हा शल्य चिकित्सक
2. अतिरिक्त जिल्हा बारोग्य अधिकारी
3. वैद्यकीय अधिकारी (प्राथिमक आरोग्य केंद्र)

### 1) आपत्ती पूर्व नियोजन-

1. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरिष्ठ अधिकायांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
2. आपत्कालीन व्यवस्थापन आरोग्य विषयक स्वतंत्र नियोजन व प्रथम प्रतिसाद दलाचे आवश्यक माहितीसहित सुचिकरण करणे..
3. मध्यवर्ती आरोग्य केंद्र (जिल्हा रुग्णालय) च्या नियंत्रण कक्षाशी माहितीची देवाणघेवाण करण्याची रचना.
4. जीवनावश्यक औषधी, लसीची नियमीत उपलब्धता ठेवण्यासाठी नियोजन करतील.
5. वाहनांची व संबंधित साहित्यांची देखभाल, उदा. ॲम्बुलन्स, जीप, जनरेटर इत्यादी.
6. आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये अधिकारी / कर्मचा-यांची पुर्नविभागणी करुन कामाचे वाटप करण्यासाठी नियोजन.
7. खाजगी व्यवस्था करणारे डॉक्टर्स अथवा वैद्यकिय सोयी सुविधा यांची यादी करणे.
8. फिरते दवाखान्यासाठी नियोजन.
9. आपत्तीमध्ये वेगवेगळया गावांमध्ये काम करणा-या वैद्यकीय सेवांची माहिती ठेवणे
10. आपत्तीमध्ये व त्यानंतर उद्भवणा-या संसर्गिक रोग व उपाय या माहितीचा प्रसार

करण्यासाठी नियोजन.

11. रक्त पेढ्या / रक्तदात्यांचे पत्ते दुरध्वनी क्रमांक इत्यादींची सविस्तर माहिती संकलीत करण्यासाठी नियोजन.

12. डी.एम.टी. ना प्रथमोपचारविषयी प्रशिक्षण देणे.

13. आपत्तीग्रस्त योजनेच्यावेळी वैदयकीय उपचारासाठी लागणा-या उपलब्धता करून देण्यासाठी कृतीशील योजना तयार करणे.

14. आणीबाणी परिस्थितीत आवश्यक असणा-या उपकरणांची उपलब्धता होण्यासाठी विविध सरकारी योजना, खाजगी डॉक्टर्स खाजगी रूगणालय, किंवा घटकांशी समन्वय करणे.

15. आपत्ती व्यवस्थापन आराखडा व उपाययोजना प्लॅन तयार करणे.

**2) धोक्याची किंवा आपत्तीची सूचना मिळताच**

1. विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपात्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सुचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखामार्फत कार्यवाही करतील.
2. आपतग्रस्त क्षेत्रात तत्परतेने प्रथमोपचार केंद्र उभारणे व कार्यन्वित करणे.
3. आपतग्रस्तासाठी उपचार केंद्रात नियंत्रण कक्ष कार्यन्वित करणे व त्यात दुरसंचार व्यवस्था अखंडपणे चालू राहील, हि दक्षता घेणे.
4. आपल्याजवळ उपलब्ध असलेल्या महत्वाच्या औषधी, जीवरक्षक औषधी, इत्यादी पुरेशा मात्रेत असल्याची खात्री करून घेणे आणि आवश्यकता भासल्यास जिल्हयाकडून जादा पुरवठा होण्यासंबंधी संपर्क करणे.
5. आणीबाणीच्या कामासाठी स्थानिक डॉक्टर्स व स्थानिक स्वयंसेवक संघटीत करून त्यांची मदत घेणे.
6. रक्तदानासाठी तयार केलेल्या यादीप्रमाणे रक्तदात्यांशी संपर्क करणे.

**3) आपत्ती नंतरचे कार्य**

1. आपत्कालीन परिस्थितीनंतरच्या कामासाठी फिरते दवाखाने कार्यन्वित करणे.
2. जखमीवर प्रथमोपचार करणे आणि गंभीर जखमी व्यक्तींना जवळच्या दवाखान्यात किंवा प्राथमिक आरोग्य केंद्रात हलविणे.
3. आपत्कालीन क्षेत्रात त्वरीत ओषधांचा पुरेसा साठा पाठविणे.
4. आपत्तीग्रस्त क्षेत्रासाठी जिल्हयाकडुन किंवा जिल्हयाबाहेरून अतिरिक्त उपलब्ध झालेल्या कर्मचा-यांची आपदग्रस्त क्षेत्रात किंवा उपचार केंद्रात नेमणूक करणे.
5. रोगांचा प्रादुर्भाव होवू नये म्हणून आवश्यक कार्यवाही करणे.
6. गंभीर जखमी लोकांना दवाखान्यात रूग्णालयात हलविणे.
7. मृत पावलेल्या व्यक्तीचे नियमानुसार त्वरीत शवविच्छेदन करणे.

8. आपातग्रस्त क्षेत्रातील अन्न खाण्यालायक व पाणी पिण्यायोग्य असल्याची खात्री करून घेणे.

## 5) पाटबंधारे (कार्यकारी अभियंता)

कार्यकारी अभियंता, पाटबंधारे हे जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे पदसिध्द सदस्य असून त्यांनी राज्य शासनाच्या जलसंपदा विभाग, जिल्हा परिषद पाटबंधारे विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, केंद्रीय जल आयोग व अन्य यंत्रणाच्या कामात समन्वय साधून प्रतिबंध व नियंत्रण उपाययोजनांची कार्यवाही करावयाची आहे. याकरिता त्यांनी जलसंपदा विभागाशी समन्वय साधून कामाचा कृती आराखडा व प्रतिसाद योजना स्वतंत्रपणे तयार करून जिल्हाधिकारी यांना सादर करावी.

### 1) आपत्ती पूर्व नियोजन

**जिल्हा आपत्ती व्यवस्थापनासाठी जलसिंचन विभागाने खालील कृती करावी.**

1. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरिष्ठ अधिका-याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
2. जिल्हयातील पाणी साठा व संबंधित व्यवस्थापनासाठी विभागाचा स्वतंत्र नियंत्रण कक्ष उभारणे व कार्यन्वित करणे.
3. जिल्हयातील सर्व पाणी साठयांच्या स्थळी नियुक्त अधिकारी / कर्मचारी दुरसंचारांच्या साधनामार्फत नियमीत व अखंडपणे विभागाचा नियंत्रण कक्षाची संर्पकात राहण्यासाठी नियोजन व व्यवस्था करणे.
4. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी आवश्यक मनुष्यबळ साधने यांची विस्तृत माहिती संकलीत करणे व दर सहा महिन्यांनी त्यांची अदयावतीकरण करणे.
5. जिल्हयातील सर्व संपर्क रस्ते गांवे आणि पुर स्थळे यांची विस्तृत माहिती तयार करणे.
6. मोठया पाण्याच्या साठयाला जर काही गळती निर्माण झाली तर त्या संबंधी त्वरीत करावयाच्या कृतीची माहिती तयार करणे,
7. सर्व कर्मचा-यांना आपत्कालीन व्यवस्थापन विषयावर प्रशिक्षण देणे.
8. प्रत्येक मोठया जलाशयासाठी प्रभावीपणे नियंत्रण कक्ष राबविणे.
9. साधारण परिस्थिती मध्ये तलाव, नदी, किनारा, कालवा कडे जाणारा रस्ते इत्यादीची वेळोवेळी विशेषत: पावसाळा सुरू होण्याआधी तपासणी करणे.
10. विविध जलसाठयात सुरक्षित पाण्याची पातळी ठेवण्यासाठी जर साठयातून पाणी निर्गत करावयाची गरज असल्यास अथवा जल साठयाच्या क्षमतेपेक्षा जास्त पाणी साठयाची शक्यता असल्यास तशी माहिती त्वरीत संबंधीत तालुका नियंत्रण कक्ष व जिल्हा कक्षास देण्याची योजना तयार करणे.

11. पूर रेषेची पूर्ण आखणी करणे , धरणासाठी कृती आराखडा तयार करणे, धरणाच्या साठयाचे नियंत्रण करणे, पाणी सोडण्यासाठी दरवाजे असलेल्या धरणामध्ये (Gated Dams) उपलब्ध असलेल्या पाणीसाठा व त्यातून सोडावयाच्याविसर्ग यांचे वेळापत्रक तयार करणे तसेच हे वेळापत्रक अदयावत करण्यात आले आहे याची खात्री करणे.
12. धरणानिहाय समन्वयक अधिका-यांची नियुक्ती करणे. धरणाच्या लाभ क्षेत्रामध्ये पडणारा पाऊस, धरणातील उपलब्ध पाणी साठा व विसर्ग यांची माहिती जिल्हा नियंत्रण कक्ष तसेच राज्य नियंत्रण कक्षला वेळेवर उपलब्ध करून देण्यासाठी प्रत्येक धरणासाठी एक समन्वयक अधिकारी यांची नियुक्ती करणे.
13. पुर परिस्थिती हाताळण्यासाठी तयार करण्यात आलेली प्रमाणित कार्यपध्दतीचे SOP अदयावतीकरण करणे.

**2) धोक्याची किंवा आपत्तीची सुचना मिळताच**

1. विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपात्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सुचनेनुसार विभाग प्रमुखामार्फत कारवाई करतील.
2. कुशल व्यक्तीकडून धरणे, तळे , कालवे, इत्यांदीची स्थितीविषयीचे वारंवार अहवाल घेणे.
3. अधिकृत सक्षम अधिका-याच्या मदतीने पाणी सोडावयाचे किंवा नाही याचा निर्णय घेणे व त्याचबरोबर जिल्हा व तालुका नियंत्रण कक्षाला सुचना देणे.
4. तलावाच्या रचनेत लिकेजमुळे किंवा पाण्याच्या ओव्हरफ्लोमुळे काही हानी पोहचली असलयास पर्यायी सुरक्षिततेची कार्यवाही करणे.
5. पाण्याची पातळीची वाढ किंवा घट या विषयीची माहिती योग्य पध्दतीने पाठविण्याची रचना करणे ती माहिती जिल्हा नियंत्रण कक्षांना पुरविणे.
6. मोठया व मध्यम क्षमतेच्या पाणी साठयाच्या ठिकाणी सक्षम अधिकारी कर्मचा-यामार्फत विशेष लक्ष ठेवणे.
7. ज्या ठिकाणी आवश्यकता आहे अशा ठिकाणी शोध आणि सुटका मोहिमे करीता पाणी उपसण्याकरीता पंप, जनरेटर्स , ट्रक्स, बुलडोजर्स, एक्सकव्हेटर्स, बोट इ.ची सोय करणे.

**3) आपत्ती नंतरचे कार्य-**

1. तज्ञ कुशल अधिका-यांच्या मदतीने पाणी साठयाच्या स्थितीसंबंधी अचुक चित्र मिळविणे व प्राथमिक अहवाल तयार करणे.
2. अधिकारी पातळीवरून कुठल्याही पाणीसाठयाला लिकेज अथवा ओव्हरफ्लो नाही याची खात्री करणे.
3. अधिक साठलेला पाणी साठा सक्षम अधिका-यांच्या पाहणीनंतर निर्गत करणे.
4. शोध व सुटका मदत कार्यासाठी संबंधितांना मदत करणे.
5. जर एखादया ठिकाणी ओव्हर फ्लो किंवा लिकेज आढळल्यास त्वरीत कार्यवाही करणे त्यामुळे कुठल्याही प्रकारची हानी टाळता येईल.
6. तालुका आणि जिल्हा नियंत्रण कक्षाला प्रत्येक साठयाची पाण्याची पातळी स्थिती याविषयी

माहिती वेळोवेळी देत राहणे.

7. जर पिण्याचे पाणी जलसिंचन योजनेमधून पुरविण्यात आले असेल तर पिण्याच्या पाण्याची वाहतूक करण्याची काळजी घ्यावी.
8. आपत्कालीन क्षेत्रातील जनजीवन सामान्य व पुर्ववत होण्यासाठी संबंधित अधिका-यांना मदत करतील.

## 6) सार्वजनिक बांधकाम विभाग (राज्य /जिल्हा परिषद) (कार्यकारी अभियंता) :-

1. कार्यकारी अभियंता
2. उपकार्यकारी अभियंता
3. उपविभागीय अिभयंता
4. कनिष्ठ अभियंता

**1) आपत्ती पूर्व नियोजन**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाची सार्वजनिक बांधकाम विभागाने खालील कृती करावी.

1. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरिष्ठ अधिका-यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
2. जिल्ह्यातील सर्व रस्ते, पूल, धरणे, सार्वजनिक सोयी सुविधा पुरविणारी स्थानके इत्यादीची विस्तृत माहिती व सांख्यिकी माहिती संकलीत करणे व त्यांचे दर सहा महिन्यांनी अदयावतीकरण करणे.
3. आपत्काळात आवश्यक असणा-या इमारती,वाहने, यंत्रे इ. ची विस्तृत माहिती ठेवणे व नेहमी सुसज्ज राहण्यासाठी नियोजन करणे.
4. जिल्हयातील सर्व क्षेत्राचे नकाशे, ज्यामध्ये विविध सांख्यिकीय माहिती असेल.
5. सर्व गावांपर्यंत पोहचणारे रस्ते व पर्यायी रस्ते इ. बाबत सद्यस्थितीची माहिती ठेवणे.
6. कुठल्याही बांधकामात भूकंप व चक्रीवादळ प्रतिरोधक साहित्याचा वापर व त्यासंबंधीच्या नियमांचे पालन होत आहे किंवा नाही याची अत्यंत गंभीरपणे अंमलबजावणी करणे.
7. सार्वजनिक बांधकाम विभागाने वेळोवेळी महत्वाचे स्थानके, निवासस्थाने, उंच इमारती, इ.ची विशेषतः पावसाळयापुर्वी पाहणी करणे.
8. अपघात प्रवण रस्ते, पूल इत्यादीचे निरिक्षण व सुरक्षिततेच्या दृष्टीने योजना करणे.
9. आणीबाणीच्या प्रसंगी त्यांची दुरूस्ती करण्याची योजना तयार करणे.
10. आणीबाणीच्या वेळी उपयोगात येणारे खात्याची यंत्रे उदा. बुल्डोजर्स, ट्रक्टर्स, वॉटर डंपर्स, अर्थमुव्हर्स, एक्सकॅव्हेटर, डिवॉटरिंगपंप्स, जनरेटर्स, ट्री कटर्स, लॅडर्स, रोप्स,फलड लाईट,शॅ वेल्स, हॅक्सेस, हॅमर्स, आर.सी.सी.कटर्स, जे.सी.बी. यांची निगा राखणे आणि दर तीन महिन्यांनी ती चालू स्थितीत आहेत याची खात्री करून घेणे.
11. आपत्तीमध्ये ज्यांची हानी होवू शकते अशा सार्वजनिक वापरात /उपयोगात येणा-या स्थळांची / इमारतींची यादी तयार करणे आणि अशी हानि टाळण्यासाठी अधिच योग्य ती उपाययोजना करणे.
12. नियंत्रण कक्ष 24 तास कार्यान्वित राहिल याची दक्षता घेणे.

**2) धोक्याची किंवा आपत्ती सूचना मिळताच**

1) विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सुचनेनुसार विभाग प्रमुखांमार्फत कार्यवाही करतील.
2) सर्व कर्मचारी आपल्या मुख्यालयात कामावर आहेत याची खात्री करणे.
3) सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अपेक्षीत असलेली सर्व कामे करणे.
4) शोध व सुटका कार्यात येणा-या अडचणी / अडथळे युध्दपातळीवर दूर करणे.
5) आपातग्रस्ताच्या शोध व सुटकेसाठी डि.एम.टी.ना मदत करणे.

**3) आपत्ती नंतरचे कार्य -**

1) मदतकार्यासाठी येणा-या अडचणी व अडथळे युध्दपातळीवर दूर करणे त्यासाठी योग्य त्या सुविधा / व्यवस्था प्रदान करणे.
2) आपत्कालीन योजनेसाठी लागणारे मनुष्यबळ व संसाधने उपलब्ध करणे.
3) डी.डी.एम.पी.मध्ये अंतर्भूत असणा-या योजना कार्यान्वीत करणे.
4) जिल्हा प्रशासनाला हानीचे सर्वेक्षण करण्यासाठी तांत्रिक कर्मचा-याची सेवा उपलब्ध करुन देणे.
5) आपत्तीग्रस्त क्षेत्राचा प्राथमिक अहवाल तयार करणे.
6) विदयुत, पाणी, स्वच्छतागृहे यांची तात्पुरत्या निवा-याच्या ठिकाणी सोय करणे, त्याबरोबर तात्पुरत्या निवा-याच्या ठिकाणे जाणा-या रस्त्यांचे निरीक्षण करणे आणि जर आवश्यकता भासली तर दुरुस्ती करणे.

## 7) दुरसंचार विभाग (भारत दूरसंचार निगम) :-

**1) आपत्ती पूर्व नियोजन**

जि.आ.व्य.योजनेचा एक भाग म्हणून त्यांच्या अधिकार क्षेत्रात / जिल्हयात येणा-या दुरसंचार यंत्रणेसंबंधी योजना तयार करतील. त्यासाठी खालील बाबींचा विचार करावा.

1) आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरिष्ठ अभियंत्याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
2) आपत्कालीन व्यवस्थापनासाठी आवश्यक मनुष्यबळ, दुरसंचार केंद्र, टेलीफोन लाईन, टेलेक्स लाईन्स, मायक्रावेव्ह टॉवर्स यांची सांख्यिकीय माहितीसहीत दर्शविलेला नकाशा,

साधने यांची विस्तृत माहिती संकलीत करणे व दर सहा महिन्यांनी त्यांचे अदयावतीकरण करणे.

3) जिल्हा नियंत्रण कक्ष, रेल्वे स्थानक, बस स्थानक, विमानतळ, मोक्याची महत्वाची ठिकाणे, स्थलसेना, वायुसेना, नौसेना, विदयुतगृहे, जेल, पोलीस स्टेशन, दवाखाने, रुग्णालये, महत्वाची औदयोगिक केंद्र आणि इतर दळणवळणाची साधने यांची सविस्तर माहिती व त्यांच्या दुरसंचार संपर्क राहील यासाठी व्यवस्था.
4) खाजगी क्षेत्रातील दूरसंचार सेवा पुरविणा-या संस्था / उदयोगसमूह करुन त्याच्या यंत्रणेची माहिती ठेवणे व आपतकाळात त्यांची मदत घेण्यासाठी नियोजन करणे.
5) आणीबाणीच्या परिस्थितीत बाजूच्या जिल्हयातून (जी आपत्तीग्रस्त नाहीत) तंत्रज्ञ किंवा इतर कर्मचारी वाहने, इत्यादी मिळविण्यासंबंधीची योजना तयार करणे.
6) विभागाच्या सर्व कर्मचा-यांना आपत्कालीन व्यवस्थापन विषयावर प्रशिक्षित करणे.

**2) धोक्याची किंवा आपत्तीची सूचना मिळताच -**

1) विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सूचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखामार्फत कारवाई करतील.
2) सर्व कर्मचारी आपल्या मुख्यालयात कामावर आहेत यांची खात्री करणे.
3) आपदग्रस्त भागात बंद झालेले दुरसंचार यत्रंणा तत्परतेने दुरुस्त करणे.
4) डी.डी.एम.पी. मध्ये अंतर्भूत असणा-या योजना कार्यान्वीत करणे.
5) कार्यालयात तात्पुरता नियंत्रण कक्ष स्थापन करणे, ज्या योगे माहितीची देवाण घेवाण होईल.

**3) आपत्ती नंतरचे कार्यः-**

1. जिल्हा संपर्क अधिकारी यांच्या सर्व सुचनांच पालन करावे.
2. शोध आणि सुटका कार्यासाठी त्याला नेमून दिलेले काम करित राहणे
3. आपत्कालीन योजनेसाठी मनुष्यबळ व संसाधने उपलब्ध करावे.
4. खंडीत झालेली टेलीफोन सेवा शक्य तितक्या लवकर परत सुरळीत करणे आणि त्याचा आढावा घेणे.
5. टेलीफोन विभागाच्या अधिकारी अथवा मध्यवर्ती नियंत्रण कक्षाशी संपर्क करून यंत्रे, उपकरणे वाहने मनुष्यबळ, तंत्रज्ञ इ. मिळविणे ज्यांच्यामुळे खंडीत टेलीफोन सेवा सुरळीत करता येईल.
6. आपत्कालीन योजनेकरीता त्याला उपलब्ध करून दिलेली बाहेरची मदत व मनुष्यबळ यांचा काळजीपूर्वक उपयोग करून घेणे.
7. त्याचा अधिकार क्षेत्रात झालेल्या हानीचा प्राथमिक सर्वेक्षण अहवाल तयार करणे आणि जिल्हा नियंत्रण कक्षाला पाठविणे.

8. जिल्हा नियंत्रण कक्ष, दवाखाने, निवारा, जेल, पोलिस स्टेशन, विमानतळ, बस स्थानिक इ. ठिकाणी आवश्यक असल्यास डिजी, सेटचा वापर करून तात्पुरता दुरध्वनी सेवा उपलब्ध करून देणे.
9. आपत्कालीन क्षेत्रातील जनजीवन सामान्य व पुर्ववत होण्यासाठी संबंधित अधिका-यांना मदत करतील.

## 8) कृषि विभाग :-

**जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी, सांगली/ कृषि विभाग, जिल्हा परिषद**

1) **आपती पूर्व नियोजन-**

1. जि. आ. व्य. योजनेचा एक भाग म्हणून कृषिसंबंधी आपत्कालीन प्रतिसादासाठी स्वतंत्र योजना तयार करतील.
2. आपत्कालीन व्यवस्थपनासाठी ते जिल्ह्यासाठी वरिष्ठ अधिका-यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
3. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी आवश्यक मनुष्यबळ, साधने यांची विस्तृत माहिती संकलित करणे व दर सहा महिन्यांची त्योच अद्यावतीकरण करणे.
4. प्रत्येक गावातील जलसिंचनाच्या स्त्रोतांची व जमिनीवरील खोल पृष्ठ भागांची जेथे जास्त प्रमाणात पाणी साचू शकते अशा भागांची माहिती ठेवणे
5. यदाकदाचीत पिके व कृषि मालमत्ता यांचे नुकसान झाले असल्यास त्यांची आर्थिकदृष्ट्या पुर्नस्थापना करण्यासाठी लागणारी यंत्रे अथवा उपकरणे यांची त्वरीत उपलब्धता करून देण्यासाठी योजना तयार करणे.
6. आणिबाणीच्या परिस्थितीत बाजूच्या जिल्हयातून मनुष्यबळ, (तंत्रज्ञ, प्रशासकीय कर्मचारी) वाहने व साधने इ. मिळविण्या संबंधीची योजना तयार करणे.
7. जिल्ह्यातील विविध पिकांच्या लागवड क्षेत्राची माहिती व सांख्यिकी ठेवणे.
8. सर्व कर्मचा-यांना आपत्कालीन व्यवस्थापन विषयावर प्रशिक्षित करणे.

**2) धोक्याची किंवा आपत्तीची सूचना मिळताच-**

1) विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपत्कालीन नियंण कक्षात हजर होतील व मिळणा-या सुचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखामार्फत कारवाई करतील.
2) सर्व कर्मचारी आपल्या मुख्यालयात कामावर आहेत याची खात्री करणे.
3) शोध व सुटका कार्यासाठी त्याला नेमून दिलेले काम करणे
4) जि.आ.व्य.योजनेमध्ये अंतर्भूत असणा-या योजना कार्यान्वित करणे.
5) आपत्कालीन विभागात तात्पुरता नियंत्रण कक्ष स्थापना करणे ज्या योगे माहितीची देवाणघेवाण होईल.

**3) आपत्ती नंतरचे कार्य-**

1. मदतकार्यासाठी त्याला नेमून दिलेले कार्य करीत राहणे.
2. आपत्कालीन योजनेसाठी मनुष्यबळ व संसाधने उपलब्ध करणे.
3. पिके वाहून गेली आणि खूप मोठया प्रमाणावर पाणी साठून राहिले आहे अशा परिस्थितीमध्ये आवश्यक त्या उपकरणासाठी डी.एम.टी. ला त्या भागात पाठविणे. प्राधान्य क्रमाने आपत्तीग्रस्त क्षेत्रात मानवी जीवन लवकरात लवकर कसे सुरळित होईल याची दक्षता घेणे.
4. आपत्कालीन योजनेकरीता त्याला उपलब्ध करून दिलेली बाहेरीची मदत व मनुष्यबळ यांची अत्यंत काळजीपूर्वक योजना करून उपयोग करून घेणे.
5. पिकांच्या आणि खरडून गेलेल्या जमीन क्षेत्राचा प्राथमिक सर्वेक्षण अहवाल तातडीने तयार करणे. आणि तालुका अथवा जिल्हा नियंत्रण कक्षाला पाठविणे.

## 9) पशुसंवर्धन (जिल्हा पशु संवर्धन अधिकारी) (राज्य/ जिल्हा परिषद) :-

**1) आपत्ती पूर्व नियोजन**

1. जि.आ.व्य. योजनेचा एक भाग म्हणून कृषी संबंधित आपत्कालीन प्रतिसादासाठी स्वतंत्र योजना तयार करतील.
2. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरिष्ठ अधिका-यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
3. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी आवश्यक मनुष्यबळ, साधने यांची विस्तृत माहिती संकलित करणे व दर सहा महिन्यांनी त्याचे अदयावतीकरण करणे.
4. महत्वाची पशुधन विकास व उपचार केंद्रे, पशुवैदयकिय महाविदयालये, प्रशिक्षण केंद्रात पुरविल्या जाणा-या सुविधांची माहिती
5. पशुधन केंद्र आणि पशुवैदयकिय सेवा खंडीत झाली असलेस ती पूर्ववत करणेसाठी किंवा पर्यायी व्यवस्था करणेसाठी कृती योजना तयार करणे.
6. आपत्कालात बाजूच्या जिल्हयातून (जे आपत्तीग्रस्त नाहीत) तंत्रज्ञ, अर्थतज्ञआणि प्रशासकिय कर्मचारी, वाहनासहीत मिळविण्यासंबंधीची योजना तयार करणे.
7. जनावरांच्या उपचारासाठी लागणारी आवश्यक ती औषधे, लसी किंवा इतर पदार्थ / साधनसामुग्री यांची उपलब्धता राहील यासाठी नियोजन करणे.
8. प्रत्येक आपत्तीकाळात पशुधनास स्थलांतरीत करणेसाठी प्रत्येक गाव स्तरावर सुरक्षित क्षेत्र/ सुनिश्चित करणे व त्यासाठी पुरेसा चारा/ पशुखादय, पाणी इ. साठी नियोजन करणे.

**2) धोक्याची सुचना मिळताच-**

1. विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सुचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखामार्फत कार्यवाही करतील.

2. अपादग्रस्त क्षेत्रात पशुधनास सुरक्षित स्थळी हलविणे व त्यांना आवश्यक उपचार सेवा प्रदान करणे.

3. आपत्कालीन परिस्थितीत पशुधनाची हानि होणार नाही किंवा कमीतकमी होईल याची दक्षता घेणे.

4. सुरक्षित स्थळी स्थलांतरीत केलेल्या पशुधनास पाणी चारा, पशुखादय इ. व्यवस्था करणे.

5. जि.आ.व्य. योजनेमध्ये अंतर्भूत असणा-या योजना कार्यान्वित करणे.

**3) आपत्ती नंतरचे कार्य**

1. आपत्कालीन योजनेसाठी मनुष्यबळ व संसाधने उपलब्ध करणे
2. मृत पशुंची सुरक्षितपणे व नियमानुसार विल्हेवाट तत्परतेने लावणे, जेणे करून रोगराईचा प्रादुर्भाव होणार नाही.
3. जनजीवन पूर्ववत करण्यासाठी आवश्यक ते उपाय करणे
4. जखमी जनावरांवर तातडीने उपचार करण्याची व्यवस्थापन करणे
5. संसर्गजन्य रोग फैलावणार नाहीत त्यासाठी लसीकरण करणे, फवारणी करणे, इ. तातडीच्या उपाय योजना करणे.
6. पशुधन मंडळाचे राज्य संचालक किंवा जिल्हा पंचायत अधिकारी अथवा मध्यवर्ती नियंत्रण कक्षाशी संपर्क करून यंत्रे आणि उपकरणे, वाहने, मनुष्यबळ, तंत्रज्ञ इ.मिळविणे ज्यांच्यामुळे पशुधन विषयक कार्य सुरळीत करता येईल.
7. आपत्तीकाळात झालेल्या पशुधन हानीचे सर्वेक्षण करणे व अहवाल तात्काळ सादर करणे.

## 10) राज्य मार्ग परिवहन महामंडळ ( आगार व्यवस्थापक ):-

जि.आ.व्य. योजनेचा एक भाग म्हणून राज्य परिवहन महामंडळाने त्यांच्या अधिकार क्षेत्रात/ जिल्हयात येणा-या वाहतूकीविषयी स्वतंत्र योजना तयार करतांना खालील बाबी अंमलात आणाव्यात.

1. आपत्कालीन  व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरिष्ठ अधिका-यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
2. आपत्काळासाठी ठराविक वेळेस व ठराविक ठिकाणी किती बसेस उपलब्ध होऊ शकतात यांची माहिती त्वरीत उपलब्ध होवू शकेल अशी व्यवस्था तयार करणे.
3. आपत्काळात बस गाडयांसाठी इंधनाची व्यवस्था व त्या संलग्नीत आर्थिक बाबींसाठी नियोजन
4. आपत्काळासाठी बसेस व्यतिरीक्त इतर वाहने (अब्युलन्स ,वॉटर, ट्रॅक्टर ) व साधनसामुग्री याची माहिती संकलित करणे व ती अदयावत करणे.
5. पाणी पुरवठा, नियंत्रण, कक्ष दवाखाने, सांडपाणी योजना, रेल्वे स्थानक, बसस्थानक, विमानतळ, मोक्याची महत्वाची ठिकाणी, संवदेनशील ठिकाणी, विदयुत गृहे, जेल, पोलिस स्टेशन, महत्वाची औदयोगिक केंद्रे, दळणवळणाची साधने व त्यांना जोडणारे रस्ते यांची सविास्तर माहिती ठेवणे.
6. वाहतूक सेवा विस्कळीत झाल्यास दुरुस्ती किंवा पर्यायी व्यवस्थेसाठी योजना करणे.
7. सर्व कर्मचा-याची आपत्कालीन व्यस्थापन विषयावर प्रशिक्षण करणे, त्यांना वाहतूकीच्या पर्यायी व्यवस्थेबाबत सविस्तर माहिती देणे.
8. आणीबाणीच्या  काळात आवश्यक तितक्या प्रमाणात इंधनाची व्यवस्था करणे.
9. आणीबाणीच्या वेळी उपयोगात येणारे वाहने दुरुस्ती उपरकण, बुल्डोजर्स, वॉटर टॅंकर्स, अर्थमुव्हर्स, पार्सल व्हॅन, जनरेटरर्स लॅडर्स, रोप्स फलड लाईट, शॉ वेल्स, हॅक्सेस, सुसज्ज स्थितीत ठेवण्यासाठी नियोजन.

**2) धोक्याची किंवा आपत्तीची सूचना मिळताच**

1. विभागाचे नोडल अधिकारी तवरीत जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सूचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखामार्फत कारवाई करतील.
2. मुख्य बस स्थानकात तात्पुरते विशेष नियंत्रण कक्ष आणि माहिती केंद्र कार्यान्वित करतील.
3. सर्व कर्मचारी कामावर हजर आहेत याची खात्री करणे.
4. जि.आ.व्य. योजनेमध्ये अंतर्भूत असणा-या योजना कार्यान्वित करणे.
5. वादळ किंवा सर्वत्र पूरग्रस्त परिस्थितीत यासंबधीची अधिकृत धोक्याची सूचना प्राप्त झाल्यास प्रवासी असलेल्या बसेस डेपोच्या बाहेर जाणार नाही, याची काळजी घयावी तसेच ते प्रवासी घरी पोहचू शकले नाहीत त्याच्या सुरक्षिततेसाठी व्यवस्था करावी.
6. हानी प्रवण क्षेत्रातील लोकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यासाठी मुबलक बसेसची उपब्धता करणे.
7. वाहक / चालकांच्या मदतीने मार्गावरील धोक्याची सूचनेची निरोप पाठविण्यासाठी प्रशासनास मदत करणे.

**3) आपत्ती नंतरचे कार्य**

1. शोध व सुटका कार्यासाठी मदत करणे.
2. आपत्कालीन सापडलेल्या लोकांची निवा-याची ठिकाणी किंवा सुरक्षित स्थळी वाहतूक करणे.
3. आपत्कालीन योजनेसाठी मनुष्यबळ व संसाधने उपलब्ध करणे.
4. सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद करण्यात आलेल्या बस सेवा लवकरात लवकर सुरू करणे. नियोजित बस सेवा रद्द झाल्यास किंवा मार्ग बदलल्यास त्याबाबतची माहिती त्वरीत उपलब्ध करून देणे.
5. यांच्या अधिकार क्षेत्रात झालेल्या हानीचा प्राथमिक सर्वेक्षण अहवाल तयार करणे.
6. बस डेपोमधील त्यांच्या ताब्यात असलेल्या नादुरूस्त वाहनांची दुरुस्ती तत्परतेने करतील.
7. मदत कार्यात येणा-या अडचणी दूर करण्यासाठी व मदत कार्यासाठी मदत करतील.

## 11) म.रा. वि.वि.कं. मर्या.विभाग:-

**(अधिक्षक अभियंता /कार्यकारी अभियंता )**

**1) आपत्ती पूर्व नियोजन**

जिल्हा आपत्कालीन व्यवस्थापन योजनेअंतर्गत म.रा.वि.वि.कं आणि ऊर्जा विभागाने खालील कृती कराव्यात. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्यासाठी वरिष्ठ अधिका-याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.

1. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी आवश्यक मनुष्यबळ साधने यांची विस्तृत माहिती संकलित करणे.
2. त्यांच्या अधिकार क्षेत्रात येणा-या इमारती, वाहने आणि उपकरणे यांची विस्तृत माहिती तयार करणे व दर सहा महिन्यानी त्याच अदयावतीकरण करणे.
3. पावर स्टेशन, सब स्टेशनफिडर्स, ट्रॉन्सफार्मर्स आणि मुख्य विदयुत लाईन यांची माहिती दर्शविणारा नकाशा तयार करणे.
4. विजेवर आधारीत सांडपाणी व्यवस्थापन, रेल्वे स्थानक, पोलीस स्टेशसन, बस स्थानक, विमानतळ, मोक्याची महत्वाची ठिकाणे स्थलसेना, वायुसेना, नौसेना विदयुगृहे, महत्वाच्या ठिकाणांची विदयुत पुरवठा व यंत्रणा दर तीन महिन्यानी तपासणे व त्या अबाधित राहतील यासाठी नियोजन करणे.
5. आपत्तीच्या काळात दुरुस्ती किंवा बदल करण्यासाठी योग्य योजना आखणे
6. हानीप्रवण पॉवर स्टेशन , सब स्टेशन इत्यादीच्या दर तीन महिन्यानी तपासणी करणे.
7. ज्यावेळेस विदयुत लाईनची मोडतोड होईल अशा परिस्थितीत वेळेत पोल, डि.पी. ट्रॉन्सफॉर्मस इ. चा पुरवठा करणेसाठी नियोजन.
8. तात्पुरत्या काळासाठी विदयुत पुरवठा पुर्ववत करण्यासाठी लागणा-या उपकरणांची अथवा साधनांची त्वरीत उपलब्धता करण्यासाठी योग्य ती कृती योजना करणे, जे आपतीग्रस्त नाहीत अशा जिल्हयातून तंत्रज्ञ तसेच साहित्य उपलब्ध करणे.
9. आणीबाणीच्या काळात उपयोगात येणारे त्यांच्या अधिकारातील बुल्डोजर, वॉटर टॅंकर्स, अर्थमुव्हर्स, पार्सल व्हॅन,जनरेटरर्स लॅडर्स, रोप्स फलड लाईट, शॉ वेल्स, हॅक्सेस हॅमर्स इ.

याची निगा राखणे आणि दर तीन महिन्यांनी ती चालू स्थितीत आहेत यांची खात्री करून घेणे.

10. विभागाच्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांना आपत्कालीन व्यवस्थापन विषयावर प्रशिक्षित करणे.

## 2) धोक्याची किंवा आपत्तीची सुचना मिळताच

1. विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सूचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखांमार्फत कारवाई करतील.
2. जिल्हा नियंत्रण कक्षाशी मदत करणेकरीता त्वरील संपर्क करणे.
3. सर्व कर्मचारी आपल्या विभाग संपर्क अधिकारी जिल्हा नियंत्रण कक्षात मुख्यालयात कामावर आहेत याची खात्री करणे.
4. डी.डी.एम.पी. मध्ये अंर्तभूत असणा-या योजना कार्यन्वित करणे.
5. आपातग्रस्त क्षेत्रात विद्युत पुरवठा खंडीत झाला तर त्वरीत तो सुरक्षितपणे सुरू करणे.
6. विभागाचा तात्पुरता नियंत्रण कक्ष स्थापन करणे ज्यायोगी माहितीची देवाण घेवाण होईल.

## 3) आपत्तीनंतरचे कार्य

1. शोध आणि सुटका कार्यासाठी मदत करणे.
2. आपत्कालीन योजनेसाठी मनुष्यबळ व संसाधने उपलब्ध करणे.
3. खंडीत झालेल्या विद्युत पुरवठा शक्य तितक्या लवकर सुरक्षितपणे सुरळीत करणे आणि त्याचा आढावा घेणे.
4. आत्कालीन योजनेकरीता त्याला उपलब्ध करून दिलेली मदत व मनुष्यबळयांची अत्यंत काळजीपुर्वक योजना करुन उपयोग करुन घेणे.
5. त्याच्या अधिकार क्षेत्रात झालेल्या हानीचा प्राथमिक सर्वेक्षण अहवाल तयार करणे आणि तालुका अथवा जिल्हा नियंत्रण कक्षाला पाठविणे.
6. जिल्हा नियंत्रण कक्षातील कुठल्याही परिस्थितीत विद्युत पुरवठा खंडीत होणार नाही यांची काळजी घेणे.
7. जिल्हा नियंत्रण कक्ष, दवाखाने, निवारा, जेल, पोलीस स्टेशन, विमानतळ, बसस्थानक, इ. ठिकाणी आवश्यक असल्यास डी.जी. सेटचा वापर करुन तात्पुरता विद्युत पुरवठा करणे.
8. कृती योजनेत अंतर्भूत असलेले आणी बाणीचे दुरुस्तीचे कार्य त्वरित हाती घेणे.
9. Short Circuit च्या तक्रारीवर प्राधान्याने लक्ष देणे.

## 12) वनविभाग (उपवनसंरक्षक):-

### —) आपत्ती पूर्व नियोजन

1. आ.व्य. योजनेचा एक भाग म्हणून वन अधिका-यांनी स्वतंत्र योजना तयार करावी.
2. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरीष्ठ अधिका-याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
3. आपत्कालात आवश्यक मनुष्यबळ, साधनसामुग्री, वाहने दुरसंचार यंत्रणा साहित्य यांची सविस्तर माहिती संकलित करणे, व ती दर सहा महिन्यांनी नियोजन करणे.
4. त्याच्या कक्षेत येणा-या वन क्षेत्राचा नकाशा, त्याला जोडणारे रस्ते, रेल्वे क्रॉसिंग त्यातील पाण्याचे साठे / स्त्रोत व निगडीत सांख्यिकी माहिती संकलित करणे.
5. वन कक्षेत येणारे क्षतीग्रस्त रस्ते, पुल, धरण, अवघड रस्ते यांचे निरीक्षण करणे.
6. वनक्षेत्रात येणारी इमारती, निवासस्थाने, मनोरे इत्यादींची वेळोवेळी तपासणी करणे. सर्व कर्मचा-यांना व्यवस्थापन विषयावर प्रशिक्षित करणे.
7. आपत्कालीन परिस्थितीत आपदग्रस्तांना तात्पुरत्या निवा-यासाठी लागणारे साहित्य जसे बांबू, चटई इत्यादीचे नियोजन करणे.

### 2) धोक्याची किंवा आपत्तीची सुचना मिळताच

1. विभागाचे नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सुचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखांमार्फत कारवाई करतील.
2. सर्व कर्मचारी आपल्या मुख्यालयात कामावर आहेत यांची खात्री करणे.
3. जि.आ.व्य. योजनेमध्ये अंर्तभूत असणा-या योजना कार्यान्वित करणे.
4. हानी प्रवण वन क्षेत्रात वायरलेस, टेलीफोन, मनुष्यबळ, बिटगार्ड, फॉरेस्ट गार्ड, इ.ना सतर्क ठेवणे.
5. शोध व सुटका कार्यासाठी मनुष्यबळ व साधने उपलब्ध करणे.
6. क्षतीग्रस्त क्षेत्रात प्राधान्याने जळाऊ लाकूड आणि तात्पुरत्या निवा-यासाठी बांबू, चटई यांची उपलब्धता करुन देणे.

### 3) आपत्ती नंतरचे कार्य

1. मदत कार्यासाठी संबंधित अधिका-यांना सहयोग देणे.
2. आपत्कालीन योजनेसाठी मनुष्यबळ व संसाधने उपलब्ध करणे. आपादग्रस्त भागातील शोध व बचाव, मदत व पुनर्वसन कामासाठी आवश्यकतेनुसार बांबु, लाकुड इत्यादी उपलब्ध करून देणे.

3. हानीचे सर्वेक्षण करण्यासाठी तालुका प्रशासनास तंत्रज्ञ व्यक्ती उपलब्ध करुन देईल. हानी प्रवण क्षेत्राचा प्राथमिक अहवाल तयार करील.
4. वन विभागाच्या अखत्यारितील रोड, पुल रेल्वे क्रॉसिंग इत्यादीच्या स्थितीची माहिती घेवून दुरुस्तीचे काम हाती घेवून दळणवळण पुर्ववत होईल याची काळजी घेईल. वनक्षेत्रातील हिरवा चारा उपलब्ध करून देणे.

## 13) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण महामंडळ / ग्रामिण पाणी पुरवठा जि.प. (कार्यकारी अभियंता):-

### 1) आपत्ती पुर्व नियोजन

1. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरिष्ठ अधिका-याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
2. आपत्तीमध्ये नेहमीचे पाणी पुरवठा योजना बंद पडल्यास पर्यायी पिण्याचे पाणी पुरवठा करण्याची योजना तयार करणे.
3. जिल्हयातील सर्व गांवामध्ये उपलब्ध पाणी पुरवठयाच्या साधनांची सविस्तर माहिती संकलित करणे.
4. तात्काळ आणि तात्पुरत्या पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्यासाठी शासकीय अथवा खाजगी टँकरची योजना करणे.
5. आपत्तीच्या वेळी वीज पुरवठा खंडीत होण्याची शक्यता लक्षात घेवून वीज पुरवठयासाठी पर्यायी व्यवस्था व पाणी पुरवठयाची योजना करणे.

### 2) धोक्याची किंवा आपत्तीची सूचना मिळताच

1. विभागाने नोडल अधिकारी त्वरीत जिल्हा आपत्कालीन नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणा-या सुचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखांमार्फत कारवाई करतील.
2. पाण्याची टाकी, पाण्याचे पंप आणि पाणी साठी, पाण्याची साधने यांची तपासणी करणे.
3. आपत्तीमुळे नियमित पाणी पुरवठयाची योजना विस्कळीत झाली / बंद पडली तर पर्यायी पाणी पुरवठा योजना कार्यान्वित करणे.
4. पाण्याच्या पुरवठा करणा-या पाईपाची नासधूस झाली असल्यास ताबडतोब त्यांची दुरुस्ती करणे.
5. आपत्तीग्रस्त भागात सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करणे.
6. विद्युत पुरवठा खंडीत झाला असेल तर विद्युत पुरवठा करण्यासंबंधी संपर्क करणे.

**3) आपत्ती नंतरचे कार्य**

1. शोध व सुटका कार्यासाठी विभागाला नेमून दिलेले कामे करणे.
2. मदत कार्यासाठी मनुष्यबळ व संसाधने उपलब्ध करणे.
3. आपत्कालीन क्षेत्रातील जनजीवन सामान्य व पुर्ववत होण्यासाठी संबंधीत अधिका-यांना मदत करतील.

## 14) गृहरक्षक दल (जिल्हा समादेशक होमगार्ड) :-

**1) आपत्ती पूर्व नियोजन**

1. आपत्कालीन व्यवस्थापनासाठी ते जिल्हयासाठी वरीष्ठ अधिकाऱ्याची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करतील.
2. आपत्कालात प्रतिसाददेण्यासाठी प्रशिक्षित कृती दलाची स्थापना करणे व त्यांना नियमितपणे प्रशिक्षण देणे.
3. जिल्हयात ठिकठिकाणी विशेषतः तालुक्याच्या ठिकाणी प्रशिक्षित कृतीदले स्थापन करणे व त्यांना नियमितपणे प्रशिक्षण देणे
4. जिल्हयातील महत्वाच्या इमारती, संवेदनशील स्थानके, रस्ते, नद्या, पूल, पर्यायी रस्ते इ. ची माहिती विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना देणे व त्याना आपत्कालीन व्यवस्थापन विषयावर प्रशिक्षित करणे.
5. आपत्तीच्या वेळी / परिस्थितीत उपयोगी येणाऱ्या मनुष्यबळ व इतर संसाधनाची माहिती संकलित करून दर सहा महिन्यांनी अद्यावतीकरण करावे.
6. आपात्कालात विभागाच्या नियंत्रण कक्ष व दूरसंचार यंत्रणा अद्यावत व कार्यान्वित राहील यासाठी उपाययोजना करणे.
7. शोधकार्य आणि सुटका कार्य यासाठी लागणाऱ्या गृहरक्षक दलाच्या अखत्यारीतील उपकरणाची सुसज्जता व उपलब्धता अबाधित ठेवण्यासाठी पूर्वतयारी करेल.
8. आपात्कालासाठी कमीत कमी वेळेत मनुष्यबळ व साधने उपलब्ध करण्यासाठी नियोजन करणे.
9. शोध व बचाव व पथक तयार करणे व त्यांना प्रशिक्षित देणे.

**2) धोक्याची किंवा आपत्तीची सूचना मिळताच**

गृह रक्षक दल नोडल अधिकारी त्वरित जिल्हा नियंत्रण कक्षात हजर होतील व मिळणाऱ्या सुचनेनुसार आपल्या विभाग प्रमुखांमार्फत कारवाई करतील.

1. आपत्कालीन कृतीदलांना युद्ध स्तरावर कार्यान्वित करतील, शोध व सुटका हि कृती दलाची प्राथमिक जबाबदारी राहील.
2. आपत्कालीन साहित्यांचे वाहतूक करण्यासाठी सुरक्षितता प्रदान करेल.
3. आपत्कालीन क्षेत्रातील लोकांना स्थलांतर करण्यासाठी सबंधित अधिकाऱ्यांना मदत करणे.
4. आवश्यकतेनुसार दळणवळणांच्या सर्व साधनाचा आणि वाहनांचा वापर करून संदेश देण्याची व मदत पोहचविण्याची व्यवस्था करेल.
5. वरील सूचना मिळताच आवश्यकता भासल्यास जिल्हाधिकारी यांच्याकडे वाहनांची मागणी करेल.

**3) आपत्ती नंतरचे कार्य**

1. आपत्तीचा प्राथमिक अंदाज घेवून त्याविषयी कर्मचाऱ्यांशी सल्ला मसलत करणे व झालेल्या नुकसानीचा प्राथमिक अहवाल बनविण्यास मदत करेल.
2. शोध आणि सुटका कार्यासाठी एन.सी.सी./व्ही.टी.एफ./एन.जी.ओ. इत्यादींची जुळवाजुळव करेल / समन्वय करेल.
3. आपत्कालीन शिबिराची आणि आपत्कालीन वस्तूंच्या साठवणीच्या सुरक्षिततेची व्यवस्था करेल.
4. लोकांना सुरक्षित स्थळी स्थलातंरीत करणे.
5. मृत व्यक्तींच्या शरीराची ( प्रेताची ) व मृत पशूची विल्हेवाट लावणे

## 15) रेल्वे विभाग :-

**आपत्कालीन परिस्थितीत रेल्वे विभागाने करावयाचे उपाययोजना**

1. रेल्वे रुळावर पुराचे पाण्याचे स्थितीवर लक्ष ठेवणे.
2. रेल्वे रुळावर साठलेले पाणी काढण्याची व्यवस्था करणे.
3. रेल्वे वाहतुकीस अडथळा निर्माण झाल्यास, परिस्थिती सामान्य करण्यासाठी कोणते उपाययोजना आहेत याची लोकांना माहिति पुरविणे.
4. रेल्वे पोलिस दलाच्या सहाय्याने गर्दीवर नियंत्रण ठेवणे.
5. अडकलेल्या प्रवाशा करीता जेवणाची व स्वच्छ पिण्याची व्यवस्था करणे.

## 16) मत्स्य व्यवसाय विकास विभाग:-

मत्स्यव्यवसाय विकास अधिकारी जिल्हाधिकाऱ्यानी त्यांचे अधिनस्त यंत्रणेमार्फत खालील प्रमाणे कामे पार पाडावयाची आहेत.

1. आपत्तीची पूर्वसूचना मिळताच जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानुसार आवश्यक तेथे त्यांच्या विभागाच्या बोटी उपलब्ध करून लवकरात लवकर पोहोचते करणे.
2. स्थानिक नावाडी यांच्या सेवा उपलब्ध करून देणे. अतिवृष्टी मुळे मत्स्य व्यावसायिकांचे नुकसान झाल्यास त्याबाबत सर्वेक्षण करणे.

## 17) जिल्हा माहिती अधिकारी :-

**या विभागाची प्रमुख कामे खालीलप्रमाणे आहेत :**

1. आपत्तीपूर्व झालेले नुकसान, शोध व बचावकार्य, मदतकार्य, तात्पुरती शिबीरे, उच्चपदस्थ यांचेभेटी इ. बाबतची वस्तुनिष्ठ माहिती प्रसिद्ध करणे, महत्वाच्या प्रसंगाची छायाचित्रे, ध्वनीचित्रफिती तयार करणे.
2. शासन व प्रशासन विरोधात प्रसारित / प्रकाशित होणारी विपर्यस्त निराधार व दिशाभूल करणारी वृत्ते / बातम्या, माहिती तसेच अफवा याबाबत सबंधित विभाग आणि जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अचून माहिती / खुलासा घेवून अशा वृत्ताचे खंडन प्रसिद्ध करणे.
3. शासन व प्रशासन यांचेकडून होणाऱ्या प्रयत्नांना व करण्यात येणाऱ्या उपाययोजनांना सकारात्मक प्रसिद्धी देवून जनसहभाग वाढविण्याचा प्रयत्न करणे.
4. मुख्यमंत्री सहायता निधीस सढळहस्ते मदत करण्याचे आवाहन प्रसिद्धी पत्रकांद्वारे करणे. प्राप्त मदतीची माहिती प्रसिद्ध करणे.

## 18) जिल्हा क्रीडा अधिकारी आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक जिल्हा परिषद) :-

**या विभागाची प्रमुख कामे खालीलप्रमाणे राहतील -**

1. जिल्हयातील क्रीडा व युवक मंडळे, स्वयंसेवी संस्था इ.मार्फत प्रशासनास स्वयंसेवक उपलब्ध करून देणे.
2. शाळा व महाविद्यालयातील एन.सी.सी. आणि एन.एस.एस. पथकांशी आगावू संपर्क साधून त्यांचेकडून शोध, बचाव, मदतकार्य, स्वच्छता, पुननिर्माण, वाहतूक व्यवस्था इत्यादी कामाकरिता प्रशासनास सहकार्य उपलब्ध करून देणे.

## 19) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था :-

या विभागाशी प्रमुख कामे खालीलप्रमाणे राहतील :

1. सहकारी संस्थांच्या माध्यमातून मदतकार्य व पुननिर्माण कार्याकरिता व वस्तुरूपाने मदत मिळविणे.
2. तात्पुरत्या शिबिरातील स्थलांतरीतांसाठी जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे. विशेषतः दुध, भाजीपाला, फळे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली वाटप करणे.

## 20) अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क :-

**या विभागाची प्रमुख कामे खालीलप्रमाणे राहतीलः**

**1.** आपत्ती काळात आपदग्रस्त भागात आणि तात्पुरत्या शिबिरांच्या ठिकाणी दारु आणि अन्य मादक पदार्थाच्य विक्रीवर / उपलब्धतेवर निर्बंध घालणे व अवैध कृत्यांस प्रतिबंध करुन कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यास मदत करणे, याकरिता विशेष तपासणी पथके कार्यान्वित करणे.

## 21) भूमी अभिलेख विभाग :-

1. पूर ओसरल्यानंतर पुरामुळे वाहून गेलेल्या तसेच गाळामुळे भर पडून तयार झालेल्या शेतजमीनीचे सर्वेक्षणव मोजणी करुन जमीन महसूल अधिनियमातील तरतुदीनुसार शेतसारा कमी अथवा जास्त करण्याचे प्रस्ताव तहसिलदारांमार्फत जिल्हाधिका-यांना सादर करणे.
2. वरील प्रमाणे विविध शासकीय आणि निमशासकय यंत्रणांकडे पुरासंबंध आपत्ती व्यवस्थापन आणि नियोजना संदर्भातील काम सोपविण्यात आली असून सुरुवातीस नमुद केलले उदिदष्ट साध्य करण्यासाठी सामुहिक प्रयत्नाची आवश्यकता आहे.
3. जिल्हयातील सर्व शासकीय विभागातील अधिका-यानी जून ते सप्टेंबर या कालावधीत पूर्ण वेळ मुख्यालयात उपस्थित रहावे व अपवादात्मक परिस्थितीत मुख्यालय सोडावयाचे झाल्यास आपल्या विभागप्रमुखांना आणि विभागप्रमुखांनी जिल्हाधिकारी यांना मुख्यालय सोडण्यापूर्वी लेखी कळविण्याची दक्षता घ्यावी. तसेच गैरहजेरीच्या काळात त्यांची कामे पार पाडण्याकरिता जबाबदार अधिका-यावर जबाबदारी सोपवून त्याचे नाव व संपर्क दूरध्वनी क्रमांक कळवावेत.
4. पुरपरिस्थिती उदभवल्यास जिवितहानी होवू नये तसेच वित्तहानीचे प्रमाण कमीतकमी असावे आणि पूरबाधित नागरिकांना मदत व आधार देवून त्यांचे जीवन पूर्ववत करण्यास

मदत करणे यादृष्टीने प्रशासनाने प्रयतन करणे आवश्यक आहे. यासाठी सर्वच शासकीय विभागांच्या अधिकारी व कर्मचारी यांनी कर्तव्यभावनेने व सामाजिक जाणीव ठेवून आपले कर्तव्य मनः पूर्वक पार पाडावे.

**मदत व पुनर्वसन कार्याशी सबंधीत संस्था :**

या पैकी बहुतांश संस्थांचा मदत व पुनर्वसन कार्यामध्ये प्रशासनास उपयोग होऊ शकतो.

1) इंडियन रेड क्रॉस सोसायटी
2) रोटरी क्लब
3) लायन्स क्लब
4) इंडियन मेडिकल असोसिएशन
5) रॉयल बोट क्लब सांगली
6) आयुष हेल्पलाईन ,सांगली
7) जीवरक्षक टीम सांगली
8) विश्वसेवा फाउंडेशन ,सांगली

या व्यतिरिक्त स्तरावर आपत्तीवेळी उदा. घर पडणे, पूर येणे अशावेळी मोहल्ला कमिटयांची मदत होऊ शकते. अशा मोहल्ले कमिटयांची माहिती घेऊन ठेवणे. तसेच आपत्तीच्यातीव्रतेनुसार खालील संस्था आवश्यक असणा-या वस्तु, उपलब्ध असणा-या वस्तुबाबत नियंत्रण कक्षाच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे मदत करू शकतात आणि अशासकीय संघटना तालूका स्तरावर नागरीकांना आपत्तीला सामोरे जाण्यासाठी व त्याबाबत जागरुकता निर्माण करण्यासाठी मदत करू शकतात. आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे आवश्यक आहे.

# संभाव्य विविध प्रकारच्या आपत्ती व करावयाच्या उपाययोजना

## 1) आग

आगीचा प्रसार खूपच लवकर होतो. प्रशासनास कळविण्यात तसेच मौल्यवान वस्तू काढून घेण्यासाठी वेळ मिळत नाही. श्वासाद्वारे आत घुसणारी हवा फुप्फुसांना नुकसान पोहोचवू शकते. आगीमधुन विषारी वायू बाहेर पडतात ज्यामुळे गुंगी तसेच अस्वस्थता येते. त्यामुळे आगीमुळे जाग येण्या ऐवजी गाढ झोपण्याचीच जास्त शक्यता असते.

आगीबाबत काय करायचे, कशी सुटका करुन घ्या व याची व लोकांना कसे वाचवायचे याबद्दल माहिती असणे जरूरी आहे.

**1. आग लागल्यावर काय करावे**

छोट्या प्रमाणवरील आग विझवण्यासाठी पाण्याचा वापर करावा. नियंत्रणाबाहेर जावू पाहणा-या आगीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करु नका अग्निशमन दलास बोलवा.

1. विजेमुळे लागलेल्या आगीवर फेकू नये.
2. तेल किंवा यामुळे लागणा-या आगीवर मिठ किंवा बेकींग सोडा टाका.
3. जर कपड्यांनी पेट घेतला असेल तर त्या व्यक्तीने थांबावे. जमीनीवर पडून जोपर्यंत आग विझत नाही तोपर्यंत लोळत रहावे. मदत करणा-या व्यक्तीने फक्त पाणी ओतत रहावे व हाताने आग विझविण्याचा प्रयत्न करु नये.
4. दरवाज्याच्यावरच्या भागाला हात लावून तो गरम आहे का हे दरवाजा उघडण्याआधी तपासावे. रांगण्याची तयारी करुन ठेवावी. जर दरवाजा थंड असेल तर तात्काळ निघून जावे. जर दरवाजा गरम असेल तर खिडकीतून निघून जावे. जर सुटका होणे शक्य नसेल तर मदतीसाठी आरडाओरड व खुणा करा.
5. आग लागल्यास खोलीचे दरवाजे बंद करुन ठेवा. जेणेकरुन आगीचा परतावाही होईल. तसेच विषारी वायूही बाहेर येणार नाही.
6. उष्णता तसेच धूर हे वरच्या दिशेने जातात त्यामुळे जमीनीवरील हवा थंड व स्वच्छ असते. म्हणुन सुटका होणार नाही असे वाटल्यास जमीनी लगतच थांबा. जर सर्व दरवाजे बंद केलेले असतील तर हवा येण्यासाठी खिडक्या उघडा. शक्य झाल्यास ओले केलेले फाटके कपडे दरवाज्या भोवती लावा जेणे करुन धूर व उष्णता बाहेर येणार नाही.
7. कोणत्याही कारणास्तव जळत्या घरात परत जावू नका. जर कोणी घरात राहले असेल तर अग्निशमन दलाला कळवा.

**2. आगी नंतर काय करावे.**

1. आगीमुळे नुकसान झालेल्या घरात जोपर्यंत सुरक्षित वाटत नाही तोपर्यंत घरात प्रवेश करु नये.

2. अशा घरात प्रवेश करणे आधी उष्णता व धूर निघत नाही ना याची खात्री करुन घ्यावी
3. वीज पुरवठा चालू करण्याआधी एखाद्या वायरमनकडून घरातील सर्व वायरिंग तपासून घ्यावी.
4. आगीमुळे नुकसान झालेले (छत) तसेच जमीनीची डागडुजी करण्यासंबधी लक्ष असू द्या.
5. डागसाठी तसेच स्वच्छतेसंबंधी आलेल्या दुरस्ती, खर्चाचे अभिलेख ठेवावे.
6. स्वत:जवळील दागदागीने / पैसे सुरक्षीत ठेवा. किंवा दुस-या ठिकाणी पाठवा.
7. सुरक्षित किंवा मजबुत पेटी उघडण्याचा प्रयत्न करु नका. कारण त्यामध्ये कित्येक तास कोंडलेली उष्णता तसेच धूर असू शकतो. तसेच ती उघडल्यास मोठा स्फोट होण्याची ही शक्यता असते.
8. जर स्थानिक प्रशासनाने एखादे घर असुरक्षित जाहिर केले व ते तात्काळ रिकामे करण्यास सांगितले तर ....

i. पोलीसांना किंवा समाज तात्काळ प्रतिसाद संघांना मालमत्तेवर लक्ष ठेवण्यास सांगावे.
ii. दाग-दागिने, रोख रक्कम तसेच आर्थिक बाबींचे रेकॉर्ड तसेच महत्वाची कागदपत्रे घेवून बाहेर पडावे.
iii. घर मोकळे केल्यानंतर मित्रांना, नातेवाईकांना, पोलीस, अग्निशमन दल, पोस्ट ऑफिस, शासकीय कार्यालय, शाळा यांना आपला नवीन पत्ता द्या.

**3. संबधीत विभाग**

1. महसुल, आरोग्य, स्थानिक अग्नीशमन सेवा, पोलीस
2. मोठ्या आगीसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ व पाणी पुरवठा विभागाची मदत आवश्यक.
3. स्थलांतर मोठ्या प्रमाणात असल्यास जिल्हा नियंत्रण कक्षाची मदत.

**4. संभाव्य परिणाम**

1. वैयक्तिक परिणाम-जाळपोळ, जिवीतहानी, वैद्यकीय सेवेलायक भाजल्याच्या जखमा.
2. लोकसंख्येची जास्त घनता असलेल्या ठिकाणी अग्निशमन दलातील जवानांकडून आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न.
3. माहिती कक्षाची जबाबदारी.
4. जेथे कुटुंब प्रमुखाचा मृत्यु झाला असेल अशा कुटुंबाचे आर्थिक पुनर्वसन दिरंगाई टाळण्यासाठी जिवीतहानी, पशुहानी व संपत्तीच्या नुकसानीची भरपाई वसुल करण्याची गरज घरांचे नुकसान

**5. करावयाची कार्यवाही**

1. नुकसान झालेल्या घरांचे तांत्रिक परिक्षण आवश्यक.
2. महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे वीज पुरवठा त्वरीत बंद करणे.
3. जमीनीखालील केबल निरिक्षणाची आवश्कयता.
4. घरांच्या मोडतोडमुळे दुरसंचारासाठी सार्वजनिक दुरध्वनी केंद्राची उभारणी
5. रुग्णालये शाळेच्या इमारती इ. सार्वजनिक सुविधा विस्कळीत झाल्यामुळे ताप्तुरती पुर्नस्थापना करण्यास प्रथम प्राधान्य.
6. प्राधान्य क्रमानुसार सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सार्वजनिक सुविधांची दुरस्ती.
7. काही ठिकाणी वाहतुक नियंत्रणाची आवश्यकता, पर्यायी व्यवस्था शोधणे.
8. अडचणीच्या जागी मदत करणे अवघड झाल्यास सुलभ कार्यासाठी पोलीसांची मदत आवश्यक.
9. बाजारपेठ, उत्पादन कक्ष व रोजगार संकुलाची पुर्नस्थापना.
10. नुकसान भरपाई मिळण्याची सोय.
11. काही आंशीक नुकसान झालेल्या घरांना मोड्ुन टाकण्याची आवश्यकता.
12. पुर्नबांधणीसाठी पर्यायी व्यवस्थेची आवश्यकता.
13. संकटातुन वाचलेल्या मालाला तांत्रीक व्यक्तीच्या सहमतीची आवश्यकता.
14. शक्यतो संकटातुन वाचलेला माल त्याच कुटुंबातील व्यक्तींना देण्यात येतो.
15. सेवेत खंड पडल्यामुळे होणारे नुकसान.

**6. पायाभुत सेवांचे नुकसान व खंडीत सेवा-**

1. इमारती
2. दळणवळण

**2) भुकंप**

भुकंप दरम्यान होणारी जमीनीची हालचालही जीवीत हानी घडू शकते. घरे पडल्यामुळे जात्स मृत्यू होतात. भुकंपामुळे समुद्रावर प्रचंड लाटा निर्माण होतात व त्यातील प्रत्येक लाट मोठे नुकसान घडवून आणू शकते. धोका कमी करणेसाठी अनेक कृती करता येवू शकतात.

**1. भुकंपासाठी पूर्व तयारी**

1. भूकंपासाठी घरगुती योजना तयार करा.
2. घरातील प्रत्येक खोलीत जागा निवडून ठेवा. जसे टेबलाखाली जेणे करुन तुमच्या अंगावर थेट काही पडू शकणार नाही.
3. पडण्याचा, झाकून घेण्याचा वर्षातून दोनदा तरी सराव करा. याबाबत मुलांना सांगा.

**2. भुकंपावेळी**

1. शांत रहा, खिडकीपासून दूर दरवाज्याजवळ उभे राहा किंवा टेबलाखालील पा. पडणा-या वस्तूंचे निरीक्षण करा. जर गादीवर झोपले असाल तर उशिने डोक्याचे संरक्षण करा.
2. घराबाहेर असणा-या व्यक्तीने इमारती, झाडे, वीजचे खांब यापासून दूर रहावे.
3. रस्त्यात असाल तर उड्डान पूल व पूल यापासून दूर मोकळया जागेवर थांबावे.

**3. भुकंपानंतर**

1. जखमींची तपासणी करा व प्रथमोपचार करा.
2. शॉर्टसर्कीट, विजेच्या तारा, पाणी पुरवठा वाहिनीचे, इमारतीचे नुकसान तपासून पहावे.
3. छोट्या आगीकडे लक्ष ठेवून त्या नष्ट करा.
4. धोकादायक वस्तूंची योग्य विल्हेवाट लावा.
5. रेडीओवर दिल्या जाणा-या सूचना लक्षात घ्या.
6. भूकंपानंतर ही छोटे-छोटे धक्के बसू शकतील याकडे लक्ष ठेवावे.

4. **संबधीत जबाबदार विभाग**

महसुल, पोलीस, अग्नीशमन दल व आरोग्य विभाग आपत्ती काळात मोठ्या प्रमाणात झालेल्या नुकसानीमुळे दुरसंचार, वीज पुरवठा व जलनिस्सारण मंडळ आणि सार्वजनिक बांधकाम विभाग महत्वाची कामगिरी बजावतील. भुकंपामुळे पुर व साथीचे रोग येतात म्हणुन उपाययोजनांसाठी आरोग्य व पाटबंधारे विभागावर जास्त भर दिला जातो.

**5. नुकसानीचे स्वरुप**

ग्रामीण भाग - राहण्याच्या व भौतिक रचना (पाटबंधा-यासह) शहरी भाग - राहण्याच्या व भौतिक रचना, पाणी पुरवठा आणि मलनिस्सारण, दुरसंचार सेवाइ.

**6. सेवेत खंड पडल्यामुळे होणारे नुकसान**

1. इमारती, धरणे, पुल.
2. विद्युत केंद्र
3. नाले, जमीनीखालील केबल
4. रस्ते व रेल्वेमार्ग
5. पाण्याची पाईप लाईन व पाण्याच्या टाक्या

**7. कार्यवाहीची पध्दती**

1. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाने वीज पुरवठा तात्काळ बंद करणे.
2. जमीनी खालील केबलच्या निरिक्षणाची आवश्यकता.
3. धरणा लागेलेले तडे दुरुस्तीसाठी पाटबंधारे विभागची आवश्यकता
4. सैन्यदलाची मदत घेऊन तात्पुरते पुल निर्माण करण्याची आवश्यकता
5. सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन तात्काळ रस्ते दुरुस्त करण्याची गरज
6. पाणी पुरवठ्यासाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व मलनिस्सारण मंडळाकडुन दुरुस्ती, नवीन पाईपलाईन करणे, पुनर्स्थापना करणे शक्य नसल्यास पाण्याच्या टँकरची सोय करणे.
7. जवळच्या पाण्याच्या स्त्रोतांचा शोध, पिण्यासाठी पाण्याची शुध्दता तपासणे.
8. मलनि:स्सारण पाईपलाईनच्या मोडतोडीमुळे तात्पुरत्या शौचालयाची उभारणी.
9. घरांच्या मोडतोडीमुळे दुरसंचाठी सार्वजनिक दुरध्वनी केंद्राची उभारणी
10. रुग्णालये, शाळेच्या इमारती व इतर सार्वजनिक सुविधा विस्कळीत झाल्यामुळे तात्पुरती पुनर्स्थापना करण्यास प्राधान्य देणे.
11. नदीच्या प्रवाहात बदल झाल्यामुळे तात्काळ स्थलांतराची आवश्यकता.
12. आवश्यक हाडांची मोडतोड, अस्थि शस्त्रक्री यावर उपचार.
13. मातीच्या ढिगा-याखाली असलेल्या व्यक्ती श्वान पथकाच्या सहाय्याने शोधणे.
14. अग्नीशामक दल व सैन्यदलाची आवश्यकता.
15. माहिती कक्षाकरीता घरातील व्यक्ती वेगळी करताना महत्त्वाची कामगिरी.
16. मुख्य मिळकतदाराच्या मृत्युमुळे झालेल्या कौटुंबिक मोडतोडीमुळे कुटुंबाचे दिर्घ मुदत तत्वावर आर्थिक पुनर्वसन करता येते.
17. मदतकार्यात दिरंगाई टाळण्यासाठी जिवीतहानी, मालमत्ता, पशुहानी याकरीता नुकसानभरपाई कार्यपध्दतीची आवश्यकता.
18. घरांचे अंशत: नुकसान झालेल्या घरांना मोडुन टाकण्याची आवश्यकता.
19. काही अंशत: नुकसान असल्यास तांत्रिक परिक्षणाची आवश्यकता.

20. शक्यतो नवीन घरे त्याच जागेवर बांधुन दिली जातील याकामी दिरंगाई होणार नाही व महाग पडणार नाही तसेच शक्य नसल्यास दुस-या ठिकाणी पुनर्वसन करण्यात येईल.
21. संकटातून वाचलेल्या मालाला तांत्रीक व्यक्तीच्या सहमतीची आवश्यकता.
22. संकटातून वाचलेला माल शक्यतो त्याच कुटुंबातील व्यक्तींना देणे.
23. उत्पादन कक्ष व रोजगार संकुलाची पुन:स्थापना.
24. व्यक्तीश: व गटांना मार्गदर्शनाची सोय.
25. जिल्हा प्रशासनाकडुन अशासकीय संघटना व स्वयंसेवी संस्थांना सामाजिक रचनेच्या पुन:स्थापनेसाठी नियुक्त करण्याची गरज.
26. विसर पडण्यासाठी लोकांना कामात गुंतवण्याची आवश्यकता.

**3) पूर-**

- पूर ही एक विस्तृत नैसर्गिक आपत्ती आहे. काही पूर यायला बरेच दिवस लागतात. तर काही अचानक येतात. अचानक येणारे पूर हे काही मिनीटातच त्यांच्याबरोबर खडक, चिखल वगाळ वाहून आणता. नदीच्या बाजूला तयार होणारी जमीनीची घसरण धोकादायक असते.

**1. पूराच्या पूर्वी**

- स्थानिक अधिकाऱ्याकडून ते क्षेत्र पूर येण्यासारखे आहे किंवा नाही ते पहावे. त्या पूराबाबतचा इतिहास तसेच पूराची पातळी इत्यादी विषयी माहिती करून घ्यावी.
- पूरा विषयी पूर्व सूचना लोकांना विशिष्ट यंत्रणाद्वारे देण्यात यावी. जेणे करून ते तयार राहतील.

**2. पूर निरीक्षणावेळी**

- पूराबाबतच्या चालू घडामोडी ऐकण्यासाठी रेडीओचा वापर करावा. तसेच स्वच्छ पाण्याचा साठा करावा.
- पूर येण्याची शक्यता वाटल्यास उंच भागाकडे स्थलांतर करा. कोणत्याही सूचनांचे वाट पाहू नका.
- वेळ असेल घरातील मौल्यवान साहित्य बरोबर घ्या.

**3. पूराच्या वेळी**

- घरात असाल तर
- रेडीओ ऐका व दुरदर्शन पहा व सावध रहा.
- घरा बाहेर असाल तर
- उंच ठिकाणी चढून तेथेच बसा, पुराच्या पाण्यातून चालू नये.
- पुराच्या पाण्यात मुलांना खेळू देवू नका.
- वाहनात असाल तर
- पूरक्षेत्रात प्रवास करत असाल तर दुसरीकडे निघून जा. जर वाहन अडकले असेल तर वाहन तसेच तेथेच सोडून उंच ठिकाणी पळा.

**4. पूरा नंतर**

- पाणी कमी व्हायला लागले तरी पूराचा धोका संपत नाही, रेडीओ किंवा दुरदर्शन बघून जोपर्यंत अधिकारी काही सूचना देत नाही तोपर्यंत बसून रहा.
- इमारतीमध्ये प्रवेश करताना अतिशय काळजी घ्या.
- भिंती, छत, दरवाजे, खिडक्या यांचे निरीक्षण करुन ते पडण्याच्या स्थितीत नाही ना ? ते पहावे.

- घरात शिरल्यानंतर सापासारखे प्राणी पूरासोबत वाहून येवू शकतात त्यापासून सावध राहा.
- मातीच्या ढिगाऱ्यातून चालतांना काठीने तो भाग चाचपून पहावे.
- घरात शिरलेले पाणी उपसून टाकावे.

5. **नियोजन-**

भारतातील पूरग्रस्त क्षेत्र निळया किंवा लाल रेषेने दर्शवितात. जेथे अंदाजे पंचवीस वर्षातुन एकदा पूर येतो असे क्षेत्र निळया रंगाने दर्शवितात व जेथे शंभर वर्षातुन एकदा पूर येतो असे क्षेत्र लाल रंगाने दर्शवितात. पूर नियंत्रणासाठी लागणा-या साधन साम्रगीची अत्यंत जोरदारपणे जमवाजमव करावी लागते.

**6. संबधीत जबाबदार विभाग**

1. महसुल, पोलिस, पाटबंधारे, व आरोग्यसेवा
2. सर्व मालमत्तेला हानी पोहोचल्यामुळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, दुरसंचार, व सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्य महत्त्वाचे ठरते.
3. कृषी व जिल्हा परिषदेचे पीक नुकसानी संदर्भात महत्तवाचे कार्य.
4. पशुहानी विषयी पशुसंबर्धन विभाग व जि.प.
5. आपत्ती व्यवस्थापनात जिल्हा प्रशासनास तात्काळ कृती केंद्राची मदत व सहकार्य.
6. पुरामुळे पसरणारे साथीचे रोग आटोक्यात ठेवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाचे पर्यवेक्षण आवश्यक.

**7. संभाव्य परिणाम**

1. जिवितहानी.
2. पाण्याद्वारे होणारी रोगांची लागण.

**8. करावयाची कार्यवाही**

1. पाण्याद्वारे होणा-या रोगांच्या प्रादुर्भावाकरीता वैद्यकीय लस असण्याची गरज.
2. अशा रोगांसाठी लसीकरणाची आश्यकता.
3. पूरात झाडावर अथवा इमारतीवर असणा-या माणसाना वाचविण्यासाठी होडी, नाव हेलिकॉप्टरचा उपयोग.
4. एखाद्या ठिकाणी स्थलांतराअभावी जास्त लोक पुरात अडकले असतील तर दळणवळणाची साधने पुरविणे आवश्यक.
5. अशा कामात अग्नीशमन दलातील व सैन्यदलातील जवानांची मदतीसाठी आवश्यकता.
6. सैन्यदलाची मदत घेऊन तात्पुरते पुल निर्माण करण्याची आवश्यकता.
7. सार्वजनिक बांधकाम विभागाकडुन तात्काळ रस्ते तयार करण्याची गरज.
8. पाणी पुरवठ्यासाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व मलनिस्सारण मंडळाकडुन दुरुस्ती, नवीन पाईपलाईन करणे, पुनर्स्थापना करणे शक्य नसल्यास पाण्याच्या टँकरची सोय करणे.
9. जवळच्या पाण्याच्या स्त्रोतांचा शोध, पिण्यासाठी पाण्याची शुध्दता तपासणे.
10. जलनि:स्सारण पाईपलाईनच्या मोडतोडीमुळे तात्पुरत्या शौचालयाची उभारणी.

11. घरांच्या मोडतोडीमुळे दुरसंचारसाठी सार्वजनिक दुरध्वनी केंद्राची उभारणी.
12. रुग्णालये, शाळेच्या इमारती व इतर सार्वजनिक सुविधा विस्कळीत झाल्यामुळे तात्पुरती पुनर्स्थापना करण्यास प्राधान्य देणे.
13. प्राधान्य क्रमानुसार सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत सार्वजनिक सुविधांची दुरुस्ती.
14. नदीच्या प्रवाहात बदल झाल्यामुळे तात्काळ स्थलांतराची आवश्यकता.

**9. तात्काळ मदतीसाठी व परिस्थिती लवकर पुर्ववत होण्यासाठी**

1. उत्पादन कक्ष व रोजगार संकुलाची पुन:स्थापना.
2. व्यक्तीश: व गटांना मार्गदर्शनाची सोय.
3. जिल्हा प्रशासनाकडुन अशासकीय संघटना व स्वयंसेवी संस्थांनी सामाजिक रचनेच्या पुन:स्थापनेसाठी नियुक्त करण्याची गरज
4. विसर पडण्यासाठी लोकांना कामात गुंतवण्याची आवश्यकता.

**10. पायाभुत सुविधांचे नुकसान व खंडीत सेवा**

1. इमारती
2. गोदामे
3. धरणे व पुल
4. रस्ते व रेल्वेमार्ग
5. विद्युतगृह
6. पाण्याच्या मार्गीका
7. गटारी
8. जमिनी खालील केबल
9. बंदर व लहान धक्के
10. दळणवळणाच्या तारा

**11. सर्व साधारण माहिती**

1. संभाव्य साथीच्या रोगाबद्दल मदत तुकड्यांना माहिती असणे गरजेचे व त्यानुसार काम करण्याची आवश्यकता.
2. साथीचे रोग टाळण्यासाठी पाण्याची शुध्दता पडताळून पाहाणे आवश्यक.
3. पावसापासुन संरक्षण होण्यासाठी व चारा, अन्न, इंधन झाकण्यासाठी प्लास्टीक वस्तुंची गरज.
4. घसरणीमुळे खराब झालेले रस्ते दुरूस्त करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग सदैव तत्पर असणे आवश्यक.
5. टेकड्यांच्या उतारावर घसरण झाल्यास तेथील रहिवाशांना सुरक्षित स्थळी हलविण्याची गरज.

**4) साथीचे रोग**

**1. नियोजन**

पाण्याची तपासणी व रोगवाहक आटोक्यात आणल्यास साथीचे रोग पसरण्यास मोठा आळा बसेल. विकृती शास्त्राच्या चाचणी प्रयोगशाळेच्या तत्पर प्रतिसादामुळे साथीचा रोग लवकर ओळखण्यास मदत होते.

**2. अग्रगण्य संस्था**

1. महसुल व आरोग्य विभाग
2. पुरामुळे होणा-या साथीच्या रोगांवर नियंत्रणासाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण महामंडळ तसेच पाटबंधारे विभागाचा सहभाग.
3. सहकार्य करणा-या संस्था :- पोलीस, होमगार्ड, सार्वजनिक बांधकाम विभाग

**3. संभाव्य परिणाम**

1. व्यक्तीश: परिणाम
2. जिवीत हानी
3. जखमी व्यक्तींसाठी आवश्यक असलेली वैद्कीय सेवा.

**4. करावयाची कार्यवाही -**

1. लसीकरणाची आवश्यता
2. दूषित पाणी पुरवठा टाळणे गरजेचे आहे.
3. जवळचे पाण्याचे स्त्रोत शोधुन चाचण्या घेणे आवश्यक.
4. मदत कार्य करणा-या संघटनांना साथीच्या रोगबाबत पुर्व माहिती देणे, त्याप्रमाणे त्या काळजी घेतील.
5. साथीला आळा घालण्यासाठी पाण्याच्या चाचण्या घेणे आवश्यक.
6. रोगवाहकाला ओळखुन त्याचे नियंत्रण करणे आवश्यक.
7. जीवनावश्यक औषधांचा मोठ्या प्रमाणात साठा उदा. सलाईन.
8. स्वसंरक्षणार्थ साधनांचा डॉक्टर व स्वयंसेवकांनी उपयोग करणे आवश्यक.
9. टाकाऊ पदार्थाच्या विल्हेवाटीची सोय.
10. प्रयोगशाळा व रुग्णालयामध्ये मदतीने पर्यवेक्षण व चाचणी सुविधा.

**5. तात्काळ मदतीसह परिस्थिती लवकर पुर्ववत होण्यासाठी व स्थलांतर थांबविण्यासाठी :-**

1. शुध्द पिण्याचा पाणी पुरवठा
2. घरी व रुग्णालयात रुग्णांची तपासणी
3. लसीकरणाचा कार्यक्रम
4. विकृती शास्त्रीय चाचणी प्रयोगशाळा

5. व्यक्तीश: मार्गदर्शन
6. घरगुती मार्गदर्शन

साथीचे रोग आटोक्यात आणण्यासाठी अशासकीय संघटना तज्ञ सहभागाची आवश्यकता.

**5) रस्ते अपघात**

1. **नियोजन-**

विषारी व अतिज्वलनशील पदार्थामुळे होणा-याअपघातात तात्पुरत्या स्थलांतराची गरज असते.

**2. अग्रगण्य संस्था**

1. महसुल, पोलिस व परिवहन विभाग
2. जिवीतहानी झाली असल्यास अग्नीशमन व आरोग्य खात्याची गरज
3. वाहन पाण्यात पडले असल्यास चालकाला वाचवण्यासाठी आवश्यक कार्यवाहीची गरज

**3. संभाव्य परिणाम**

जिवितहानी, जाळपोळ, विषबाधा, वैद्‌यकीय सेवा योग्य जखमा.

**4. करावयची कार्यवाही**

1. ब-याचशा घटनांमध्ये शस्त्रक्रिया तात्काळ आवश्यक.
2. अडकलेल्या माणसांचे प्राण वाचवणे (धातुचे पत्रे कापुन)
3. विषारी पदार्थामुळे अपघात झाल्यास तज्ञ अग्नीशामक दलातील व सैन्यातील जवानांची गरज
4. पुलावरुन पाण्यात वाहन पडल्यास गोताखोर आवश्यक
5. पोलीसांची मदत जागेला वेढा घालणेसाठी आवश्यक
6. रासायनिक अपघातात विशेष सेवेची आवश्यक तापण महामार्गावर उपलब्ध होणे शक्य नसते.
7. आवश्यकता वाटल्यास तात्काळ हलवणे आवश्यक
8. संकटातुन वाचलेल्या मालाला तांत्रीक व्यक्तीच्या सहमतीची आवश्यकता

**5. खंडीत सेवा**

1. रस्त्यांचे जाळे
2. वाहतुक
3. घातक पदार्थ रस्त्यावर पडलेला असल्यास रस्त्यावरील वाहतुक तात्काळ बंद करुन रस्ता स्वच्छ करणे आवश्यक, अशावेळी दुय्यम वाहतुक व्यवस्था केली जाते त्यावर नियंत्रक असणे आवश्यक.
4. अपघात स्थळ मोकळे करण्यासाठी विशिष्ट क्रेनची गरज.

5. अपघात स्थळी असलेल्या मालाला संरक्षण आवश्यक.

**6. दुय्यम परिणाम**

1. आग
2. वायु गळती

**7. आवश्यक बाबी**

1. आजुबाजुच्या रहिवाशांना वायुगळती बद्दल माहिती देऊन सावध करणे.
2. अशा परिस्थितीत अशा ठिकाणी चाचणी संघाकडुन तपासणी होणे आवश्यक.

**6) औदयोगिक आणि रासायनिक अपघात-**

1. **नियोजन**
    1. आग, वायु यांचा समावेश
    2. कारखान्याच्या व्यवस्थापनाने कारखान्यापासून बाधित झालेला भाग अपघात घोषित करावा.
    3. असा अपघात ओळखण्यासाठी सार्वजनिक अधिका-याकडे अधिकार सोपविले जातात.
2. **संबधीत जबाबदार विभाग**
    1. महसुल, पोलीस, अग्नीशमन व आरोग्य सेवा, नागरी संरक्षण संस्था, सार्वजनिक बांधकाम विभाग, कारखाने.
    2. परस्पर मदत व प्रतिसाद गट.
    3. सार्वजनिक सेवेसाठी तज्ञांची आवश्यकता.
    4. तत्पर माहिती पुरविणे
    5. आवश्यक बचावात्मक उपकरणे
    6. करावयाच्या उपाययोजना
3. **संभाव्य परिणाम**
    1. व्यक्तीगत परिणाम:- जाळपोळ, जिवीतहानी, वैद्यकीय सेवेयोग्य अशा जखमा.
4. **करावयाची कार्यवाही**
    1. सक्षम अग्नीशमन दल, परस्पर मदत व प्रतिसाद गट आवश्यक
    2. पोलीसांची आवश्यकता
    3. रासायनिक अपघातात जाळपोळीवर उपचारांची गरज
    4. जखमेचे स्वरूप लक्षात घेऊन त्याला उपचार केंद्रात हालविणे
    5. दिरंगाई टाळण्यासाठी जिवीतहानी, पशु व संपत्तीहानीची नुकसानभरपाई व सुलीच्या कार्यपध्दतीची गरज.
    6. ज्या ठिकाणी विषारी वायु पसरला असेल तेथे पोलीसांनी लक्ष ठेवणे आवश्यक.

7. परिस्थिती आटोक्यात येण्यासाठी वा-याची दिशा बदलणे.
8. हवा, पाणी व मातीच्या चाचण्या दिर्घकाळ घेणे आवश्यक.

**5. खंडीत सेवा-**

रस्त्यांचे जाळे - विद्युत पुरवठा - पाणीपुरवठा

**6. तात्काळ मदतीसह परिस्थिती पूर्ववत होण्यासाठी-**

1. उत्पादन कक्ष व रोजगार संकुलाची पुर्नस्थापना.
2. व्यक्तीश: व गटांना मार्गदर्शनाची सोय
3. विसर पडण्यासाठी लोकांना कामात गुंतवण्याची आवश्यक.

**7. उपाययोजना**

1. वाऱ्याच्या प्रवाहाच्या विरुध्द बाजुने पळा.
2. रासायनिक टाक्यांपाशी धुम्रपान करु नका.
3. हातरुमालाने आपले नाक व तोंड झाकुन घ्या.
4. गरगरणे अथवा भोवळ आल्यास लगेचच उपचार सुरु करा.
5. उलटलेल्या टाक्यांपासुन सांडलेली रसायने स्पर्श नका.
6. समुद्रात तेल सांडले असेल तर समुद्राच्या आसपास जाउ नका.
7. पाळीव प्राण्यांना मुक्त करा आणि त्यांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत करा.
8. वयोवृध्द, मुले, आजारी, व अपंग व्यक्तींना सुरक्षित ठिकाणी आसरा दयावा.
9. प्रदुषित जागेमध्ये जाण्यापासुन / आजुबाजूच्यांना थांबवा.
10. अपघात होउ शकेल असा रासायनिक अथवा गॅस टाक्यांपाशी गर्दी करु नका.
11. गॅस गळती जाणवल्यास गॅसबतीच मुठ बंद करुन टाका
12. जेव्हा तुम्ही हवेत विषारी विषारी वायुचा वास घेता, तेव्हा तुम्ही मोकळ्या मैदानावर जा आणी वाहत्या धुळीच्या सहाय्याने वाऱ्याची दिशा शोधुन काढा.

**7) मोठेवादळ (तुफान)**

**1. नियोजनाची गृहितके**

1. वादळ होण्याअगोदर माहिती मिळते पण त्यामुळे कोठे नुकसान होईल हे निश्चीत नसते.
2. वादळ व्यवस्थापनासाठी लागणा-या साधनसामग्रीची तात्काळ जमवा जमव करणे आवश्यक.

**2. संबधीत जबाबदार विभाग**

1. अग्निशामक दल, पोलीस व आरोग्य सेवा
2. महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ, दुरसंचार, सार्वजनिक बांधकाम विभाग.
3. कृषी विभाग.
4. पशुसंवर्धन विभाग.
5. तात्काळ कृती केंद्र.
6. साथींच्या रोगांसारख्या दुय्यम आपत्तीवर लक्ष्य ठेवण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभाग.

**3. संभाव्य परिणाम**

जिवित व वित्तीय हानी -

**4. करावयाची कार्यवाही**

1. महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचे वीज पुरवठा त्वरीत बंद करणे.
2. वरच्या विद्युत वाहक तारांना निरिक्षणाची आवश्यकता.
3. धरणाला गेलेले तडे दुरुस्त करण्यासाठी पाटबंधारे विभागची आवश्यकता
4. सैन्यदलाची मदत घेऊन तात्पुरते पुल दुरुस्त करण्याची मदत कार्यात गरज
5. सार्वजनिक बांधकाम विभागांकडुन तात्काळ रस्ते दुरुस्त करण्याची गरज
6. पाणी पुरवठ्यासाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाकडुन दुरुस्ती नवीन पाईपलाईन, पी.व्ही.सी. पाण्याच्या टाक्यांची पुनर्स्थापना करणे.
7. पुर्नस्थापना शक्य नसल्यास पाण्याचे टँकर.
8. जवळच्या पाण्याच्या स्त्रोतांचा शोध घेऊन चाचणी आवश्यक.
9. मलनिस्सारण पाईपलाईनच्या मोडतोडीमुळे तात्पुरता शौचालयाची व्यवस्था.
10. वायुनलीका तपासल्याशिवाय गॅस सोडु नये तोपर्यंत टाक्या पुरविण्यात याव्यात
11. दुरसंचारासाठी सार्वजनिक दुरध्वनी केंद्राची उभारणी
12. शाळा, रुग्णालये यांच्या सुरळीत सेवेसाठी तात्पुरती व्यवस्था.
13. समाजाच्या मदतीने वापरण्यास योग्य नसलेल्या धान्यांची विल्हेवाट लावणे.

14.पावसापासुन धान्य, इंधन, जनावरांचा चारा सुरक्षित ठेवण्यासाठी प्लास्टीक वस्तुंचा वापर आवश्यक.

15.समाजाच्या मदतीने राहत्या ठिकाणी व इमारतीमधील वाळुचा प्रश्न सोडविणे

16.अशासकीय संघटना व समाज एकत्रीकरण करुन त्यांच्या सहाय्याने वाळु काढणे व इतर कामात मदत.

17.कृषी विभागामार्फत कृषि जमिनी दुरुस्ती सहमाती परिक्षणाची सोय.

18.तात्काळ मदतीसह परिस्थिती पुर्ववत होण्यासाठी उत्पादन कक्ष व रोजगार संकुलाची पुर्नस्थापना.

19.व्यक्तीश: व गटांना मार्गदर्शनाची सुविधा.

20.जिल्हा प्रशासनाकडुन अशासकीय संघटना व स्वयंसेवी संस्थाना सामाजिक रचनेच्या पुन:स्थापनेसाठी नियुक्ती करण्याची गरज.

21.विसर पडण्यासाठी व्यक्तींना कामात गुंतवण्याची आवश्यकता.

22.धरणाला गेलेले तडे दुरुस्त करण्यासाठी पाटबंधारे विभागची आवश्यकता

23.सैन्यदलाची मदत घेऊन तात्पुरते पुल दुरुस्त करण्याची मदत कार्यात गरज

24.सार्वजनिक बांधकाम विभागांकडुन तात्काळ रस्ते दुरुस्त करण्याची गरज

25.पाणी पुरवठ्यासाठी महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्सारण मंडळाकडुन दुरुस्ती नवीन पाईपलाईन, पी.व्ही.सी. पाण्याच्या टाक्यांची पुनर्स्थापना करणे.

26.पुर्नस्थापना शक्य नसल्यास पाण्याचे टँकर.

27.जवळच्या पाण्याच्या स्त्रोतांचा शोध घेऊन चाचणी आवश्यक.

28.मलनिस्सारण पाईपलाईनच्या मोडतोडीमुळे तात्पुरता शौचालयाची व्यवस्था.

29.वायुनलीका तपासल्याशिवाय गॅस सोडु नये तोपर्यंत टाक्या पुरविण्यात याव्यात

30.दुरसंचारासाठी सार्वजनिक दुरध्वनी केंद्राची उभारणी

31.शाळा, रुग्णालये यांच्या सुरळीत सेवेसाठी तात्पुरती व्यवस्था.

32.समाजाच्या मदतीने वापरण्यास योग्य नसलेल्या धान्यांची विल्हेवाट लावणे.

33.पावसापासुन धान्य, इंधन, जनावरांचा चारा सुरक्षित ठेवण्यासाठी प्लास्टीक वस्तुंचा वापर आवश्यक.

34.समाजाच्या मदतीने राहत्या ठिकाणी व इमारतीमधील वाळुचा प्रश्न सोडविणे

35.अशासकीय संघटना व समाज एकत्रीकरण करुन त्यांच्या सहाय्याने वाळु काढणे व इतर कामात मदत.

36.कृषी विभागामार्फत कृषी जमिनी दुरस्ती साठी माती परिक्षणाची सोय.

37.तात्काळ मदतीसह परिस्थिती पुर्ववत होण्यासाठी उत्पादन कक्ष व रोजगार संकुलाची पुर्नस्थापना.

38.व्यक्तीश: व गटांना मार्गदर्शनाची सुविधा.

39.जिल्हा प्रशासनाकडुन अशासकीय संघटना व स्वयंसेवी संस्थाना सामाजिक रचनेच्या पुन:स्थापनेसाठी नियुक्ती करण्याची गरज.

**5. सेवेत खंड पडल्यामुळे होणारे नुकसान-**

इमारती, गोदामे, धरणे, पुल, रस्ते, रेल्वेमार्ग, विद्‌युतगृह व तारा, पाण्याचा टाक्या, बंदरे व लहान धक्के, दळणवळण व रेल्वे चिन्हे.

**8) वीज पडणे**

**1. नियोजनाची गृहितके**

1. आकाशात वीज चमकल्यानंतर दहा सेकंदानी मेघ गर्जनांचा आवाज आल्यास, तिथल्या अंदाजे तीन किमी परिसरात वीज पडण्याची शक्यता समजावी
2. वीज पडण्याअगोदर वीजेची माहिती मिळते पण त्यामुळे कोठे नुकसान होईल हे निश्चीत नसते.
3. वीज व्यवस्थापनासाठी नागरिकांमध्ये जनजागृती करणे.

**2. संबधीत जबाबदार विभाग**

महसूल विभाग, आरोग्य विभाग, पोलिस विभाग, साबांवि

**3. संभाव्य परिणाम**

जिवितहानी, सार्वजनिक व खाजगी मालमत्तेची हानी

**4. करावयाची कार्यवाही**

1. आकाशात वीज चमकल्यानंतर दहा सेकंदानी मेघ गर्जनांचा आवाज आल्यास, तिथल्या अंदाजे तीन किमी परिसरात वीज पडण्याची शक्यता समजावी
2. झाडाखाली आश्रय घेऊ नये. विजेच्या खांबाजवळ उभे राहू नये. झाडाच्या उंचीपेक्षा झाडापासून दुप्पट अंतरावर उभे राहणे.
3. मोबाईलचा, दुरध्वनीचा वापर करु नये.
4. सायकल अथवा दुचाकी वाहनाचा वापर टाळाणे
5. आपण एखाद्या मोकळ्या परिसरात असल्यास, गुडघ्यामध्ये डोके घालून खाली वाकून बसणे.
6. धातूच्या वस्तू दूर ठेवणे.
7. शेतात काम करित असाल व सुरक्षित ठिकाणाचा आसरा घेतला नसेल तर शक्यतो जिथे आाहात तिथेच रहाणे. शक्य असेल तर पायाखाली लाकुड, प्लास्टिक, गोणपाट अशा वस्तु अथवा कोरडा पालापाचोळा ठेवणे

# आपत्ती व्यवस्थापनाबाबत तयार करणेत आलेल्या गटांकरिता तपासणी सूची

**<u>तपासणी सूची शोध व बचाव पथकाकरिता</u>**

**१. आपत्तीपूर्व :-**

1) ग्रामपंचायत सरपंच, पोलीस पाटील, तलाठी मंडल अधिकारी व इतर महत्त्वाचे दूरध्वनी क्रमांची यादी करुन, संबधित तलाठी यांनी तालुक्यात कळविणे.

2) गावांबाबत खालीलप्रमाणे विस्तृत माहिती तालुका मुख्यालयास कळविणे.

अ)गावाचा विस्तृत नकाशा, सीमा व चिन्हांसह

ब)ओढे/नदी व नाले, कालवे यांची माहिती

क)संभाव्य बाधित कुटुंबाची यादी.

ड)धोका पातळीवरच्या रेषा निश्चित करण्यात आल्या आहेत काय

इ)पोहणा-यांची यादी

फ)बोटींची यादी.

ग)संभाव्य बाधित कुटुंबासाठी आवश्यक असणारा राखीव धान्य साठा व केरोसीनची आवश्यकता.

घ)संपर्कासाठीचे दूरध्वनी क्रमांक.

च)गावातील बाधित कुटुंबाच्या निवा-यासाठी पर्यायी इमारतीची माहिती.

छ)नजीकचे पोलीस स्टेशन.

ज)प्राथमिक आरोग्य केंद्राचे अंतर.

झ)रुग्णवाहिकांची माहिती.

त्र)स्वयंसेवी संस्था व सामाजिक संस्था यांची माहिती.

ट)विशेष आवश्यक सूचना (गावाच्या सुरक्षिततेच्या संदर्भात).

3) ग्रामपंचायत व तलाठी कार्यालय, जिल्हा नियंत्रण कक्ष, तालुका नियंत्रण कक्ष व इतर विभागांच्या नियंत्रण कक्षांच्या दुरध्वनी यादी ठेवणे.

4) गावतील संभाव्य बाधित कुटुंबातील यादी करणे व तालुक्यात कळविणे.

5) बुडणा-यांचे प्राण वाचवू शकणा-या पोहणा-यांची यादी करणे.

6) उपलब्ध बोटींची यादी करुन तालुक्यात कळविणे.

7) संभाव्य बाधित कुटुंबाच्या पर्यायी निवा-याकरीता, शाळा / मंगल कार्यालये यांसारख्या इमारती निश्चित करणे.

8) संभाव्य बाधित लोकांच्या भोजनासाठी राखीव धान्यसाठा, गहू/तांदुळ व केरोसीन प्राप्त करुन स्वस्त धान्य दुकानांत सुरक्षित ठेवणे.

9) गाव पातळीवरील आपत्ती निवारण समितीची स्थापना करुन कामनिहाय जबाबदा-या निश्चित करणे.

10)आपत्ती निवारण समितीत संबंधित गावचे तलाठी / ग्रामसेवक / पोलीस पाटील / पोलीस कर्मचारी / विद्‌युत मंडळाचा वायरमन / आरोग्य खात्याच्या कर्मचारी व स्वयंसेवी संस्था यांचा समावेश असावा.

**२. आपत्कालीन**

1) पाणी पातळी वाढल्यास त्याची माहिती तात्काळ तालुका मुख्यालयास कळवावी.

2) पाणी पातळी वाढताच जवळच्या पोलिस स्टेशनला माहिती देणे.

3) इशारा पातळी पर्यंत पाणी आल्यास दवंडी देणे व इशारा देऊन लोकांना सतर्क करणे.

4) संभाव्य बाधित लोकांचे स्थलांतर करणे.

5) स्थलांतरीत लोकांचे पूर्व नियोजीत पध्दतीने जेवण व निवा-याची सोय करणे.

6) जखमींच्या औषधोपचारांची सोय करुन गंभीर जखमींना आवश्यक मदतीसाठी जवळच्या रुग्णालयापर्यंत पोहोचविणे.

7) तालुका व जिल्हा मुख्यालयाला आवश्यक मदतीची पूर्व कल्पना देणे.

**३. उत्तेजनार्थ घटाकांची पुर्वतयारी**

आपत्तीमध्ये सर्व आवश्यक सेवा कोलमडून पडु शकतात व सर्व प्रकारची प्रशासकीय पुर्वतयारी असुन सुध्दा आपत्तीस्थानी पोहचणे शक्य होत नाही.

पुर्वतयारी ही सुध्दा खुप मोठया प्रमाणावर नुकसान व त्याचा परिणाम करू शकते. घटकांची पुर्वतयारी व प्रतिसाद क्षमता तपासण्यसाठी केलेले प्रशिक्षण व उत्तेजनात्मक अभ्यास ही आपोआप प्रशासनास बळकटी आणील व कार्यक्षमता वाढविल व त्यायोगे आवश्यक तयारी व स्थलांतर करणे सोपे जाईल. जिल्हा प्रशासन हे घटक तात्काळ प्रतिसाद संघासहीत सर्वच घटक पुर्वतयारी उपाययोजनांसाठी उत्तेजना व आधार देत आहे.

वर उल्लेख केलेल्या अशासकीय संघटनाव्यतिरिक्त चर्चेमध्ये खालील खाजगी दोन विभाग महीला मंडळे, धार्मीक संघटना, अशासकीय संस्था ही सातत्यपुर्ण प्रयत्न करून घटक स्तरावर पुर्वतयारीसाठी मदत करतील. तसेच ते घटक तात्काळ प्रतिसाद संघाची स्थापना करण्यासही चालना देतील.

घटकस्तरावर सर्वसाधारण पुर्वतयारी म्हणून घटकातील कुटुंबाना अंतर्गत (घरगुती) तसेच बाहय धोक्याबाबत सतर्ककेले जाईल. धोकादायक स्थितीबाबत प्रयोग करण्यासाठी घटकांना उत्तेजन दिले जाईल व त्याबाबत संभाव्य आपत्ती प्रतिसाद योजना तयार करता येईल. याप्रमाणे स्थानिक पातळीवरील संभाव्य धोक्याची क्षेत्रे लक्षात घेऊन त्याप्रमाणे स्थानिक आपत्ती व्यवस्थापन कृती योजना तयार करता येईल. ज्या भागात औदयोगिक क्षेत्रे जास्त आहेत अशा ठिकाणी परस्पर मदत व प्रतिसाद गट स्थापन करण्यात आली आहेत.सहकारी साखर उदयोगांना घटक पुर्वतयारी उपाययोजनेत सामील करून घेण्यसाठीही विशेष प्रयत्न केलेले आहेत.

**४. परस्पर मदत व प्रतिसाद गट**

जिल्हयामध्ये धोकादायक ठरू शकतील असे काही कारखाने आहेत या कारखान्याशेजारी किंवा त्यांच्या आवारात राहात असलेल्या लोकांच्या संरक्षणासाठी परस्पर मदत व प्रतिसाद गट स्थापन करण्याची गरज आहे. या भागामध्ये परस्पर मदत व प्रतिसाद गट स्थापन करण्याचे उद्देश.

1. औदयोगिक क्षेत्रे स्वावलंबी बनविणे.
2. औदयोगिक अपघातविरूध्द यशस्वी लक्ष देण्यसाठी सुविधा वाढविण्यासाठी उत्तेजन देणे.
3. कारखान्या अंतर्गत तसेच त्याबाहेरील होणा-या अपघाताचे व्यवस्थापन करणे.
4.आपत्ती व्यवस्थापन कार्यात प्रविण असलेल्या व्यक्तींचा सहभाग वाढवणे.
5.आपत्ती व्यवस्थापन कार्यात लागलेला प्रतिसाद कालावधी कमी करणे.
6.जिल्हा प्रशासनास आपत्ती व्यवस्थापन कार्यात मदत करणे.

**समाज घटक तात्काळ प्रतिसाद संघ**

बहुतेक आपत्तीमध्ये बाहेरून कोणतीही मदत येण्याच्या अगोदर समाजातील लोक तिथे हजर असतात. म्हणुनच समाज तात्काळ प्रतिसाद संघ व तरण स्वयंसेवक संघ

यांच्या गटाला प्रशिक्षण देऊन महत्वाची कामे हाती तर घेतलीचपरंतु व्यवस्थापनात आत्मविश्वास निर्माण करतील. समाज प्रतिसाद संघतात्काळ खालील बाबतील मदत करेल.

1) समाजस्तरावर प्रशिक्षणाचे व पुर्वतयारीचे असतात.
2) पुर्वसुचना मिळाल्यानंतर कुटुंबामध्ये पूर्वतयारी झाल्याची खात्री करणे.
3) समाज व प्रशासन यांच्यात दळणवळण जोडण्याचे काम करणे.
4) समाजातील तरूण व धडधाकट लोकांचा उपयोग स्वयंसेवकांना आधार म्हणून जेव्हा आवश्यक पडेल तेव्हा करून देणे.
5) शिजवलेले अन्न, प्रथमोपचार, कायदा व सुव्यवस्थेत सहभाग इ.सारखी मदत व सुटकेसाठी मदत करणेसाठी स्थानिक कृती संघ उभारणे.
6) विशेष मदत आवश्यक असणा-या अपंग व्यक्तींना मदत करणे.
7) मदत कार्य व स्थलांतर यात आवश्यक असलेल्या मदतसंघाची जलद हालचाल घडण्यासाठी मदत करणे.
8) ठराविक मोठया कामांचे व स्थलांतरीत मालमत्तेचे संरक्षण जोपर्यंत ती मालमत्ता ताब्यात घेत नाही तोपर्यंत तीचे रक्षण करणे. तसेच तहसिलदार व ग्रामपंचायत करत असलेल्या प्रयत्नात मत करणेची कार्यवाही ते करतील.

**६. समाज सहभागाची क्षेत्रे-**

लवकरात लवकर आपत्तीतून सुटका होण्यासाठी लोकांचे मानसिक धैर्य व आत्मविश्वास वाढण्यासाठी स्थानिक सुविधांचा जास्तीत जास्त वापर करून घेणेसाठी तसेच खर्चात बचत करण्यासाठीही प्रशासन व अशासकिय संस्थांनी जास्तीत जास्त लोकसहभागास महत्व दिले पाहिजे. या ठिकाणी हे लक्षात ठेवणे जरूरी आहे कि, आपदग्रस्तांपैकी सर्वच आधारहीन नसतात व त्यांच्यामधून मोठयाप्रमाणात मनुष्यबळ निर्माण होवू शकते. आपत्ती व्यवस्थापन परिस्थितीत अनेक पर्याय उपलब्ध असतात व्यवस्थापनातील सहभाग प्रशासनाचे ओझे ब-याच प्रमाणात हलके करू शकतो.

लातूर भूकंपाचा अनुभव लक्षात घेऊन तसेच स्थानिक लोकांमधील प्रेरक शक्ती त्यांचे स्वभाव लक्षात घेऊन लोकसहभाग वाढविणेसाठी योग्य धोरण विकसीत करण्यात आले आहे. त्यामुळे लोकांचा आपत्ती व्यवस्थापनाबाबत प्रशासनावरील सहभाग वाढलेला आहे.

**७. लोकसहभाग वाढविणेसाठी प्रयत्न**

1. स्थानिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती / नेते यांना ओळखून त्यांच्या क्षमतेवर विश्वास दाखविणे.
2. मदतीसाठी सल्लामसलत व सुसंवाद साधल्यास लोक नेतृत्वास पुढे येण्यास तसेच लोकशाही सहभाग वाढविण्यास मदत होईल.
3. सतत आढावा बैठका घेणे व प्रशासनात पारदर्शकता ठेवणे.
4. स्थानिक स्तरावर निर्णय प्रक्रियेत लोकसहभाग वाढविणे.

**८. स्थलांतर समयीचा लोकसहभाग**

स्थलांतर - कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी व सुरक्षेच्या दृष्टीने स्थलांतर हे समाजनेते व सामाजिक संघटना यांच्या सहकार्यानेच हाती घेतले पाहीजे. संपूर्ण कुटुंबाचे स्थलांतर एकत्रच केले पाहिजे. परंतु पळापळ, गोंधळ व अपुरी वाहतुक व्यवस्था उपलब्ध असल्यास तात्काळ स्थलांतर खालील प्रमाणे हाती घ्यावे.

१) गंभीररित्या जखमी व आजारी.

२) मुले, स्त्रीया व अपंग

३) वृध्द

४) धडधाकट सत्री - पुरूष

तात्काळ स्थलांतरासाठी पाणी, अन्न, कपडे व तात्काळ आवश्यक बाबी कमीत कमी तीन दिवस पुरतील एवढे घेण्यासाठी कुटुंबाना प्रोत्साहीत करावे. कुटुंबाना खालील बाबी घेण्यासाठीही प्रोत्साहीत केले जाईल.

१) झाकलेल्या व मजबूत भांडयामध्ये पुरेसा पाण्याचा साठा.

२) कोरडे धान्य व लवकर खराब न होणार अन्न यांचा साठा.

३) कपडयांचे जोड व पावसाळी कपडे.

४) ब्लँकेट, बेडशीट व टॉवेल.

५) बॅटरीवर चालणारे रेडिओ.

६) प्लॅस्टीक पासून बनवलेले बादल्या मग इ.

७) रोख रक्कम व दागदागिने.

८) स्वत:ची औषधे.

९) रेशनकार्ड, पासपोर्ट, बँक पासबुक, पत्ते (नातेवाईकांचे दुरध्वनी क्र. प्रमाणपत्र, वाहन चालविण्याचा परवाना मालमत्तेविषयक कागदपत्रे इत्यादी कौटुंबिक कागदपत्रे.)

घर / गाव सोडण्यापूर्वी लोकांना वीज तसेच पाण्याचा पुरवठा मुख्य ठिकाणावरुन बंद करण्यास सांगावे. बॅटरीवर चालणारा रेडीओ ऐकण्यास सांगून त्यावरील स्थानिक सूचना पाळण्यास सांगावे.

**९. इतर परिस्थितीत लोकांना खालील बाबी करण्यास सांगावे.**

१) संरक्षक कपडे घालणे.

२) घरांची दारे, खिडक्या बंद करुन घेणे.

३) पाण्याची झडप व वीजेचा प्रवाह मुख्य स्त्रोतापासून बंद करणे.

४) लवकरात लवकर आपत्तीत सापडण्याआधी घर सोडणे.

५) शिफारस केलेलाच मार्ग स्थलांतरासाठी वापरावा. जवळच्या मार्गाचा वापर करु नये कारण कदाचती ते बंद झालेले असू शकतात.

६) पुरग्रस्त क्षेत्राकडे जाऊ नये.

७) खाली लोबळणा-या विजेच्या तारांपासून सुरक्षीत रहावे.

८) लोकांसाठी उभारलेल्या निवा-यात जनावरांना परवानगी देऊ नये.

९) जनावरांच्या मृत्युचा धोका टाळण्यासाठी जनावरांना स्थलांतरापूर्वीचा सोडून देण्यास सांगावे.

जर स्थलांतरासाठी वाहन व्यवस्था नसेल तर जनावरांनाही बरोबर घेऊन जाण्याचा सल्ला लोकांना द्यावा.

**१०. आपत्तीसमयी लोकनेत्यांचे कार्य.**

१. लोक शांत कसे राहतील, तसेच धसका घेणे, व्याकुळ वागणे करणार नाहीत तसेच सैरावैरा धावणार नाहीत व एकाच ठिकाणी गर्दी करणार नाहीत.

二. जखमी होण्यापासून संरक्षण मिळविण्यासाठी लोकांना सुरक्षित स्थळी थांबण्यास सांगावे

三. लोकांनी नादुरुस्त घरे, निवासस्थाने तसेच स्वताच्या घरातही प्रवेश करु नये.

四. विजेचे खांब, विद्युत वाहम तारा यांनाही लोकांनी स्पर्श करु नये, तसेच जिवावर बेतण्याइतकी परिस्थिती आल्यानंतरच दुरध्वनीचा वापर करावा.

五. जखमींची तपासणी करावी. गंभीररित्या जखमी झालेल्या लोकांना मरणाचा धोका असल्याशिवाय लगेच हलविण्याचा प्रयत्न करुन नये .

六. जिल्हा आपत्ती कृती व्यवस्थापन योजनेत दिल्याप्रमाणे प्रथमोपचाराची व्यवस्था करावी

七. पाण्याचे पाईप जर फुटले असतील तर मुख्य झडपेपासूनच पुरवठा बंद करावा

八. पोलीसांनी आग किंवा मदत कार्यासाठी मदत मागेपर्यंत लोकांनी आपदग्रस्त क्षेत्राच्या बाहेरच थाबांवे.

九. लहान आगीच्या बाबतीत आग विझविण्याकामी तसेच सुटका करण्यासाठी लोकांचा उपयोग करुन घ्यावा.

十. कोणतेही नुकसानग्रस्त साहित्य कार्यालयीन चौकशी झाल्याशिवाय फेकुन देऊ नये.

十一. पोलीसांना कायदा व सुव्यवस्था राखण्यात तसेच स्थलांतरीत मालमत्तेवर लक्ष ठेवण्यास मदत करणे.

**११. मदत व पुनर्वसन कार्य**

आपत्ती झाल्यानंतर लगेच आपत्तीग्रस्त लोकांना नैराश्य आल्यासारखे होईल परंतु सगळे काही संपलेलेनाही असे लक्षात आल्यानंतर ते परत उल्हासित होतील. यावेळी लोकांचा सहभाग अपादग्रस्त लोकांना मानसिक धैर्य देण्यासाठी तसेच लवकरात लवकर त्यांना

पुर्वस्थितीत आणण्यासाठी होतो. अपादग्रस्त क्षेत्रात मदत करणा-या अधिका-यांनी खालील बाबींवर लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

1. त्यांच्या प्रत्येक कार्यात स्वालंबन कसे होईल याला उत्तेजन देणे.
2. खराब झालेला अन्न साठा, मृत जनावरांची विल्हेवाट, मृत व्यक्तींच प्रेताची विल्हेवाट, तसेच मृत व्यक्तींची ओळख पटविणे व ठावठिकाणा शोधणे कामी आपदग्रस्त व्यक्तीचे सहकार्य करणे.
3. नुकसान झालेल्या व हरविलेल्या मालमत्तेची नोंद ठेवण्यात मदत करणे.
4. ओझे चढवणे, उतरविणे, वाटप कार्य, तात्पुरते बांधकाम पाणीपुरवठा अन्न वाटप मदत शिबीरे, पशुशिबीरे इ कामाच्या बाबतीत त्यांची मदत करणे.
5. कायदा व सुव्यवस्था राखण्यात कदत करणे.
6. स्वच्छतेची गुणवत्ता राखण्यास व टाकाऊ पदार्थांची विल्हेवाट राखण्यास मदत करणे.
7. लोकांचे मानसिक आरोग्य वाढविण्यासाठी त्याच प्रमाणे त्यांना नैतिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी करमणुकीच्या कार्यक्रमांना उत्तेजना देणे.

## १२. कुटुंब स्तरावर पुर्वतयारी

लोकांना कुटुंस्तरावरील पूर्वतयारीसाठी उत्तेजन देण्यासाठी प्रत्येक आपत्तीचे स्वरुप व त्यामुळे होऊ शकणारे नुकसान, व त्यासाठी कुटुंब स्तरावर व समाज स्तरावर कराव्या लागण-या उपाययोजना या विषयी ओळख करून देण्यात यावी. कितीही योग्य नियोजन केले तरीही आपत्तीमुळे होणारा परिणाम तसेच प्रसिसादासाठी लागणारा वेळ तंतोतंत काढता येणार नाही. अशा परिस्थितीत कुटुंबाना खूप दुरवरचे नियोजन करणे भाग पडेल, तरी समाजाचे एकत्रीत प्रयत्न आपत्तीची तीव्रता कमी करण्यास उपयोगी पडले तरीही मुख्य ओझे त्या कुटुंबावरच पडेल म्हणून कुटुंबाना घरापर्यंत घडू शकणारे अपघातावर नियंत्रण तसेच तात्काळ उपाययोजना करण्याविषयीची यादी प्रमाणे तयार केली पाहिजे.

## १३. घरातंर्गत अडचणीवर नियंत्रण

घरांची वर्षातून एकदा संपूर्ण तपासणी करून घरांतर्गत येवू शकणा-या अडचणी शोधून त्यांचे निराकरण करणे जसे की एखादी वस्तू पडणे, फुटणे किंवा आग लागणे

## १४. विदयुत विषयक अडचणी तपासणे

केबल, प्लग जोडण्या यांच्यापैकी खराब झालेल्या वस्तूंच्या दुरुस्त्या किंवा बदलणे, उपयोग न केलेल्या केलेल्या तसेच केबल्स, नको असलेले प्लग पॉईंट काढून टाकणे

## १५. घरातील ज्वालामुखी वस्तूंची तपासणी

साठा करण्यासाठी योग्य जागा ( प्रकाश व्यवस्था, हवेची येजा ) होण्यासाठी व्यवस्था

उष्णता तसेच मुले पोहोचू शकणार नाहीत, अशी जागा, केरोसीन,डिझेल इ. ज्वालाग्राही द्रव्य साठविण्यासाठी योग्य भांडयांची व्यवस्था, सांडणे, लवंडणे, यासाठी सावधगिरी बाळगणे.

**१६. आगी विषयक सावधगिरी**

घरगुती सामान ज्वालाग्राही पदार्थापासून दूर ठेवणे, जळाऊ पदार्थापासून इंधन दूर ठेवणे, विदयुत पुरवठयाची जागा, झडपी तसेच हवेच्या दाबावरील स्टोव्हची स्वच्छता राखणे.

**१७. तात्काळ तपासणी यादी**

1. आपल्या क्षेत्रात  कोणत्या प्रकारची आपत्ती येऊ शकते हे शोधून काढणे
2. प्रत्येक आपत्तीसाठी काय तयारी करायची याची विचारणा करा
3. लोकांच्या स्थलांतरणाच्या मार्गाचीमाहिती करून घेणे
4. निर्देशित केलेल्या आश्रयस्थाना विषयी माहिती करून घेणे.
5. अपंग आणि वृध्द व्यक्तींना मदतीसाठी विचारणा करा.
6. कार्याच्या ठिकाणावरील तात्काळ योजने विषयी माहिती करून घ्या.
7. मुलांच्या शाळा, पाळणा घराविषयी माहिती ठेवणे.

**१८. तात्काळ योजना तयार करणे.**

घरातील सदस्यांशी चर्चा करा, आग, हवामान, भुकंप व इतर तात्काळ परिस्थिती बाबत मुलांशी चर्चा करा.

- प्रत्येक घडु शकणा-या आपत्तीला प्रतिसाद कसा घ्यावा चर्चा करा.
- आपत्ती विषयी अगोदरच मुलांना माहिती दिल्यास आपत्ती आल्यानंतरची परिस्थिती त्यांना लवकर समजायला मदत होईल. काही आपत्ती नैसर्गिक असतात व जरी हवा खूप धोकादायक असल्या तरी योग्य ती पुर्व काळजी घेतल्यास त्यापासून जिवीत हानी वाचू शकते ही बाब त्यांना पटवून द्या.
- प्रत्येक आपत्तीवेळी घ्यावयाची सुरक्षीततेची काळजीबाबत.
- अपंग किंवा शारिरीक दृष्ट्या अक्षम व्यक्तीस मदत करणेसाठी नातेवाईक, मित्र, सहकारी यांचे जाळे निर्माण करा.
- अपंग व्यक्तींना ओळखण्यासाठी वैदकीय तत्पर खुणेची व्यवस्था करणे.

**१९. आपत्कालीन पुरवठा सामान**

तात्काळ स्थलांतरावेळी कुटुंबाला या अगोदर सविस्तर माहिती देणे तसेच अन्न, पाणी व वस्त्र अशा परिस्थितीत बरोबर घेण्यास सांगावे.

**२०. स्थलांतराची तयारी**

जेव्हा लोकाना स्थ्लांत आवश्यक होईल तेव्हा स्थनिक अधिकारी विविध माध्यमाव्दारे लोकांना याबाबत माहिती देतील. शासकीय संस्था व इतर आपत्ती विषयक मदत देणारे संस्था तात्काळ निवा-याची व आवश्यक गरजांचा पुरवठा करतील.

स्थलांतर करण्यासाठी लागणारा वेळ आपत्तीच्या स्वरुपावर अवलंबून असेल. वादळा सारख्या आपत्तीची व्यवस्थित निरीक्षण केले तर एक किंवा दोन दिवस तयारीसाठी मिळू शकतात. परंतु ब-याच आपत्ती लोकांना त्यांच्या आवश्यक गरजेचे सामान गोळा करे पर्यंतही वेळ देत नाहीत. त्यासाठीच स्थलांतर योजना महत्त्वाची असते.

**२१. निवारा -**

आपत्ती काळात निवारा घेणे सुध्दा अवघड असते. याचाच अर्थ असा होतो की, विजेच्या अभावी व बाहेर वादळ चालू असतांना बंदिस्त घरामध्ये आश्रय घेणे.

ब-याच आपत्ती काळात स्थानिक अधिकारी, शाळा, न.पा.इमारती व प्रार्थना स्थळा मध्ये निवायाची उभारणे करतात. तसेच अन्न, पाणी, औषधे व प्राथमिक स्वच्छतेच्या सोयी प्रशासन करतेच परंतु लोकांनी आपल्या बरोबर स्वतःचा पुरवठा ठेवणे आवश्यक आहे.

**२२. निर्देशित केलेल्या निवा-यातच राहणे.**

1) जोपर्यंत स्थानिक अधिकारी सांगतात तोपर्यंत त्या निवा-यात रहावे. काही तासांपासून तर काही दिवसांपर्यंत तिथे रहावे लागेल.
2) धुम्रपान करू नये.
3) निवा-यात राहणा-या इतर लोकांशी तसेच स्थानिक अधिका-याशी सहकार्य करावे.
4) रेडीओवर केले जाणारे निवेदन लक्षपूर्वक ऐकावे.
5) आगीवर लक्ष करावे.
6) पाणी व शिजवलेले अन्न व इतर मदत साहित्य तसेच वैद्‌यकीय सेवा इ. च्या व्यवस्थापनात स्थानिक अधिकाऱ्यांना मदत करावे.
7) पाळीव प्राणी व गुरे यांची निवाऱ्यात जाण्यापूर्वी व्यवस्था करावी. त्यांना सार्वजनिक निवाऱ्यात आरोग्याच्या कारणास्तव प्रवेश देवू नये.
8) मुलांसाठी करमणूक कार्यक्रमाचे आयोजन करावे.
9) कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी स्थानिक अधिकाऱ्यांना मदत करणे.

**२३. आपत्तीनंतरचे मदत कार्य-**

जेव्हा आपत्ती घडते तेव्हा त्यातील गरजवंतांना मदत करण्याची तयारी सर्वच लोकांची असते. या औदार्याचा योग्य तो वापर करण्यासाठी प्रसारमाध्यमांनी खालील बाबींवर जास्त भर द्‌यावा.

1. आपत्तग्रस्तांसाठी आर्थिक मदत ही तातडीची गरज असते. आर्थिक मदतीचा योग्य त्या उद्देशासाठी वापर होण्यासाठी ती शासकीय यंत्रणेद्‌वारे देण्यात यावी.

2. अन्न व कपडे दान करणे अगोदर स्थानिक अधिकाऱ्यांच्या सूचना लक्षात घ्याव्यात. आपत्ती इ. आल्यानंतर लगेचच मदत देण्यासाठी वितरण व्यवस्था किंवा तेवढा वेळ मदत कार्याकडे नसल्यामुळे बरीच मदत वाया जाते.
3. स्वयंसेवकांनी सुध्दा प्रसिध्द अशाशासकीय संस्थेमार्फतच काम करावे. कारण त्या संस्थेस लोकांच्या गरजा माहित असतात. व योग्य ती पूर्वतयारी त्यांनी केलेली असते. स्थानिक अधिकाऱ्यांनाही स्वयंसेवकाच्या प्रयत्नात समन्वय दाखविण्याचा प्रयत्न करावा.
4. समाजगट व संघटना जे दान देवू इच्छितात त्यांनाही सर्व प्रथम स्थानिक अधिकाऱ्यांशी संपर्क साधायला हवा जेणेकरून कशाची गरज आहे व कोठे पाठवायचे याबाबत योग्य तो निर्णय घेता येईल. विविध वस्तु पाठविण्याकरीता नेहमीच तयारीत रहावे. परंतु अधिकाऱ्यांकडून वाहतूक व्यवस्था व चालक इ. ची अपेक्षा करू नका.

**प्रकरण 7**

# आपत्ती धोके, धोके प्रवणता व धोके मूल्यांकन

## ७.१ बहु आपत्ती प्रवण माहीती

| अ.क्र | आपत्ती | जास्त धोक्याचे तालुके | कमी धोक्याचे तालुके |
|---|---|---|---|
| १ | पूर | मिरज, पलूस, शिराळा, वाळवा | जत, तासगाव, कडेगाव, आटपाडी, विटा, क.महांकाळ, |
| २ | भूकंप | --- | सर्व तालुके (सिसमिक) झोन3 |
| ३ | दुष्काळ | मिरज (पूर्व भाग, जत, क.महंकाळ, आटपाडी, तासगाव, विटा, कडेगाव) | पलूस शिराळा, वाळवा |
| ४ | औद्योगिक अपघात | मिरज, वाळवा, तासगाव | --- |
| ५ | दरड कोसळणे | शिराळा | --- |

वरील तपशीलनुसार जिल्हयातील संभाव्य आपत्तीचे वर्गीकरण करणेत आलेले आहे. जिल्हयामध्ये घडणाऱ्या पूर, औद्योगिक अपघात, गारपीट, दरड कोसळणे, धरणफुटी, आग अत्यावश्यक पायाभूत सुविधा करीता तात्काळ प्रतिसाद देणे आवश्यक असते. त्याचप्रमाणे सांगली जिल्हयामधील कृष्णा व वारणा नदी, शिराळा तालुक्याचा भूकंपप्रवण क्षेत्र, जत व आटपाडी या तालुकेमध्ये कमी पाऊसाचे प्रमाण इ. सांगली जिल्हा बहुआपत्ती प्रवण क्षेत्रामध्ये येतो. विविध रसायने/रासायनिक पदार्थ याची होणारी वाहतूक, सांगली जिल्हयामधून जाणारा रेल्वे मार्ग, पूणे -बेंगलोर महामार्ग, मिरज -पढंरपूर महामार्ग यावरील /नजीकची गावे आपत्ती प्रवण क्षेत्रामध्ये येतात.

## ७.२ भौतिक धोके प्रवणता

| धोके प्रवणता | गावांची संख्या/ठिकाण | लोकसंख्या | पशुधन नुकसान होते का? | वीजेचे नुकसान होतेका? | पिण्याचेपाणी नुकसान होते का? |
|---|---|---|---|---|---|
| पूर | १०५ | ८७८४१ | होय | होय | होय |
| भूकंप | - | - | होय | होय | होय |
| मध्यम दुष्काळ(सन २०१७-१८) | २८५ | - | होय | नाही | होय |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| औद्योगिक अपघात | १० | - | नाही | होय | होय |
| दरड कोसळणे | ४ | २४८३ | होय | होय | होय |

### ७.३ आरोग्य सुविधा

| आपत्ती प्रकार | जिल्हा रूग्णालय | ग्रामीण रूग्णालय | प्राथमिक आरोग्य केंद्र | पशु वैद्यकीय दवाखाने |
|---|---|---|---|---|
| पूर | ०१ | ५ | १८ | ७६ |
| भूकंप | ०१ | २ | ७ | २० |
| औद्योगिक अपघात | १ | ३ | १५ | २४ |

### ७.४ पूर धोके मूल्याकंन

२०१९ व २०२१ महापूर या नैसर्गिक आपत्तीमूळे सांगली जिल्ह्यातील कृष्णा व वारणा नदीकाठावरील गावांची मोठ्या प्रमाणावर जिवितहानी व वित्तहानी झालेली आहे.या महापूरामूळे मिरज, शिराळा, वाळवा ,पलूस या तालुकयाचे नुकसान झाले होत.संभाव्य पूर प्रवण गावांची माहीती परिशिष्ठ मध्ये जोडणेत आलेले आहे.

### ७.५ भूंकप धोके मूल्यांकन

भूकंप ही नैसर्गिक आपत्ती असून अचानकपणे जमिनीच्या अतंर्गत हालचाल होऊन जमिनीस धक्के बसतात यामूळे मोठ्या प्रमाणावर जिवितहानी व वित्तहानी होते. भूकंपामूळे होणा-या नुकसानीचे प्रमाण भूकंपाची तीव्रता, भूकंप झालेले ठिकाण, भूकंपाचे केंद्र बिंदू यावरती अवलंबून असते. भूकंपाचे धक्क्याने मोठ्या प्रमाणावर घरे कोसळणे, इमारत कोसळणे, रस्ते दुभंगणे, पूल कोसळणे इ.पायाभूत नुकसान होते.

### ७.६ आरोग्य विभाग

| अ.क्र | धोके प्रवण क्षेत्र | कारणे | परिणाम |
|---|---|---|---|
| 1 | सांग़ली जिल्ह्याचे ठिकाण (सांगली-मिरज-कुपवाड) | जास्त लोकसंख्या, महानगरपालिका क्षेत्र | जिवित हानी व वित्तहानी |
| 2 | सर्व तालुकेचे ठिकाणे | जास्त लोकसंख्या तालुक्याचे ठिकाण | जिवितहानी व वित्तहानी |
| 3 | औद्योगिक वसाहत (सांगली, ऑईल डेपो, साखर कारखाने, कोल्ड स्टोअरेज) | औद्योगिक आस्थापना | आग लागणे, स्फोट,तेल रसायन गळती, इमारत कोसळणे |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | जमीनीखालील पाईप लाईन | तेल वाहतूक, पाणीपुरवठा करणारे पाईपलाईन | वरील प्रमाणे |
| 5 | रस्ते, रेल्वे, पूल | राष्ट्रीय महामार्ग,राज्य महामार्ग, रेल्वे महामार्ग | वाहतूक गर्दी,अन्नधान्य तुटवडा निर्माण होणे इ. |

## ७.७ औद्योगिक / रासायनिक अपघात धोके मूल्यांकन

| अ.क्र | धोक्याचे प्रकार | स्त्रोत | परिणाम |
|---|---|---|---|
| 1 | हवा प्रदूषण (मानव निर्मित आपत्ती) | वायू गळती, रासायनिक घटकाचा वातावरणात समावेश, रसायनाचा साठा ,स्फोटक पदार्थ | जिवित हानी ,जमीन प्रदुषण,पाणी प्रदूषण |
| 2 | पाणी प्रदूषण (मानवनिर्मित आपत्ती) | तेल गळती, औदोगिक रसायने, पाण्यात सोडणे, पाईप लाईन बंद पडणे | वरील प्रमाणे |
| 3 | पर्यावरण धोके (नैसर्गिक आपत्ती पूर, भूकंप इ) | वरील प्रमाणे | वरील प्रमाणे |

## ७.८ क्षमता मूल्यांकन

| अ.क्र | धोके | पूर्व सूचना यंत्रणा | पूर्व तयारी | तात्काळ प्रतिसाद |
|---|---|---|---|---|
| 1 | पूर | नदी/धरणाची पाण्याची पातळी इ .माहीती घेणे | स्थलांतरासाठी ठिकाणाची माहीती ठेवणे, शोध व सूटका टीम तयार ठेवणे | शोध व सुटका, प्रथोमोपचार |
| 2 | भूकंप | ---- | सुरक्षित ठिकाणाची माहीती ठेवणे | शोध व सुटका, प्रथमोपचार |
| 3 | दुष्काळ | ---- | चारासाठा, अन्नधान्य, पिण्याच्या पाण्याची स्त्रोताची माहीती ठेवणे | पाण्याचे टॅकर चालू करणे, चारा छावणी चालू करणे |
| 4 | औद्योगिक अपघात | स्थानिक प्रशासन | आपत्ती प्रतिसाद योजना तयार ठेवणे | स्थानिक प्रतिसाद पथक |
| 5 | दरड कोसळणे | --- | डोंगरकडा पायथालगतची गावाची माहीती ठेवणे,स्थंलातर ठिकाणाची माहीती ठेवणे | शोध व सुटका प्रथोमोपचार |

### ७.९ पूर आपत्तीला सामोरे जाणेकामी क्षमता/साधने

| अ.क्र | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | पूर प्रवण गावे + सांगली महानगरपालिका | १०५ |
| २ | पोहणा-या व्यक्तीची संख्या | ८६६ |
| ३ | डॉक्टर पथक संख्या | १०४ |
| ४ | पशुवैद्यकीय डॉक्टर्स | |
| ५ | मोटर बोट | ७२ |
| ६ | लाकडी बोट | १३ |
| ७ | लाईफ जॅकेट | १७०० |
| ८ | लाईफ रिंग | २६२ |
| ९ | टॉर्च | २०० |
| १० | फ्लोटिंग पंप | ०५ |
| ११ | मेगाफोन | १३३ |
| १२ | बी.ए.सेट | १० |
| १३ | हेल्मेट | ११७ |
| १४ | लाईटनिंग सिस्टिम | २० |

### ७.१० भूकंप आपत्तीला सामोरे जाणेकामी क्षमता/साधने

| अ.क्र | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | भूकंप प्रवण गावे | - |
| २ | सुरक्षित ठिकाणे | ४० |
| ३ | शासकीय डॉकटर्स पथक | ०७ |
| ४ | अर्थ मुव्हर्स (खाजगी) /जेसीबी | १२ |
| ५ | डंपर (खाजगी) | १५ |

### ७.११ औद्योगिक अपघातास सामोरे जाणेकामी क्षमता/साधने

| अ.क्र | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | विशेष प्रतिसाद पथक | ०१ |
| २ | तज्ञ व्यक्ती | ०६ |
| ३ | फायर फायटर्स | ०७ |
| ४ | वैद्यकीय पथक | १५ |
| ५ | मेडिकल स्टाफ | ०५ |

## ७.१२ दरड कोसळणे या आपत्तीस सामोरे जाणे कामी क्षमता/साधने

| अ.क्र | तपशील | संख्या |
|---|---|---|
| १ | संभाव्य दरड कोसळणेची शक्यता असलेली गावे | ०४ |
| २ | सुरक्षित ठिकाणे | ०४ |
| ३ | शासकीय डॉक्टर्स पथक | ०७ |
| ४ | डंपर | ०६ |
| ५ | अर्थमुव्हर्स | ०५ |

## ७.१३ भविष्यातील आपत्ती, आपत्ती अपघात संभावना

| अपघाताची माहिती | भूकंप | पूर | वादळ | साथीचे रोग | औदयोगिक तथा रासायनिक | आग | विविध रस्ते अपघात |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जीवीत हानी | ०४ | ०२ | ०२ | ०४ | ०२ | ०२ | ०२ |
| वित्त हानी | ०४ | ०६ | ०० | ०२ | ०० | ०० | ०२ |
| जनावरे व पशूधन हानी | ०४ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० |
| नियोजन व शेतीचा -हास | ०२ | ०६ | ०० | ०२ | ०० | ०० | ०० |
| सामाजिक | ०२ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |
| जीवनाचा -हास | ०२ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| व्यवसायाची हानी | ०४ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०२ |
| अत्यावश्यक सेवांची हानी | ०४ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०२ |
| पायाभूत व्यवस्था हानी किंवा शासनाच्या प्रणालीची दूरावस्था | ०४ | ०२ | ०० | ०० | ०० | ०० | ०२ |
| राष्ट्रीय अर्थ व्यवस्थेवरील परिणाम | ०२ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०२ |
| सामाजिक व मानसिक दुष्परिणाम | ०२ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०२ |

अतितीव्र-१० तीव्र -०८, साधारण -०६ सौम्य-०४, नगण्य-०२, निरंक-००

## ७.१४ आपत्ती आणि महत्त्वाच्या सेवावरील परिणाम

| महत्वाच्या सेवा | महत्वाच्या सेवा प्रवण असलेल्या आपत्ती | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | भूकंप | पूर | वादळ | साथीचे रोग | आग | विविध रहदारीचे अपघात | औदयोगिक आणि रासायनिक अपघात |
| वाहतूक प्रणाली (रस्ते) | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| वाहतूक प्रणाली (रेल्वे) | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| विदयुत पुरवठा | होय | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही |
| पाणी पुरवठा | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| सांडपाणी व्यवस्था | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| रूग्णालय | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| धान्य साठा व पुरवठा | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही | नाही |
| संदेशवहन प्रणाली | होय | होय | होय | नाही | नाही | नाही | नाही |

## ७.१५ सांगली जिल्ह्यातील धोके प्रवणता

| **1** | **धोके परिणाम** | **उत्तर** |
|---|---|---|
| अ | सांगली जिल्ह्याला कोणत्या एक अथवा बहुविध मोठ्या आपत्तीना सामोरे जावे लागते ? | पूर, दुष्काळ, |
| ब | आपत्ती येण्याच्या बाबत काही बदल दर्शवित आहे का? | गारपीट तसेच अवकाळी पाऊस यांना सामोरे जावे लागत आहे. |
| **2** | **आपत्ती प्रवणता** | **उत्तर** |
| अ | जिल्ह्यामधील महत्त्वपूर्ण 5 आपत्ती प्रवण समुदाय होण्याची कारणे काय आहेत? | जनजागृती कमी असणे, |
| ब | आपत्तीप्रवणता व आपत्ती धोके याचा समुदाय वरती काय परिणाम होऊ शकतो? | मोठ्या प्रमाणावर जनतेस आपत्तीस सामोरे जावे लागते.पायाभूत सुविधाचे नुकसान, त्याबरोबर सामाजिक स्वास्थ बिघडू शकते. |
| **3** | **क्षमता विश्लेषण परिणाम** | **उत्तर** |
| अ | समुदायायकरीता महत्तवपूर्ण 5 प्राधान्याने | उपलब्ध साहित्यसामग्री,संपर्क |

| | | |
|---|---|---|
| | क्षमता कोणत्या आहेत? | यंत्रणा, |
| ब | उपलब्ध असलेल्या क्षमतेचा कशा प्रकारे उपयोग करता येऊ शकतो? | उपलब्ध साहित्य योग्य वेळेत वापरणे |
| क | पाच महत्वपूर्ण कमतरता आपत्ती प्रवण क्षेत्रातील सांगा | धोके स्विकारण्याची कमी मानसिकता ,सातत्य कमी, |
| **४** | **आपत्तीस प्रतिसाद, सौम्यीकरण देणेकामी सूचना** | **आपत्ती विषयक कायद्याचे पालन, देणेत येणाऱ्या पूर्वसूचनेनुसार अमंलबजावणी** |

## प्रकरण 8
## आपत्ती व्यवस्थापन संस्थात्मक बांधणी

### ८.१ राष्ट्रीय स्तर

आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 3 नुसार राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण समिती स्थापित करणेत आलेले आहे. खालील प्रमाणे व आपत्ती व्यवस्थापनाचे अनुषंगाने राष्ट्रीय, राज्य आपत्ती प्राधिकरणाचे मार्गदर्शक तत्त्वानुसार कार्य करणेत येते



## राज्यस्तर ,जिल्हास्तर, गावस्तर, माहिती



## 8.2 जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सांग़ली

आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 मधील कलम 3 नुसार आपत्ती व्यवस्थापन कृती योजनानुसार आपत्तीकामी प्रतिबंध, सौम्यीकरण करीता रचनात्मक व समग्र तसेच तत्काळ प्रतिसाद करीता संस्थात्मक बांधणी आवश्यक ठरते.त्यानुसार जिल्हयामध्ये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण समिती गठीत करणेत आलेले आहे.

| अ.क्र | अधिकारी पदनाम | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण मधील पदनाम |
|---|---|---|
| 1 | जिल्हाधिकारी | अध्यक्ष |
| 2 | अध्यक्ष, जि.प.सांगली | सहअध्यक्ष |
| 3 | पोलिस अधिक्षक | सदस्य |
| 4 | मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.सांगली | सदस्य |
| 5 | आयुक्त, सा.मि.कु.महानगरपालिका सांगली | सदस्य |
| 6 | कार्यकारी अभियंता, सार्व.बांधकाम विभाग मिरज | सदस्य |
| 7 | कार्य.अभियंता, पाटबंधारे विभाग, सांगली | सदस्य |
| 8 | जिल्हा शल्य चिकित्सक | सदस्य |
| 9 | निवासी उपजिल्हाधिकारी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 10 | स्वंयसेवी प्रतिनिधी | सदस्य |
| 11 | समादेशक होमगार्ड विभाग सांगली | सदस्य |

## 8.3 जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अधिकार व कार्यपध्दती

1. जिल्हयासाठी प्रतिसाद आराखड्यासह आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे.
2. राष्ट्रीय धोरण, राज्याचे धोरण व आराखडे आणि जिल्हयाचा आराख़डा यामध्ये समन्वय ठेवणे व सनियंत्रण करणे.
3. आपत्ती प्रतिबंधात्मक व आपत्तीची तीव्रता कमी करणेच्या उपाय योजना करणे.
4. प्रतिबंधात्मक उपाय योजना कार्यान्विन यंत्रणेकडून करण्यात येत असल्याची खात्री करणे.
5. विविध विभागांनी तयार केलेल्या आपत्ती व्यवस्थापन आराखड्याचे अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे.
6. उपलब्ध साधन सामुग्रीचा आढावा घेऊन अद्यावतीकरण करणे.
7. आपत्ती निवारण उपाय योजना परिणामकारक दर्जाच्या करण्यासाठी विभागाना सूचना देणे.
8. विविध स्तरावर प्रशिक्षण आयोजित करणे.
9. सेवाभावी संस्था यांच्या मदतीने समूह प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम राबविणे.
10. आपत्तीची पूर्वसूचना मिळण्यासाठी आवश्यक यंत्रणा उभारणे.

11. आपत्ती प्रसंगी उद्भवणाऱ्या परिस्थितीचे सनियंत्रण करणे.
12. सर्व विभागामध्ये सहाय्य सल्ला व समन्वय ठेवणे.
13. आपत्ती नंतरच्या उपाय योजना तत्परतेने व प्रभावीपणे राबिवणे

## 8.4 तालुकास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समिती

तालुक्याचे तहसिलदार यांचे अध्यक्षतेखाली तालुका आपत्ती व्यवस्थापन समिती स्थापित करणेत येत असून आपत्ती पूर्व नियोजन,विविध उपाय योजना कृती गट व आपत्तीचेवेळी अमंलबजावणी यामध्ये आपत्ती व्यवस्थापन समितीची महत्त्वपूर्ण भूमिका असते.

**तालुकास्तरीय आपत्ती व्यवस्थापन समितीची रचना**

| **अ.क्र.** | **पदनाम** | **प्राधिकरणामधील पद** |
|---|---|---|
| 1 | तहसिलदार | अध्यक्ष |
| 2 | सभापती, तालुका पंचायत समिती | सहअध्यक्ष |
| 3 | निवासी नायब तहसिलदार | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 4 | गट विकास अधिकारी | सदस्य |
| 5 | तालुका आरोग्य अधिकारी | सदस्य |
| 6 | पोलिस निरिक्षक | सदस्य |
| 7 | उपअभिंयता,पाटबंधारे विभाग | सदस्य |
| 8 | उप अभियंता सा.बा.विभाग | सदस्य |
| 9 | महिला मडंळ | विशेष निमंत्रित |
| 10 | स्वंयसेवी/अशासकीय संस्था प्रतिनिधी | विशेष निमंत्रित |

## 8.5 ग्रामस्तरीय आपत्ती व्यवस्थापन समितीची रचना

| अ.क्र. | पदनाम | प्राधिकरणामधील पद |
|---|---|---|
| 1 | सरपंच | अध्यक्ष |
| 2 | ग्रामसेवक | सहअध्यक्ष |
| 3 | तलाठी | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| 4 | पोलिस पाटील | सदस्य |
| 5 | आरोग्य सेवक | सदस्य |
| 6 | शिक्षक | सदस्य |
| 7 | कृषी सहाय्यक | सदस्य |
| 8 | अंगणवाडी सेविका | सदस्य |
| 9 | महिला प्रतिनीधी | सदस्य |
| 10 | स्वयंसेवी संस्थाचे प्रतिनीधी | सदस्य |

## 8.6 जिल्हा नियत्रंण कक्ष:

जिल्ह्यामधील घडणाऱ्या कोणत्याही आपत्तीस सामोरे जाणेकामी नियत्रंण कक्ष आवश्यक ठरते. जिल्हा नियंत्रण कक्ष राज्य, नियंत्रण कक्ष तसेच स्थानिक इतर कार्यन्विन विभागासोबत आपत्तीच्या कालावधीत कार्य करते.



**8.7 जिल्हा नियंत्रण कक्ष ते तालुका नियंत्रण कक्ष**

1. **जिल्हा नियंत्रण कक्ष-**जिल्हा नियंत्रण कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापित करणेत आलेला असून आपत्ती विषयक माहीती संकलित करणे, सुव्यवस्थित ठेवणे, आपत्तीच्या काळात तात्काळ संपर्क यंत्रणा कार्यन्वित करणे इ.करीता अत्यंत उपयुक्त ठरू शकते.

2. **नियंत्रण कक्षातील सुविधा**

   टेलिफोन संगणक, इंटरनेट, प्रिंटर, आपत्ती व्यवस्थापन आराखडा

3. **विभाग निहाय नियंत्रण कक्ष**

   प्रत्येक विभागानेदि. १ जून पासून आपले विभागाचे नियंत्रण करून अदयावत करणेबाबत सूचना दिलेल्या आहेत.सदर नियंत्रण कक्षामध्ये आपल्या विभागाची संपूर्ण माहीती असलेल्या अधिकारी याचे नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करावी. प्रत्येक विभागाचे नियंत्रण कक्षाचे जिल्हास्तर व तालुकास्तर नियंत्रण कक्ष यांचेशी संपर्कात राहून अत्यावश्यक साधने /साहित्य सामग्री पुरवठा घटनेच्या ठिकाणी करावा.

4. **तालुका नियंत्रण कक्ष**

   सदर नियंत्रण कक्ष हे प्रत्येक तालुक्याचे ठिकाणी तहसिल कार्यालयात कार्यन्वित करावे. सदर कक्षामध्ये नोडल अधिकारी याची नेमणूक करावी. अधिकारी यांनी घटनेच्या ठिकाणी काम करणारे शोध व सुटका गट, प्रथमोपोचार गट अत्यावश्यक साहित्य सामग्री इ.पुरवठा तात्काळ घटनेच्या ठिकाणी करावा तसेच जिल्हा नियंत्रण कक्षाकडून प्राप्त होणाऱ्या सूचनेनुसार कामकाज करावे.

5. **तालुका नियंत्रण कक्षामध्ये खालील सुविधा उपलब्ध असाव्यात**

   1. टेलिफोन
   2. तालुका आपत्ती व्यवस्थापन आराखडा/जि.आपत्ती व्यवस्थापन आराखडा
   3. इतर आवश्यक माहीती

6. **नियंत्रण कक्षामध्ये उपलब्ध असलेल्या साहित्यसामग्री सुस्थितीत ठेवणेकामी नियुक्ती करणेत आलेले जबाबदार व्यक्तीची नियुक्ती खालील प्रमाणे करावी.**

   1. जिल्हा नियंत्रण कक्ष -जिल्हाधिकारी अथवा जिल्हाधिकारी यांनी निर्देशित केलेले अधिकारी
   2. विभागनिहाय नियंत्रण कक्ष -कार्यालयीन विभाग प्रमुख
   3. तालुका नियंत्रण कक्ष-तालुका नोडल अधिकारी

   वरील नियंत्रण कक्षाची तपासणी नियमित करणेत यावी व त्याबाबत माहीती अद्यावत ठेवावी.

7. **प्रत्येक विभागाने आपत्तीस प्रतिसाद देताना आवश्यक प्रतिसाद योजना तयार करणेत यावेत.सदर प्रतिसाद नियंत्रण कक्षाकडून आदेश देणे, संपर्क करणे, समन्वय ठेवणे,पूर्व**

**सूचना, शोध व सुटका, प्रथमोपचार, तात्पुरता निवारा, पिण्याचे पाणी, कायदा व सुव्यवस्था, जनतेस प्राप्त होणाऱ्या तक्रारी, पुनर्वसन इ.कार्य करणेत यावे.**

8. **पूर्व सूचना**

पूर्व सूचना देणेत येणारी यंत्रणा तयार करणे अत्यंत महत्त्वाचे असून योग्य ती माहीती मूळे जिवितहानी व वित्तहानी याचे प्रमाण कमी करता येऊ शकते

9. **माहीती देणे**

आपत्तीच्या काळात माहीती देत असताना योग्य ती माहीती विभाग प्रमुख यांना पुरविणेत यावी तसेच योग्य माहीती अभावी अफवा पसरू नये याची काळजी घ्यावी.

10. **पूर्व सूचना कृती आराखडा**

| **अ.क्र** | **कृती** | **पूर** | **भूकंप** | **औद्योगिक अपघात** |
|---|---|---|---|---|
| 1 | पूर्व सूचना यंत्रणा | पाटबंधारे,हवामा जिल्हाधिकारी कार्या, तहसिल कार्या, गावस्तर | - | औद्योगिक आस्थापना जिल्हा क्रायसिस ग्रुप, तहसिलदार |
| 2 | जबाबदार विभाग | तहसिलदार | तहसिलदार | तहसिलदार |
| 3 | प्रशिक्षित /तज्ञ व्यक्ती उपलब्धतता | होय | | होय |
| 4 | आपत्ती प्रवण गावांना पूर्व सूचना दिली जाते का? | सर्व आपत्ती प्रवण गावे | | |

11. **आपत्तीच्या काळात आणि आपत्ती नंतर**

| **धोक्याचे प्रकार** | **पूर** | **भूकंप** | **औद्योगिक अपघात** | **दरड कोसळणे** |
|---|---|---|---|---|
| जबाबदार यंत्रणा | महसूल व जिल्हा परिषद | | | |
| गावे | सर्व आपत्ती प्रवण गावे | | | |

### 12. व्ही.आय.पी व राजशिष्टाचार

आपत्ती काळात अथवा आपत्ती घडल्यानंतर घडलेल्या ठिकाणी व्ही.आय.पी लोक भेट देऊन जनतेला शांततेचे आवाहन करतात.सदर भेटीदरम्यान आपत्ती कालीन शोध व बचाव पथकाच्या कार्यावर परिणाम होऊ नये याची काळजी घेणेत यावी.

### 13. माध्यमे व्यवस्थापन

प्रिंट व इलेकट्रानिक माध्यमे अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात. जनतेमध्ये जनजागृती आणि पूर्वतयारी त्याचप्रमाणे आपत्तीची पूर्व सूचना देणे, आपत्ती प्रवण भागाची माहीती संकलित करणे, स्वंयसेवी संस्थाकडील मदत गरजू व्यक्तीना पोहचविणे याबाबत सहकार्य, आपत्तीपूर्व तयारी व आपत्तीच्या काळात देणेत येणारा प्रतिसाद याबाबत चर्चा करू शकते. सांगली जिल्हयात वेळोवेळी पत्रकार, प्रिंट माध्यमे, इलेक्ट्रानिक माध्यमे यांना माहीती कार्यालयामार्फत योग्य ती माहीती दिली जाते.

## 8.8 धोके कृती आराखडा

### 1. पूर अथवा अतिवृष्टीचा इशारा खालील यंत्रणामार्फत दिला जाऊ शकतो

| अ.क्र | तपशील | कार्यन्विन यंत्रणा |
|---|---|---|
| 1 | पूर | कार्यन्विन यंत्रणा पाटबंधारे, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण |
| 2 | अतिवृष्टी | हवामान खाते, राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण |

### 2. आपत्ती पूर्व सूचना /धोक्याचा इशारा

1. जिल्हाधिकारी कार्यालयास पूर्व सूचना प्राप्त होताच सदर माहीती जिल्हयातील इतर विभाग,पाट्बंधारे,बांधकाम,तहसिल कार्यालय,पोलिस विभाग,जिल्हा परिषद यांना कळविणेत येते.
2. प्रत्येक विभागाचे प्रमुख यांना कळविणेत येते.
3. सदर माहीती प्राप्त होताच तालुकास्तरावरून गावस्तरीय यंत्रणेला याबाबत दिली जाते.
4. सदर गावस्तरीय माहीती प्राप्त होताच गावामधील टीम आवश्यक साहित्यासह योग्य त्या उपाय योजना करणेबाबत सतर्क राहतात

**3 आपत्तीच्या काळात**

आपत्ती परिस्थितीचा अंदाज घेऊन जिल्हाधिकारी कार्य न्वित विभागाना शोध व सुटका तसेच प्रथोमोपचार करणेचे पोलिस व स्थानिक स्वंयसेवी संस्थेच्या सहकार्याने कामकाज करणेचे आदेश देतात.

1. पूर परिस्थिती अडकलेल्या जनतेस ट्रॅक्टर /ट्रॉली घेऊन यांचे सहाय्याने सुरक्षित ठिकाणी /तात्पुरता निवारा स्थळी घेऊन जातात.याकामी तहसिलदार, पोलिस, पट्टीचे पोहणारे लोकांचे सहकार्य घेतले जाते.
2. वाहतूककरीता आवश्यक वाहने पुरविण्याचे काम वाहतूक कमिटी करते.

**4 आपत्तीनंतर**

आपत्ती नंतर प्रथमोपचार, रोगराईनियंत्रण, पुनर्वसन, पुनर्बांधणी, आवश्यक निवारा, कपडे यांचा पुरवठा ,पंचनामे इ.आवश्यक कार्यावरती लक्ष केंद्रित केले जाते.

जिल्हा नियंत्रण कक्ष खालील प्रमाणे समिती स्थापित करून त्याप्रमाणे कामकाज करते

1. साथनियंत्रण पथक
2. पुनर्बांधकाम व पुनर्वसन पथक
3. वाहतूक नियंत्रण, कायदा व सुव्यवस्था पथक
4. नुकसानीचे पंचनामे पथक
5. मदत व निवारा पथक
6. मृतदेह विल्हेवाट पथक

**8.9 भूकंप धोके कृती आराखडा**

भूकंप नैसर्गिक आपत्ती असून जमिनीला धक्के भसल्याने इमारत कोसळणे मोठ्या प्रमाणावर घडू शकते.सदर होणारे नुकसान भूकंपाचे तीव्रतेवर अवलंबून आहे. भूकंपामूळे दरड कोसळणे, पूर येणे, आग लागणे, रासायनिक वायू गळती, संपर्क यंत्रणा कोसळणे घटना घडू शकतात.

**1. आपत्ती पूर्व काळात**

भूकंप आपत्तीची सूचना देता येत नसली तरी सुरक्षितेच्या दृष्टीकोनातून घरबांधणी,इमारत बांधणी,राष्ट्रीय इमारत बांधणी भूकंपरोधक नियमातंर्गत बांधणे गरजेचे ठरते.

1. जुने इमारती घरे, पूल तपासणी अथवा स्ट्रक्चरल ऑडिट केले पाहिजे त्यानुसार धोकादायक इमारती पाडल्या पाहिजेत अथवा दिलेल्या सल्ल्यानुसार दुरुस्त केल्या पाहिजेत .
2. औद्योगिक आस्थापना त्यांना त्याचेकडील बांधकाम उदा.रसायने, साठवणूक साठे, आग प्रतिबंधकइमारती, आरोग्य सुविधा, रसायने तयार करणेचे इमारत, पाणी साठ्विण्याचे टँक हे राष्ट्रीय इमारत बांधणी भूकंप रोधक नियमातंर्गत करावयाचे आहे.
3. अत्यावश्यक सेवा सुविधा देणाऱ्या आस्थापना उदा.रूग्णालये संपर्क यंत्रणा, अग्नीशमन यंत्रणा, इ.बांधकाम विभाग राष्ट्रीय कार्यालय, शाळा, महविद्यालये इ.बांधकाम राष्ट्रीय इमारत बांधणी भूकंपरोधक नियमातंर्गत करावी.
4. अत्यावश्यक साहित्य सामग्री ,शोध व बचाव पथके, प्रशिक्षित व्यक्ती तयार ठेवावेत.
5. सदर कामी उपयुक्त स्वयसेवी संस्था यादी याचे संपर्क क्रमांक व ई-मेल वेळोवेळी अद्यावत करावेत.
6. रंगीत तालीम वेळोवेळी घेणेत यावी.

**2. आपत्ती नंतरच्या काळात**

भूकंप येऊन गेल्यानंतर संपर्क यंत्रणा कोलमडणे , वीज यंत्रणा, इमारत कोसळणे, घरे नुकसान, लोक गाडले जाणे, पूल कोसळणे, औद्योगिक अपघात इ.घटना उदभवू शकतात.

**3. कृती**

1. औद्योगिक आस्थापना ठिकाणी भूकंप उदभवल्यानंतर त्या ठिकाणी जिल्हाधिकारी आणि उपजिल्हाधिकारी यांनी जिल्हा क्रायसिस ग्रुप व स्थानिक क्रायसिस यांचे सहकार्याने योजनेनुसार कार्यन्वित करावे.
1. त्याचबरोबर पूर परिस्थिती उदभवल्यानंतर जिवितहानी व वित्तहानी होऊ नये याकरीता आपत्ती व्यवस्थापन आराखड्यानुसार कामकाज करावे.
2. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांनी आपली जबाबदारी पूर्ण करावी
    1. रोगराई नियंत्रण करणे
    2. पुनर्बांधणी करणे
    3. संपर्क यंत्रणा, वीज, पाणी, रस्ते बांधणी, पूल निवारा इ.कामे तात्काळ हाती घेणे

4. मृतदेहाची विल्हेवाट योग्यरीतींने लावणे
5. मदत केंद्र अन्न व वस्त्र निवारा इ सुविधा देणे
   राज्यस्तरावरून आवश्यक मदत जिल्हाधिकारी घेऊ शकतात

## 8.10 औद्योगिक अपघात, आग रासयनिक अपघात कृती आराखडा

### 1. स्त्रोत रासायनिक अपघात

1. रासायनिक पदार्थ तयार करणे, साठवणूक, साठा व त्याची विल्हेवाट लावणे
2. वेअर हाऊस व गोडावून, ऑयल डेपो
3. वाहतूक व्यवस्था(रस्ते ,पाईप लाईन,पाणी,रेल्वे)

### 2. रासायनिक अपघात घडण्याची कारणे

1. आग लागणे
2. स्फोट
3. रासायनिक वायू वातावरणात मिसळणे
4. प्रक्रिया व सुरक्षित यंत्रणा बंद पडणे
5. तांत्रिक चूका प्रक्रिया दोष, घर्षण
6. मानवीय चूका -सुरक्षित साधनाचा वापर न करणे
7. अपुरी माहीती-पूर्व सूचना माहीतीचा अभाव, संपर्क यंत्रणा नसणे, विविध कालावधीमध्ये रंगीत तालीम न घेणे
8. दहशतवादी हल्ले-रासायनिक अपघात घडवून आणले जाऊ शकतात
9. नैसर्गिक आपत्ती -पूर,भूकंप, वादळे इ मूळे रासायनिक अपघात होऊ शकतात.

## 8.11 अधिकार व कर्तव्ये

जिल्हास्तर व जिल्हा क्रायसिस गट हा जिल्ह्यामध्ये घडणाऱ्या सर्व प्रकारच्या रासायनिक आपत्ती तज्ञ मार्गदर्शन व हाताळणे बाबत कामकाज करते.

सदर समितीमध्ये जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, उपसंचालक, आरोग्य व सुरक्षा संचलनालयआरोग्य अधिकारी, पोलिस अधिक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी, अग्नीशमन अधिकारी महानगरपालिका अधिकारी , मुख्याधिकारी, माहीती अधिकारी इ. समावेश असतो.

## 8.12 माहीती पुरविणे

अपघात /घटना घडलेस घटनेचा सविस्तर माहीती उदा.घटनेचे ठिकाण, रसायनाचा प्रकार, घटनेची तीव्रता, जखमी इ. माहीती घेणे आवश्यक आहे. सदर माहीती नियंत्रण कक्षप्रमुख यांनी तात्काळ पोलिस, अग्नीशमन यंत्रणा व आरोग्य विभाग यांना कळविणेत यावे. त्याचप्रमाणे जिल्हाधिकारी यांना व इतर क्रायसिस ग्रुपचे सदस्य यांना कळविणे

आवश्यक राहील. जिल्हाधिकारी यांना आवश्यक वाटलेस अतिरिक्त मदत राज्य नियंत्रण कक्षाकडून उपलब्ध करू शकते. राज्यस्तरीय क्रायसिस ग्रुप सुध्दा घटनेची तात्काळ माहीती घेऊन अत्यावश्यक साहित्यसामग्री व मनुष्यबळ आवश्यकतेनुसार पाठवू शकते.

### 8.13 रासायनिक अपघात करीता स्थानिक प्रतिसाद

स्थानिक पातळीवर स्थानिक क्रायसिस ग्रुपच्या सहाय्याने अपघातास प्रतिसाद दिला जाऊ शकतो.त्यानंतर जिल्हा क्रायसिसची मदत घेतली जाऊ शकते.जिल्हास्तरावर आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हा क्रायसिस ग्रुप,स्थानिक क्रायसिस ग्रुप या यंत्रणेवर नियोजन आणि व्यवस्थापन आपत्तीस तात्काळ प्रतिसाद देणेकामी योग्य सम न्वय राखून कामकाज करणे आवश्यक ठरते.

### महत्वपूर्ण यंत्रणा

रासायनिक /औद्योगिक अपघात प्रतिसाद देणेकामी महत्त्वपूर्ण यंत्रणा

1. जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
2. पोलिस विभाग
3. अग्नीशम विभाग
4. महसूल विभाग
5. प्रदूषण विभाग
6. आर.टी.ओ.विभाग
7. पशुसंवर्धन विभाग
8. सार्व.बांधकाम विभाग

### रासायनिक पदार्थ वाहतूक अपघात प्रतिसाद

**पाईप लाईन वाहतूक**-रासायनिक पदार्थ पाईपलाईनद्वारे पुरवठा केली जाते अशावेळी पाईपलाईन गेलेल्या ठिकाणी अत्यावश्यक संपर्कासाठी क्रमांक दर्शविणेत यावे.अपघाताची माहीती मिळताच तात्काळ कार्यवाही सूरू करावी.

रस्ते वाहतूक-रासायनिक पदार्थ वाहणारे टँकरचे ड्रायव्हर प्रशिक्षित असावेत.अपघाताची घटना घडलेस तात्काळ परिस्थिती नियंत्रित करणेकामी संपर्क क्रमांकाची माहीती असावी.त्याचप्रमाणे सदर घटनेची माहीती पोलिस विभागास कळविणेत यावी.

टँकरवरती रासायनिक पदार्थाची माहीती असावी.ड्रायव्हरजवळ अपघात घडलेस काय करावे याबाबत कार्ड असावे.पोलिस प्रथम घटनेच्या ठिकाणी पोहचत असल्याने त्यांनी वाहतूक

दुसऱ्या मार्गाने वळविणे.घटनेच्या ठिकाणी बॅरिकेटस लावणे त्या ठिकाणी तज्ञाशिवाय कोणालाही प्रवेश न देणे,स्थानिक रहिवाशी यांना घटनेच्या ठिकाणापासून दूर जाणेस सांगणे इ.कार्य केले जाऊ शकते.

## 8.14 जबाबदार कार्यन्विन यंत्रणा

| अ.क्र | कार्यन्विन यंत्रणा | प्रमुख अधिकारी | सहाय्यक यंत्रणा | घटना प्रतिसाद प्रणाली |
|---|---|---|---|---|
| 1 | नियोज व समन्वय | निवासी उपजिल्हाधिकारी | तहसिल,पोलिस,जि.प., महागरपालिका | नियोजन विभाग |
| 2 | प्रशासकीय व राज शिष्टाचार | निवासी उपजिल्हाधिकारी | तहसिल,पोलिस,जि.प., महागरपालिका इतर विभाग | अर्थ व प्रशासन |
| 3 | पंचनामे | उपजिल्हाधिकारी/नेमणेत आलेले अधिकारी | तहसिल, कृषी ,बांधकाम,पाटबंधारे | नियोजन |
| 4 | पूर्व सूचना | निवासी उपजिल्हाधिकारी | तहसिल,नियंत्रण कक्षे,पाटबंधारे | पूर्व सूचना यंत्रणा |
| 5 | माध्यमे | माहीती अधिकारी | प्रिंट मिडिया,न्युज पेपर ,टी.व्ही,चॅनेल, | माहीती विभाग |
| 6 | संपर्क यंत्रणा | निवासी उपजिल्हाधिकारी | तहसिल,बी.एस.एन.एल,पोलिस विभाग | संपर्क यंत्रणा |
| 7 | वाहतूक | आर.टी.ओ/ एस.टी विभाग | आर.टी.ओ./डी.एस.ओ./गोडाऊन पाणी पुरवठा | वाहतूक व्यवस्था |
| 8 | कायदा व सुव्यवस्था | पोलिस अधिक्षक | स्थानिक मंडळे, स्वंयसेवी संस्था इ | |
| 9 | शोध व सुटका विभाग | उपविभागीय अधिकारी | तहसिल, पोलिस प्रशासन, अग्नीशमन | कार्यन्विन यंत्रणा |
| 10 | निवारा व्यवस्था | प्रा/माध्यशिक्षणअधिकारी | तहसिल,पोलिस, मुख्याध्यापक | निवाराव्यवस्था |
| 11 | अन्नधान्य वितरण | जिल्हा पुरवठा अधिकारी | तहसिल,पुरवठा विभाग | वितरण विभाग |

## प्रकरण 9

# आपत्ती प्रतिबंध आणि सौम्यीकरण

### 9.1 उपलब्ध साहित्य सामग्री

सांगली जिल्ह्यामधील आपत्कालीन उपलब्ध साहित्यसामग्रीची माहीती परिशिष्टमध्ये जोडणेत आलेली आहे.

### 9.2 आपत्तीनिहाय सौम्यीकरण पध्दती

**1. भूंकप**

सांगली जिल्ह्यामधील शिराळा तालुका मधील काही भाग भूंकप प्रवण क्षेत्रात येतो.तात्पुरते निवारा व्यवस्थासाठी साहित्य सामग्री तसेच भूंकपरोधक बांधकाम करणेबाबत जन जागृती आवश्यक आहे.

**2. पूर**

नदीकाठावरील गावामधील जी घरे पाण्याखाली जाण्याची संभवता असते अशा लोकांना सुरक्षित ठिकाणी घराचे पुर्नवसन करीता जागा उपलब्ध करणे आवश्यक आहे.याकरीता पाटबंधारे विभागाने कृती आराखडा करताना याबाबत माहीती घ्यावी.

**3. आग**

1. अग्नीशमन सिलेंडर योग्य व सुस्थितीत असलेचे खात्री करावी.
2. प्रत्येक महत्त्वाच्या आस्थापन विभागाच्या ठिकाणी आग सुरक्षितता उपकरणे असावीत.
3. आग विझवण्याकरीता योग्य व्यक्तीना/जनतेस प्रशिक्षण देण्याचे नियोजन महानगरपालिका, नगर पालिका यांचे मार्फत करणेत यावे.

**4. रस्ते अपघात**

रस्ते अपघात टाळण्यासाठी रस्ते चिन्हाचा वापर, गती रोधकाचा वापर,अपघात प्रवण क्षेत्रात करणेत यावा. जिल्हा आपत्तीग्रस्त जखमींना तत्काळ प्रतिसाद देणेकामी अधुनिक साहित्य सामग्रीयुक्त केंद्र सूरू करावे.खराब झालेले रस्ते तत्काळ दुरुस्त करावे तसेच खड्डे पडलेले तत्काळ बुजविणेत यावे.

**5 रोगराई**

1. पाणी तपासणी करून पाण्याच्या माध्यमातून रोगराई पसरू नये याबाबत काळजी घ्यावी.
2. ब्लेचिंग पावडरचा योग्य प्रमाणात पुरवठा करण्यात यावा.
3. ग्रामीन पाणी पुरवठा योजनेकरीता शुध्दीकरण यंत्रणा बसवण्यात यावी.
4. कूपननलिकामधील पाण्याचा वापरावर नियंत्रण ठेवणेत यावे.
5. ग्रामीण रूग्णालय त्याचेकडे उपलब्ध असलेली रक्त पेढी ,अत्यावश्यक सोयीबाबत सुधारणा करणेत यावी.

**प्रकरण 10**

# आपत्ती पूर्व सज्जता

## 10.1 प्रशासकीय सज्जता :

आपत्तीच्या कालावधीत मदत तसेच तत्काळ प्रतिसाद देणेकामी अत्यंत महत्त्वाचा घटक आहे.प्रशासकीय सज्जतेच्या दृष्टीने खालील गोष्टी अत्यंत अत्यावश्यक आहे.

1. प्रमाणित कृती प्रणाली, अत्यावश्यक साहित्य सामग्री, गोडाउन यांची माहीती.
2. साहित्य सामग्री सुसज्ज ठेवणे.
3. प्रत्येक विभागाची जबाबदारी निश्चित करणे.
4. आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सदस्य, अधिकारी वर्ग, समुदायासाठी सेमिनार, कार्यशाळा आयोजित करणे.
5. विविध विभागातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण देणे.
6. कोणत्याही आपत्तीस तत्काळ प्रतिसाद देणेकामी रंगीत तालीम घेणे अत्यावश्यक असून त्यामध्ये सर्व कार्यन्वित विभागाचा समावेश असावा.
7. आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे.

## 10.2. आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम:

सन 2009 यु.एन.डी.पी चे सहाय्याने सूरू करण्यात आला त्याची फलनिष्पती पाहून महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम सूरू करण्यात आला.या कार्यक्रमानुसार प्रशिक्षण, प्रमाणित कार्य पध्दती, आराखडे, इ तयार केले जातात या करीता आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांची नेमणूक करण्यात आलेली आहे

## 10.3. कृती सज्जता

1. साहित्य आपत्तीच्या काळात उपयुक्त पडणारे साहित्य,मनुष्य बळ, वाहने यांचे पत्ते याची माहीती उपलब्ध करून सदर माहीती दरवर्षी अद्यावत करावी.
2. संपर्क यंत्रणा : संपर्क यंत्रणा आपत्तीच्या काळात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. सदर यंत्रणा अद्यावत असणे अत्यावश्यक असते. पोलिस विभागातील वायरलेस यंत्रणा यामध्ये महत्त्व पूर्ण भूमिका बजावू शकते.
3. साहित्य व मूल्यामापन
   जिल्हयामध्ये उपलब्ध असलेले साहित्य सामग्रीची मूल्यमापन करणे अत्यावश्यक असते.
4. संपर्क यंत्रणा व प्रसार माध्यमे

**आपत्तीचा अदांज वर्तविणे, पूर्व सूचना देणेकरीता आपत्ती निहाय विभाग खालील प्रमाणे**

| आपत्तीचे प्रकार | अंदाज वर्तवणारी संस्था | देखरेख करणारी यंत्रणा | पूर्व सूचना यंत्रणा | विभाग |
|---|---|---|---|---|
| भूकंप | - | | पोलिस, वायरलेस, फोन | भूकंपमापक केंद्र, शिराळा |
| पूर | पाटंबधारे | पाण्याची पातळी | वायरलेस ,फोन | पाटबंधारे |
| वादळ | हवामान खाते | | वायरलेस फोन | म. शासन |
| रोगराई | आरोग्य विभाग | आरोग्य प्रयोग शाळा | फोन, वायरलेस | आरोग्य विभाग |
| आग़ | महानगरपालिका, नगरपालिका | अग्नीशमन यंत्रणा | फोन ,वायरलेस | महानगर पालिका,नगर पालिका |
| रस्ते अपघात | पोलिस विभाग | - | फोन ,वायरलेस | पोलिस विभाग |
| औद्योगिक अपघात | एम.आय.डी.सी विभाग | अग्नीशमन विभाग | फोन,वायरलेस | एम.आय.डी.सी विभाग |

## 10.4 आपत्ती निहाय सज्जता

**पूर**.- सांगली  जिल्ह्यामधील महत्वाची धरणे वरती वायरलेस यंत्रणा उपलब्ध आहे. जिल्हा प्रशासन मान्सून पूर्व तयारी बैठक घेऊन सर्व कार्यन्वित विभाग सुसज्ज राहणेबाबत सूचना दिल्या जातात.धरणामधून पाणी विसर्ग करताना नदीकाठावरील गावाना पूर्व सूचना दिली जाते.

**रासयनिक औद्योगिक अपघात**

सांगली जिल्हा मधील अग्नीशमन यंत्रणा तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय व विविध रासायनिक कंपनीचे सुरक्षा अधिकारी यांचे मार्फत होणाऱ्या आपत्तीस तत्काळ प्रतिसाद दिला जातो.

**रस्ते अपघात**

रस्ते अपघात संदर्भात पोलिस विभागाची महत्त्वपूर्ण भूमिका असते. त्याबरोबर जिल्ह्यामधील प्राथमिक आरोग्य केंद्र ,ग्रामीण रूगणालय, ॲम्बुलन्स 108 सेवा तत्काळ अपघातग्रस्त जखमीना उपलब्ध करून दिले जातात.

**रोगराई**

जिल्हास्तरावरती जिल्हा रूग्णालय हे वैद्यकीय महाविद्यालयाशी सलग्न आहे. जिल्ह्यामध्ये 59 प्राथमिक आरोग्य केंद्र व 18 ग्रामीण रूग्णालय व 1 जिल्हा रूग्णालय असे एकूण 500 बेडची उपलब्धता आहे.

आपत्कालीन परिस्थिती करीता प्रथमोपचार पथक कार्यन्वित असते.यामध्ये एक डॉक्टर, आरोग्य सेवक, पुरूष सहाय्यक याचा समावेश असून त्याना मेडिकल किट दिले जाते.

**भूंकप**

सांगली जिल्ह्यामधील शिराळा तालुक्यामधील काही भाग भूंकप प्रवण क्षेत्रामध्ये येतो. सदर कामी महत्त्वपूर्ण विभाग यांना साहित्य सामग्रीसह सुसज्ज राहणेस सूचना दिले जातात.

## 10.5 सज्जता मापन विभाग निहाय

आपत्कालीन परिस्थितीस सामोरे जाणेकामी पडताळणी सूची विभागनिहाय दिली जाते याबाबत माहीती परिष्टामध्ये जोडणेत आलेली आहे.

## प्रकरण 11

# प्रतिसाद अणि मदत प्रणाली

**11.1 प्रतिसाद प्रणाली** सांगली जिल्हा हा बहुआपत्ती प्रवण असून यास सामोरे जाताना जिल्हयामधील संपर्क यंत्रणा, विविध विभागामध्ये समन्वय, सहकार्य असणे अत्यावश्यक असते. कोणत्याही आपत्तीस प्रतिसाद देणेकरीता खालीलप्रमाणे रचना केली जाते.




| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **पोलिस विभाग** | **अग्नीशमन विभाग** | **बांधकाम विभाग** | **उपविभागीय अधिकारी व तहसिलदार** | **आरोग्य विभाग** | **वीज वितरण कंपनी** | **पाटबंधारे** |

### 11.2 जिल्हास्तरीय आपत्ती कृती समिती

कोणत्याही आपत्तीस सामोरे जाणेकामी खालील प्रमाणे कृती समिती तयार करणेत आलेली आहे

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | संबंधित अधिकारी |
|---|---|---|
| 1 | जिल्हा नियंत्रण कक्ष प्रमुख | निवासी उपजिल्हाधिकारी, सांगली |
| 2 | स्वंयसेवी संस्था समन्वय | महानगरपालिका, नगरपालिका, नगरपंचायत |
| 3 | अतिमहत्त्वाच्या व्यक्तींचा राजशिष्टाचार | निवासी उपजिल्हाधिकारी सांगली<br>अव्वल कारकून राजशिष्टाचार विभाग |
| 4 | वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणे | जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प. सांगली<br>जिल्हा शल्य चिकित्सक सांगली |
| 5 | शासनाशी करावयाचा पत्रव्यवहार, दैनंदिन अहवाल पाठविणे,टिपणी तयार करणे | चिटणीस जिल्हाधिकारी कार्यालय<br>नैसर्गिक आपती अव्वल कारकून |
| 6 | आपदग्रस्त नागरिकासाठी छावण्या करण्या साठी जागा निश्चित करून नियोजन करणे | जिल्हा.नियोजन अधिकारी<br>सहाय्यक नियोजन अधिकारी |
| 7 | जनावरासाठी छावण्या व चारा व्यवस्था | उपायुक्त पशुसंवर्धन विभाग ,सांगली<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जि.प. सांगली |
| 8 | आपत्कालीन परिस्थितीसाठी उदभवणाऱ्या समस्यासाठी सर्व प्रकारची वाहने पुरविणे | उपप्रादेशिक परिवहन अधिकारी<br>वि. नियत्रंक महाराष्ट्रराज्य परिवहन मडंळ |
| 9 | जीवनावश्यक वस्तु पुरवठा व इधंन (बोटी/विमान/हेलीकॅप्टर यांचेसाठी लागणारे इधंनासाह)यांचे नियोजन करणे | जिल्हा पुरवठा अधिकारी सांगली<br>सहा.आयुक्त अन्न औषध प्रशासन ,सागंली |
